शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

भारताचे सार्वजनिक अर्थकारण

(Indian Public Finance)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

एम. ए. भाग-२ : सत्र-३

EO-22 (Elective Paper)

अर्थशास्त्र

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०२०
सुधारित आवृत्ती : २०२३
एम. ए. भाग - २ करिता (भारताचे सार्वजनिक अर्थकारण)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : ५००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-85-4

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ सल्लागार समिती ■

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) प्रकाश पवार
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

डॉ. राजेंद्र कांकरिया
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

प्रा. (डॉ.) सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

डॉ. संजय रत्नपारखी
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

प्रा. (डॉ.) कविता ओझा
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) चेतन आवटी
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. ए. एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्रीमती सुहासिनी सरदार पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) डी. के. मोरे (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ अर्थशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. विद्यावती प्रल्हाद कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. पी. एस. कांबळे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मनोहर आप्पासाहेब कोरे**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कृष्णा टोने**
  सावित्रिबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. किरण शंकर पवार**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. सचिन आप्पासाहेब सरदेसाई**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. प्रभाकर तानाजी माने**
  जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
  शिरोळ–वाडी रोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. हणमंत एन. कठारे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  राजाराम कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. रमेश गणेशराव दंडगे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मोहन गोविंद सदामते**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,
  जि. सांगली
- **श्री. मोहन नरहर पंडितराव**
  यशोदीप ८५, मंगेशकर नगर, सुभाष रोड,
  मंगळवारपेठ, कोल्हापूर

प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१८-१९ पासून सत्र पद्धती सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने 'भारताचे सार्वजनिक अर्थकारण' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सत्र ३ साठी लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, कोष्टके, गणितीय सूत्रे, आकृत्या इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, क्षेत्रीय अभ्यासासाठी विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

भारताचे सार्वजनिक अर्थकारण' या विषयातील सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज, तुटीची वित्तव्यवस्था, स्थानिक वित्त आणि राज्यकाषीय धोरण, संघराज्य वित्त या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

भारताचे सार्वजनिक अर्थकारण' या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. त्याबद्दल घटक लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ संपादक ■

डॉ. जयवंत शंकरराव इंगळे

प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर,

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

भारताचे सार्वजनिक अर्थकारण
एम. ए. भाग–२ : सत्र–३

अभ्यास घटकांचे लेखक

लेखक	घटक क्रमांक
प्रा. संजय धोंडे आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा	१, ४
प्रा. प्रवीण बाबर सहा. प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२, ३

■ संपादक ■

डॉ. जयवंत शंकरराव इंगळे
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

अनुक्रमणिका

घटक क्रमांक	घटकाचे शीर्षक	पान क्रमांक
१.	सार्वजनिक उत्पन्न	१
२.	सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज	३३
३.	तुटीची वित्तव्यवस्था, स्थानिक वित्त आणि राज्यकोषीय धोरण	६६
४.	संघराज्य वित्त	८९

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र-३ : **घटक-१**

सार्वजनिक उत्पन्न
(Public Revenue)

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ उत्पन्नाची साधने आणि भारतीय करव्यवस्था

१.२.२ उत्पन्नातील कल : गेल्या दशकातील भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर

१.२.३ सन १९९१ पूर्वीच्या करविषयक सुधारणांचा संक्षिप्त आढावा

१.२.४ सन १९९१ नंतरच्या करविषयक सुधारणांचा तपशीलवार आढावा

१.२.५ उत्पन्न कर, वस्तू व सेवा कर, शेती करपध्दती यांचा बदलता भार

१.३ सारांश

१.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ सूची

१.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. भारतीय करव्यवस्थेचा आढावा घेता येईल.

२. केंद्र सरकारच्या कर आणि करेतर उत्पन्नातील कल लक्षात घेता येईल.

३. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांमधील सुधारणांचा आढावा घेता येईल.

४. अप्रत्यक्ष कर उत्पन्नाचा केंद्रिय उत्पन्नातील बदलता कल लक्षात घेता येईल.

५. वस्तू व सेवा कराचा भारतीय करव्यवस्थेवर झालेला परिणाम माहिती करून घेता येईल.

६. शेती करपध्दतीमध्ये झालेल्या सुधारणांचा आढावा घेता येईल.

१.१ प्रास्ताविक

२६ जानेवारी १९५० रोजी भारताने राज्यघटना स्वीकारली. राज्यघटनेनुसार भारताने मजबूत केंद्राची संकल्पना स्वीकारली आहे. यानुसार केंद्र सरकारला राज्यापेक्षा व्यापक अधिकार आणि जास्त उत्पन्नाची साधने दिली आहेत. राज्यघटनेनुसार केंद्राला ९९ विषय, राज्य सरकारला ५२ विषय आणि संयुक्त सूचीमध्ये ६६ विषय आहेत. केंद्र सरकारला दिलेल्या अधिक उत्पन्न साधनांमुळे प्रशासकीय कार्ये अधिक चांगल्या पध्दतीने पार पाडता येतात.

स्वातंत्र्यापासून भारताचे राष्ट्रीय उत्पन्न जसजसे वाढत गेले तसा कर आणि करेतर उत्पन्नाचा सरकारी उत्पन्नामधील सहभाग वाढत गेला. कर उत्पन्न जसजसे वाढत गेले तसे करपध्दतीमधील सुधारणांची गरज भासू लागली. करपध्दतीमधील काही कर काळाच्या ओघात नष्ट झाले तर काही नवीन कर करपध्दतीला जोडले गेले. अर्थव्यवस्थेत झालेल्या तांत्रिक आणि आर्थिक बदलांनुसार करपध्दतीची स्थिती, दिशा आणि आकारमान बदलत गेले. संपत्ती आणि देणगी कर यांचे सार्वजनिक उत्पन्नामधील प्रमाण कमी होत गेले तर वस्तू व सेवा करासारखा नवा कर करव्यवस्थेत जोडला गेला. सार्वजनिक उत्पन्नामध्ये कालानुक्रमे झालेले बदल आणि सुधारणा यांचा सविस्तर आढावा आपण येथे घेणार आहोत.

१.२ विषय विवेचन

१.२.१ उत्पन्नाची साधने आणि भारतीय करव्यवस्था

- **केंद्र सरकारच्या उत्पन्नाची साधने :-**

भारतीय राज्यघटनेने केंद्र व राज्य सरकारमध्ये अधिकार आणि उत्पन्नाच्या साधनांची विभागणी केली आहे. राज्यघटनेने केंद्र सरकारला अधिक अधिकार व उत्पन्नाची साधने दिली आहेत. केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकाचे महसूली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक असे दोन भाग पडतात. महसूली अंदाजपत्रकात महसूली जमा आणि महसूली खर्चाबाबत अंदाज दर्शविला जातो आणि भांडवली अंदाजपत्रकात भांडवली उत्पन्न आणि भांडवली खर्चाबाबत अंदाज दाखवला जातो. महसुली उत्पन्नामध्ये करापासून उत्पन्न व करेतर उत्पन्न तर भांडवली उत्पन्नामध्ये अंतर्गत कर्ज, बाह्य कर्ज, सूक्ष्मबचती, भविष्य निर्वाह निधीपासून उत्पन्न इ.चा समावेश होतो. महसुली उत्पन्नाचा विनियोग अल्पकालीन व तात्कालीन गरजांसाठी होतो तर भांडवली उत्पन्नाचा विनियोग दीर्घकालीन व कायमस्वरूपी गरजांसाठी होतो.

I. महसुली उत्पन्न :–

केंद्र सरकारच्या महसुली उत्पन्नाचे मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

१. कर उत्पन्न :–

सार्वजनिक उत्पन्नाचा कर हा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. अर्थव्यवस्थेत आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी कर हे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. भारतात प्राचीन काळापासून करपध्दती अस्तित्वात आहे. कर हे सार्वजनिक उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. केंद्रिय कर उत्पन्नामध्ये व्यापकपणे तीन मार्ग येतात.

(i) उत्पन्न व खर्चावरील कर : यामध्ये व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न आणि खर्च यानुसार कर आकारला जातो. उत्पन्न कर (Income Tax), निगम कर आणि खर्चावरील कर यांचा समावेश होतो. हे कर लागू करताना व्यक्तीचे उत्पन्न किंवा त्यांचा वार्षिक खर्च माहित असावा लागतो.

(ii) मालमत्ता व भांडवली व्यवहारावरील कर : यामध्ये मालमत्ता कर, संपत्ती कर, देणगी कर, जमीन महसूल, नोंदणी व स्टँप कर इ.चा समावेश होतो. भांडवली आणि स्थावर मालमत्ता धारण करणाऱ्या व्यक्तीवर हा कर लागू होतो.

(iii) वस्तू व सेवांवरील कर : यामध्ये सेवा कर, केंद्रिय अबकारी कर, विक्री कर इ.चा समावेश होतो. वस्तू व सेवांची देवाणघेवाण करताना हा कर लागू होतो. भारत सरकारने २०१७ मध्ये सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करून संपूर्ण देशासाठी वस्तू व सेवा कर लागू केला आहे. यामुळे देशभरात वस्तूंची देवाणघेवाण सारख्याच दराने होते.

२. करेतर उत्पन्न :–

केंद्र सरकारला कर सोडून इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न म्हणजे करेतर उत्पन्न होय. करेतर उत्पन्नामध्ये व्याजापासून मिळणारे उत्पन्न, बँक, पोस्ट. या वित्तीय सेवांपासून मिळणारे उत्पन्न, सामाजिक सेवांपासून मिळणारे उत्पन्न, आर्थिक सेवांपासून मिळणारे उत्पन्न, सार्वजनिक उद्योगातील लाभांश व नफा, परकीय देशातून मिळणारी मदत, अनुदान इ. घटकांचा समावेश होतो.

✡ करेतर उत्पन्नाची रचना :–

भारतासारख्या विकसनशील देशात सरकारला प्रशासकीय आणि कल्याणकारी कार्ये पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्पन्नाची गरज असते. परंतु ही गरज कर उत्पन्नातून पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे करेतर उत्पन्नाचा आधार घ्यावा लागतो. सरकारने आपल्या औद्योगिक क्षेत्राची वाढ करून सार्वजनिक महसूल वाढवला आहे. करेतर महसूलाचे प्रमाण १९८०-८१ पासून २०१६-१७ पर्यंत ३,१६० कोटींपासून ३,१२,११२ कोटींपर्यंत वाढले आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे

उत्पन्नही या काळात २९४ कोटीवरून १,३६,९४४ कोटीपर्यंत वाढले आहे. व्याज महसूलही १८५७ कोटींपासून ३०,८४४ कोटी इतके वाढले आहे. करेतर उत्पन्नामुळे केंद्र सरकारला विकासासाठी आणि कल्याणकारी कार्ये पार पाडण्यासाठी महसूल प्राप्त होतो.

✡ करेतर उत्पन्नाचे मार्ग :–

आधुनिक काळातील सरकारांनी कल्याणकारी राज्य संकल्पनेचा स्वीकार केला आहे. त्यामुळे करेतर उत्पन्नाकडे सार्वजनिक उत्पन्नाचा महत्वाचा घटक म्हणून पाहिले जाते. करेतर महसूलाचे पुढील मार्ग आहेत.

१) व्याजापासून मिळणारे उत्पन्न.

२) वित्तीय सेवांपासून मिळणारे उत्पन्न.

३) सामाजिक व सांस्कृतिक सेवांपासून मिळणारे उत्पन्न.

४) सार्वजनिक उद्योगातील लाभांश व नफा.

५) आर्थिक सेवांपासून मिळणारे उत्पन्न.

६) इतर सामान्य सेवांपासून मिळणारे उत्पन्न.

कर उत्पन्नापेक्षा करेतर उत्पन्नाचे काही फायदे आहेत. करपध्दतीमुळे करदात्याची प्रेरणा कमी होते. जास्त कर दरामुळे कराचा भार प्रत्यक्ष करदात्यावर पडतो, त्यामुळे काम, बचत आणि गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर आणि क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो. परंतु करेतर महसूल गोळा करताना असे घडत नाही, शिवाय करपध्दती ठरविण्यात येणाऱ्या समस्याही येत नाहीत करेतर महसूलाची जबाबदारीही टाळता येत नाही. कारण लाभधारकाला मिळालेल्या लाभाच्या प्रमाणात त्याला किंमत मोजावी लागते. शिवाय सरकारी वस्तू व सेवा बाजारपेठेत विकून सरकारला महसूल वसूल करता येतो. करेतर उत्पन्नाचे वाढत जाणारे प्रमाण हे सरकारचा अर्थव्यवस्थेत वाढत जाणाऱ्या सहभागाचे लक्षण आहे.

II. भांडवली उत्पन्न :–

केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकातील भांडवली खात्यावरील जमा बाजूस भांडवली उत्पन्न म्हणतात. भांडवली उत्पन्नामध्ये पुढील मार्गाचा समावेश होतो.

१. कर्ज वसूली :–

राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग यांच्याकडून घेतलेल्या कर्जाच्या वसुलीचा समावेश भांडवली खात्यामध्ये केला जातो.

२. खुल्या बाजारातील कर्जरोख्यांची विक्री :–

देशामध्ये एखादा प्रकल्प उभा करत असताना केंद्र सरकारला पैशाची आवश्यकता भासली तर ती खुल्या बाजारातून केली जाते. यासाठी केंद्र सरकार खुल्या बाजारात दीर्घकाळासाठी कर्जरोख्यांची विक्री करून भांडवल उभे करते. या कर्जरोख्यांची सुरक्षितता देशामध्ये सर्वाधिक असते.

३. सूक्ष्म बचती :–

देशामध्ये असणाऱ्या सर्व सूक्ष्म बचतीचा समावेश भांडवलात होतो. कधी–कधी केंद्र सरकारला सूक्ष्म बचतीचा आधार घ्यावा लागतो आणि यातून भांडवलउभारणी केली जाते.

४. परकीय कर्ज :–

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, परकीय सरकारे, संस्था किंवा व्यक्तींकडून घेतलेल्या कर्जाचा समावेश भांडवली उत्पन्नात होतो.

५. इतर भांडवली उत्पन्न :–

सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, राज्य भविष्यनिर्वाह निधी, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधीच्या विशेष ठेवी, विशेष रोखे, संकीर्ण भांडवली उत्पन्न यांचा समावेश भांडवली उत्पन्नात होतो.

❑ भारतीय करपध्दती :–

सार्वजनिक उत्पन्नाचा कर हा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. अर्थव्यवस्थेमध्ये सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी समग्रलक्षी अर्थव्यवस्थेत कर हे एक महत्वाचे साधन आहे. ज्या लोकांचे उत्पन्न जास्त आहे अशा लोकांवर सरकार कर आकारते आणि कमी उत्पन्न गटातील लोकांना सामाजिक सुरक्षितता प्रदान करते. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत बचत वाढविण्यासाठी आणि अनावश्यक गुंतवणूक कमी करण्यासाठी कराचा उपयोग केला जातो.

भारतात कर वसूल करण्याचा अधिकार केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना देण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २६८ ते कलम ३०० पर्यंत केंद्र व राज्य यातील वित्तीय संबंधांचे विश्लेषण केले आहे.

भारतीय कर व्यवस्थेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

१. केंद्र सरकारचे कर :–

भारतीय राज्यघटनेत काही कर आकारण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारला देण्यात आला आहे. यापैकी प्रत्यक्ष करात उत्पन्न कर, निगम कर, संपत्ती कर यांचा समावेश होतो. अप्रत्यक्ष करात निर्यात कर (सीमा शुल्क), केंद्रिय उत्पादन शुल्क, केंद्रिय वस्तू व सेवा कर इ.चा समावेश होतो.

२. राज्य सरकारचे कर :-

भारतीय राज्यघटनेत काही कर आकारण्याचा व वसूल करण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आला आहे. राज्य सरकारच्या मालकीच्या प्रत्यक्ष करात जमीन महसूल, कृषी उत्पन्न कर, व्यवसाय कर इत्यादींचा समावेश होतो. अप्रत्यक्ष करांमध्ये राज्य वस्तू व सेवा कर (State Goods and Service Tax), राज्य उत्पादन शुल्क, मनोरंजन कर, मुद्रांक व नोंदणी शुल्क, वीज कर, वाहन कर इत्यादीचा समावेश होतो.

३. स्थानिक स्वराज्य संस्था कर :-

स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थानिक पातळीवरील कार्ये करता येण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न गोळा करण्यासाठी काही कर आकारण्याचा आणि तो वसूल करून त्याचा विनियोग करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्यक्ष करात संपत्ती कर व अप्रत्यक्ष करात जकात कराचा समावेश होतो.

भारतामध्ये कर आकारणी, त्याची वसूली तसेच विनियोग करण्याचा अधिकार यांचा विचार करून करांचे केंद्रिय कर, राज्य कर व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीचे कर अशी विभागणी करण्यात आली आहे.

✡ भारतीय कर व्यवस्थेची वैशिष्ट्ये :-

भारतीय कर व्यवस्थेचे अवलोकन केल्यास त्यामध्ये पुढीलप्रमाणे वैशिष्ट्ये दिसून येतात.

१) कर व्यवस्थेत प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष करांचा समावेश होतो.

२) एकूण कररूपी उत्पन्नात प्रत्यक्ष कराचा हिस्सा जास्त आहे.

३) भारतीय करपध्दती प्रगतीशील स्वरूपाची आहे.

४) एकूण कर व्यवस्थेत कृषी क्षेत्रासाठी अधिक सवलती देण्यात आल्या आहेत.

५) भारतीर कर पध्दती ही लवचिक स्वरूपाची आहे.

६) कर आकारणी करताना 'देयक्षमता' (Ability to Pay) तत्त्वाचा वापर केला जातो.

७) एकूण कररूपी उत्पन्नाचे देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी (Tax GDP Ratio) असलेले प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय करपध्दतीमध्ये प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कराचा समावेश होतो. कर लागू करण्याची पध्दती, कराचे स्वरूप आणि कर वसूल करण्याची पध्दत यामुळे कराचे खालीलप्रमाणे प्रकार पडतात.

अ) प्रत्यक्ष कर :-

जेव्हा कराघात आणि करभार एकाच व्यक्तीवर पडतो तेंव्हा त्याला प्रत्यक्ष कर म्हणतात. एकूण सार्वजनिक उत्पन्नामध्ये या कराचा हिस्सा मोठा आहे. ज्या व्यक्तीवर हा कर बसवला जातो, त्यालाच हा कर भरावा लागतो. म्हणून या कराचे संक्रमण होत नाही. ज्याच्यावर हा कर बसविला जातो, त्याला कर भरणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असते. प्रत्यक्ष करांमध्ये पुढील करांचा समावेश होतो.

१. उत्पन्न कर :-

वैयक्तिक प्राप्तिकर हा केंद्र सरकारकडून आकारला जातो. हा कर सर्व लोकांवर सारख्या प्रमाणात आकारला जात नाही तर त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात आकारला जातो, यासाठी 'देयक क्षमता' तत्वाचा वापर केला जातो. ज्या व्यक्तींचे उत्पन्न जास्त आहे, अशा लोकांवर जास्त तर तुलनेने कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांवर कमी प्रमाणात कर आकारला जातो.

भारतात सर्वप्रथम १८६० मध्ये वैयक्तिक उत्पन्न कर लावण्यात आला. त्यावेळीपासून आजपर्यंत तो सुरू आहे. आयकर अधिनियम १८६१ नुसार आयकर लावण्यात येतो. सन १८८६ मध्ये भारतीय उत्पन्न कायद्याअंतर्गत त्याला कायमस्वरूपी स्थान प्राप्त झाले.

१९७२ च्या के.एन.राज कमिटीच्या शिफारशीनुसार १९७३-७४ मध्ये कृषी उत्पन्नावर आयकर लागू केला. पण नंतरच्या काळात कृषी उत्पन्न आयकराच्या कक्षेतून बाजूला काढले. सन १९१८-१९ च्या अंदाजपत्रकानुसार, ज्या व्यक्तीचे उत्पन्न २,५०,००० किंवा त्यापेक्षा कमी आहे त्यांना आयकरातून सूट देण्यात आली आहे. ज्या लोकांचे उत्पन्न २,५०,००० ते ५,००,००० आहे त्यांना १०% आणि ५,००,००० ते १०,००,००० उत्पन्न गटातील लोकांना २०% आणि १०,००,००० आणि त्यापेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लोकांना ३०% आयकर भरणे बंधनकारक आहे.

भारतातील वाढते औद्योगिकीकरण आणि जलद आर्थिक विकासामुळे लोकांच्या उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे, त्यामुळे केंद्र सरकारला मिळणाऱ्या आयकरात वाढ होत आहे. १९५०-५१ मध्ये आयकरापासून १४० कोटी उत्पन्न मिळाले. १९९०-९१ मध्ये १२५० कोटी वर २०११-१२ मध्ये १,३९,१०२ कोटी उत्पन्न मिळाले आणि २०१६-१७ मध्ये ३,४५,७७६ कोटी एवढे उत्पन्न मिळाले.

देय क्षमता तत्वानुसार कमी उत्पन्न गटातील लोक आयकराच्या कक्षेतून वगळण्यात आले आहेत. आयकरासाठी आवश्यक असणाऱ्या किमान उत्पन्न पातळीची मर्यादा वेळोवेळी बदलण्यात आली आहे. १९९५-९६ मध्ये किमान उत्पन्न पातळी ४०,००० रु. होती तर २०१८-१९ मध्ये ती

२,५०,००० एवढी आहे.

२. **निगम कर** (Corporation Tax) :-

कंपनीच्या नफ्यावर लादल्या जाणाऱ्या कराला निगम कर म्हणतात. या कराचा दर देशी आणि परकीय उद्योगांसाठी वेगवेगळा आहे. १९९८-९९ मध्ये देशी कंपन्यांच्या निव्वळ नफ्यावर ३५% तर परकीय कंपन्यांच्या निव्वळ नफ्यावर ४८% दराने कर आकारण्यात आला.

एकेकाळी निगम कराचा दर खूप जास्त होता. पण १९९०-९१ मध्ये भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले आणि औद्योगिकीकरणाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी या कराच्या दरात घट करण्यात आली. यामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये अनुकूल परिणाम झाला आणि विकास प्रक्रियेला चालना मिळाली. निगम कराचा दर कमी केल्यामुळे परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यास मदत झाली.

१९५०-५१ मध्ये निगम करापासून मिळालेले उत्पन्न ४० कोटी होते. तर १९८०-८१ मध्ये यात १३१० कोटीपर्यंत वाढ झाली. आर्थिक नियोजन आणि जलद औद्योगिकीकरणामुळे २००१-०२ मध्ये ३६,६१० कोटी एवढे उत्पन्न वाढले. २०१५-१६ मध्ये ४,७०,६२८ कोटी एवढे निगम करापासून उत्पन्न मिळाले.

३. **व्याज कर :-**

व्याज कर कायदा १९७४ नुसार व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे आणि अग्रिमापासून मिळणाऱ्या एकूण व्याज रकमेवर हा कर आकारला जातो. १९७४-७५ मध्ये व्याज करापासून केंद्र सरकारला ११ कोटी एवढे उत्पन्न मिळाले, ते १९७७-७८ मध्ये ११५ कोटी एवढे वाढले. सरकारने १९८५ साली हा कर रद्द केला पण महागाई कमी करण्यासाठी तो पुन्हा सुरू केला. व्यापारी बँका, बिगर बँक वित्तीय संस्था, सार्वजनिक वित्तीय संस्था इत्यादींच्या व्याजावर हा कर आकारण्यात येतो.

४. **संपत्ती कर :-**

व्यक्तीने जी संपत्ती मिळवली आहे, त्यावर हा कर आकारण्यात येतो. प्रत्येक विभक्त कुटुंबावरती त्यांच्याकडे असणाऱ्या संपत्तीनुसार कर आकारण्यात येतो. समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी हा कर प्रभावशाली आहे. संपत्ती कर १९५७ साली सुरू करण्यात आला. सुरूवातीला हा कर व्यक्ती आणि प्रमंडळाच्या शुद्ध संपत्तीवर बसविण्यात आला. १९६० मध्ये प्रमंडळावरील संपत्ती कर रद्द करण्यात आला. सर्वच संपत्ती धारकांवर हा कर लागू होत नाही, तर ज्यांची संपत्ती १५ लाखापेक्षा जास्त आहे, त्याच्यावर संपत्ती कर लागू होतो. एकेकाळी १५% एवढा सर्वाधिक संपत्ती कर होता, पण सध्या संपत्ती कर ०.५% ते २% दरम्यान हा कर स्थिर आहे. १९९२-९३ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी शेअर्ससारख्या उत्पादक मालमत्तेवरील संपत्ती कर रद्द

केला आणि संपत्ती कर अनुत्पादक मालमत्तेपुरता मर्यादित ठेवला. उदा. घर, दागिने इ. १९७०-७१ मध्ये केंद्र सरकारला संपत्ती करापासून १५ कोटी रु. उत्पन्न मिळाले. तर २००३-०४ मध्ये १४५ कोटी एवढे उत्पन्न मिळाले.

५. **खर्च कर** (Expenditure Ta(x) :-

प्रा. काल्डोर यांच्या शिफारशीनुसार भारतात १९५८ मध्ये सर्वप्रथम हा कर लागू करण्यात आला. त्यांच्या मते, उत्पन्नापेक्षा खर्च हा व्यक्तीच्या करदेय क्षमतेचा आधार आहे. भारतासारख्या असंघटित क्षेत्राचे प्राबल्य असणाऱ्या देशात उत्पन्नापेक्षा खर्चाचे मोजमाप करणे सोपे आहे. एकीकृत कर योजनेच्या अंतर्गत हा कर बसविण्यात आला. पण तो १९६२-६३ मध्ये रद्द करण्यात आला. टी.टी. कृष्णम्माचारी यांच्या शिफारशीनुसार खर्च कर कायदा-१९८७ पासून लागू करण्यात आला. यानुसार हॉटेलमधील खर्च, हॉटेलमधील राहणाऱ्या खोलीचे भाडे प्रतिदिन ४०० रु. पेक्षा जास्त असेल तर १०% ते २०% एवढा कर होता. हॉटेलमधील अनेक सेवा, उदा. वातानुकूलित खोली, त्या सेवांवर कर आकारणे म्हणजे सेवा कर, सेवा कर हा प्रगतीशील कर आहे. १९५०-५१ मध्ये या करापासून उत्पन्न १३० कोटी होते, ते १९८०-८१ मध्ये १९१० कोटींपर्यंत वाढले.

६. **देणगी कर** (Gift Tax) :-

मालमत्ता कर, संपत्ती कर आणि खर्च करास पूरक कर म्हणून देणगी कर आकारला जातो. वरील करांमधील होणारी करचुकवेगिरी नष्ट करण्यासाठी हा कर १९५८ मध्ये सुरू केला. प्रत्येक आर्थिक वर्षात मागील वर्षी दिलेल्या देणगीवर देणगी कर लागू होतो. हा कर प्रगतीशील स्वरूपाचा कर आहे. १९९०-९१ पासून हा कर देणगी देणाऱ्यावर न लावता देणगी स्वीकारणाऱ्या व्यक्तीवर लावण्यात येऊ लागला. देणगी कर हा देणगी दिलेल्या वस्तूच्या किंमतीनुसार ठरतो. देणगी करापासून मिळणारे उत्पन्न, प्रतिवर्षी १० कोटी एवढे कमी होते. शेवटी १९९८-९९ मध्ये केंद्रीय वित्तमंत्री यशवंत सिन्हा यांनी हा कर रद्द करत असल्याची घोषणा केली.

७. **मालमत्ता कर** (Estate Duty) :-

वारसाहक्कानुसार व्यक्तीला मिळणारी जंगम मालमत्ता आणि भांडवलाच्या हस्तांतरणावर मालमत्ता कर बसविला जातो. हा कर केंद्र सरकार वसूल करते, पण त्याचे पूर्ण उत्पन्न राज्यांमध्ये विभागून दिले जाते. १९५३-५४ मध्ये सर्वप्रथम हा कर बसविण्यात आला. मालमत्ता कराचे प्रमाण ४% पासून ४०% पर्यंत हस्तांतरित होणाऱ्या संपत्तीच्या मूल्यानुसार ठरते. हा कर पूर्णपणे प्रगतीशील आहे. कारण संपत्तीचे मूल्य जसे वाढत जाते, तसे कराचे प्रमाण वाढत जाते. १९८५-८६ मध्ये व्ही.पी. सिंग वित्तमंत्री असताना हा कर रद्द केला होता, कारण कराच्या उत्पन्न रक्कमेपेक्षा कर वसूल करण्यासाठी लागणारा खर्च मोठा होता. सन १९९४-९५ पासून मालमत्ता कर फक्त जमिनीपासून

मिळणारा महसूल, मुद्रांक आणि नोंदणी फीपुरता मर्यादित ठेवला. जमीन हस्तांतरित करत असताना ज्याच्या नावे जमीन होते, त्याच्यावर हा कर लागू होतो.

ब) अप्रत्यक्ष कर :–

ज्या करपध्दतीमध्ये कराघात एका व्यक्तीवर आणि करभार दुसऱ्या व्यक्तीवर पडतो, त्याला अप्रत्यक्ष कर म्हणतात. अप्रत्यक्ष कराचे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमण होते. ज्या व्यक्तीवर कर लादला जातो त्याने तो भरावा अशी अपेक्षा असते. पण प्रत्यक्षात कराचे संक्रमण होत असल्याने दुसरीच व्यक्ती कर भरत असतो. म्हणजे कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी एका व्यक्तीची असते. पण तो कर दुसरीच व्यक्ती भरत असते. अप्रत्यक्ष कर पुढीलप्रमाणे आहेत.

१. **केंद्रीय अबकारी कर** (Central Excise Tax) :-

भारतीय राज्यघटनेनुसार भारतात कोठेही उत्पादित होणाऱ्या वस्तूवर अबकारी कर बसविण्याची तरतूद आहे (अल्कोहोल व अंमली पदार्थ सोडून). केंद्रीय अबकारी करापासून मिळणारे उत्पन्न वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र आणि राज्य सरकारमध्ये वाटले जाते. दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय अबकारी कर उत्पन्नापैकी ४७.५% उत्पन्नाचा वाटा राज्यांना दिला जातो. केंद्र सरकार विशिष्ट वस्तूंवर विशेष अबकारी करही लाऊ शकते. ज्या वस्तू व्यापाराच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत, अशा वस्तूंवर केंद्र सरकार विशेष अबकारी कर लावते. साखर, साबण, कपडे, चप्पल, टायर, चहा, कॉफी, सिमेंट, पेपर, कागद, टी.व्ही., इलेक्ट्रीक वस्तू, खते, फर्निचर इ. वस्तूंवर केंद्रीय अबकारी कर आकारला जातो. केंद्र सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नात अबकारी करापासून मिळणारे उत्पन्न सर्वात जास्त आहे.

१९५०-५१ मध्ये केंद्रीय अबकारी करापासून ६७ कोटी रु. उत्पन्न मिळते. १९८०-८१ मध्ये यात ६५०० कोटी तर १९९०-९१ मध्ये २४५७० कोटी एवढी वाढ झाली. २०१०-११ मध्ये १,३७,७०० कोटी एवढे उत्पन्न मिळाले.

२. **सेवा कर** (Service Tax) :-

केंद्र सरकारने १९९५-९६ मध्ये सर्वप्रथम हा कर लागू केला. भारताच्या एकूण उत्पन्नात सेवा क्षेत्राचा सहभाग वाढत आहे, त्यामुळे केंद्र सरकारने सेवेच्या उत्पादनावर सेवा कर लागू केला. वीज सेवा, टेलीफोन सेवा, दलाली इ. सेवांवर सेवा कर लागू होतो. १९९४-९५ मध्ये सेवा करापासून ४०७ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. २००१-०२ मध्ये २६१० कोटी एवढे उत्पन्न होते.

३. **आयात कर** (Custums Duty) :-

भारतामध्ये आयात होणाऱ्या आणि भारतामधून विदेशात निर्यात होणाऱ्या वस्तूंवर आयात-

निर्यात कर बसविला जातो. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धा लक्षात घेऊन अलिकडच्या काळात काही वस्तूंवरील निर्यात कर रद्द केले आहेत. तर देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयात कर लागू केले आहेत. त्यामुळे निर्यात करापेक्षा आयात करापासून जास्त उत्पन्न मिळते. आयात कर हा निर्यात करापेक्षा जास्त उत्पादक आहे. भारतात आयात होणाऱ्या लोखंड, पोलाद, केमिकल, औषधे, खते इ. वस्तूंवर आयात कर लावण्यात येतो. आयात कर बसविल्यामुळे देशी उद्योगांना संरक्षण मिळते, त्याचबरोबर परकीय चलनाचीही प्राप्ती होते. संरक्षण धोरणामुळे खाद्य पदार्थ, कृषी यंत्र इ. वस्तू आयात करापासून मुक्त केल्या आहेत. १९८०-८१ मध्ये आयात-निर्यात करापासून ३४१० कोटी एवढे उत्पन्न मिळाले. १९९०-९१ मध्ये २१६४० कोटी उत्पन्न मिळाले. २०१०-११ मध्ये १,३५,८१२ कोटी एवढे उत्पन्न मिळाले.

✡ राज्य सरकारचे कर उत्पन्नाचे मार्ग :-

भारतीय राज्यघटनेनुसार केंद्र आणि राज्यांमध्ये प्रशासकीय आणि आर्थिक अधिकारांची विभागणी केली आहे. यानुसार राज्यांना राज्यसूचीमधील आणि संयुक्त सूचीमधील खात्यांवर कर लागू करण्याचा अधिकार दिला आहे. राज्य सरकारचे कर उत्पन्नाचे मार्ग पुढीलप्रमाणे :-

१. जमीन महसूल :-

हा कर भारतात ब्रिटीश काळापासून लागू आहे. या करापासून प्रत्येक राज्याला खूपच कमी उत्पन्न मिळते. एकेकाळी हा कर राज्य सरकारच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत होता.

२. जाहिरातींवरील कर :-

वृत्तपत्रे, पोस्टर्स, टी.व्ही. रेडिओ इ. ठिकाणी दाखवल्या जाणाऱ्या जाहिरातींवर कर आकारण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.

३. अल्कोहोल व इतर पेयांवरील अबकारी कर :-

हा कर राज्य सरकारच्या उत्पन्नामधील महत्त्वाचा स्रोत आहे. या करापासून प्रत्येक राज्याला मोठे उत्पन्न मिळते.

४. वीज कर :-

वीज कर हा राज्यांकडून आकारला जातो. ठराविक मर्यादित वीज वापर करमुक्त असतो आणि वीजवापर वाढला की वीज कर वाढत जातो. तसेच हा कर वेगवेगळ्या ग्राहकांसाठी वेगवेगळा असतो.

५. इतर कर :-

इतर करांपासून राज्य सरकारला मोठ्या प्रमाणावर कर उत्पन्न मिळते. यात वनविकास कर,

राज्य अधिभार आणि उपकर. स्टँप व नोंदणी फी इ.चा समावेश होतो.

वरील सर्व बाबींवरील कर हा राज्यांकडून आकारला जातो आणि वसूल करून त्याचा विनियोग केला जातो. राज्य सरकारकडील जवळजवळ सर्व अप्रत्यक्ष करांचा समावेश जीएसटीमध्ये केल्यामुळे त्यांचे उत्पन्न घटले आहे.

❀ **स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर उत्पन्न :–**

स्थानिक पातळीवर आर्थिक व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. पण या संस्थांना आपली कार्ये योग्य रितीने पार पाडण्यासाठी उत्पन्नाची गरज भासते. राज्यघटनेने स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी व विकासाची कामे करण्यासाठी काही कर नेमून दिले आहेत, ते पुढीलप्रमाणे :–

१) जमीन महसूल.

२) सामान्य मालमत्ता कर.

३) चित्रपटगृहांवरील कर.

४) पाणीपट्टी.

५) व्यवसाय कर.

६) करमणूक कर.

७) घरपट्टी.

८) वाहनांवरील कर.

९) प्रवासी वाहतूक कर.

१०) नफा कर.

वरील करांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांना कर महसूल प्राप्त होतो. या कर उत्पन्नामधून स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन चालते.

१.२.२ उत्पन्नातील कल : २०१० च्या दशकातील भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर

पुढील कोष्टकात भारताला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कररूपी उत्पन्नात कशा प्रकारे बदल होत गेला हे दाखवले आहे.

सन १९९०–९१ ते २०१६–१७ या वर्षातील भारतामधील महसुली उत्पन्न (कोटी रु.)

एकूण कर महसूल	१९९०–९१	२०००–०१	२००९–१०	२०१०–११	२०११–१२	२०१२–१३	२०१३–१४	२०१४–१५	२०१५–१६	२०१६–१७
१) प्रत्यक्ष कर	४३०४२	१३६६५९	४५६५३६	५६९८२९	६२९४८६	७४१८७७	८१५८५४	९०३६१५	९४७५०८	१०५४१०१
निगम कर	५३३५	२५१७८	२४४७२५	२९८६८८	३२२८१६	३५६३२६	३९४६७८	४२८९२५	४५२९७०	४९३९२४
मालमत्ता कर	३	०	०	०	०	१	०	०	०	०
व्याज कर	–१	४१४	४	०	३	६	८	६	०	०
संपत्ती कर	२३१	९१	५०५	६८७	७८७	८४४	१००७	१०८६	०	०
देणगी कर	३	०	१	०	१	१	१	०	०	०
जमीन महसूल	०	२	२	२	४	२६	५	३	७	७
खर्च कर	८०	२०१	–६२	२९	२१	१५	९	११	०	०
उत्पन्न कर	५३७७	३१७६४	१२२४१७	१३९१०२	१६४५२५	१९६८४४	२३७८७०	२५८३७४	२९१६५३	३४५७७६
२) अप्रत्यक्ष कर	३६१३३	८७२६४	२५६९३२	३५४५५६	४००७३८	४८२१७२	५०५१५५	५५६४७९	७१४९८१	७९११२१
आयात कर	२०६४४	३४१६३	८३३२४	१३३८१३	१४९३२८	१६५३४६	१७२०८५	१८८०१६	२०९५००	२३००००
केंद्रीय अबकारी कर	२४५१५	६८५२६	१०२९९१	१३७७०१	१४४९०१	१७५८४५	१६९४५५	१८९०३८	२८३३५३	३१७८६०
सेवा कर	––	१९६४	५८४२२	७१०१६	९७५०९	१३२६०१	१५४७८०	१६७९६९	२१००००	२३१०००
स्टँप व रजिस्ट्रेशन फी	३९	२२	८७	५३	१२८	१२९	१५९	१५८	१५९	१६४
विक्री कर	७६८	३२६	११७०	१४०६	१७८०	१९६८	२१७४	२२३८	२९०५	३०४४
वाहनांवरील कर	५७	२१	६०	७२	१५८	१४९	१६७	१६७	१६७	१६०
वीज कर	३	६	१४	१४	१६	१९	२४	२२	१३	१३
इतर	२९०	८९८	१०६३७	८०३७	६५४७	५६६२	५७९०	८३२९	८३२२	८३३९

Source : Indian Public Finance Statistics, 2016-17.

दशकभरातील केंद्र सरकारच्या महसुली प्राप्तीचे निरिक्षण केल्यास काही महत्त्वाच्या बाबी स्पष्ट होतात, त्या पुढीलप्रमाणे,

१. **प्रत्यक्ष कर :–**

(i) **प्रत्यक्ष कर :** २००९–१० मध्ये प्रत्यक्ष करापासून मिळणारे उत्पन्न ३,६७,५९५ कोटी होते, यात २०१६–१७ मध्ये ८,४९,७०७ कोटी एवढी वाढ झाली. या काळात प्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात दुपटीपेक्षा जास्त वाढ झाली.

(ii) **निगम कर :** प्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात सर्वात मोठा वाटा निगम कराचा आहे. निगम करापासून २००९–१० मध्ये २,४७,७२५ कोटी एवढे तर २०१२–१३ मध्ये ३,५६,३२६ कोटी आणि २०१६–१७ मध्ये ४,९३,९२४ कोटी एवढे उत्पन्न मिळाले, निगम करापासून वाढते. उत्पन्न हे भारतातील वाढत्या औद्योगिकरणाचे दर्शक आहे.

(iii) **वैयक्तिक प्राप्तिकर :** वैयक्तिक प्राप्तीकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढीची प्रवृत्ती दिसून येत आहे. वाढत्या आर्थिक विकासाचा अनुकूल परिणाम लोकांच्या दरडोई उत्पन्नावर होत आहे. वैयक्तिक प्राप्तिकरापासून २००९–१० मध्ये १,२२,४१७ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. तर २०१२–१३ मध्ये १,९६,८४४ कोटी आणि २०१६–१७ मध्ये ३,४५,७७६ कोटी एवढी वाढ झाली.

(iv) **इतर कर :** कोष्टकानुसार मालमत्ता कर, देणगी कर, खर्च कर, व्याज कर इ. करांपासून नाममात्र उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे या करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा फारसा परिणाम सार्वजनिक उत्पन्नावर होत नाही.

२. **अप्रत्यक्ष कर :–**

(i) **आयात कर :** गेल्या दशकभरात आयात करामध्ये वाढीची प्रवृत्ती निदर्शनास येत आहे. आयात करापासून २००९–१० मध्ये ८३,३२४ कोटी एवढे उत्पन्न मिळाले यात वाढ होऊन २०१२–१३ मध्ये १,६५,३४६ कोटी आणि २०१६–१७ मध्ये २,३०,००० कोटी एवढे उत्पन्न मिळाले.

(ii) **केंद्रीय अबकारी कर :** केंद्रीय अबकारी करापासून २००९–१० मध्ये १,०२,९९१ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. यात २०१२–१३ मध्ये १,७५,८४५ कोटी एवढी तर २०१६–१७ मध्ये ३,१७,८६० कोटी एवढी वाढ झाली. केंद्रीय अबकारी करापासून मिळालेले सर्व उत्पन्न राज्यांमध्ये वाटून दिले जाते त्यामुळे केंद्र सरकारच्या उत्पन्नात काहीही भर पडत नाही.

(iii)**सेवा कर :** सेवा करापासून केंद्र सरकारला २००९-१० मध्ये ५८,४२२ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. २०१२-१३ मध्ये १,३२,६०१ कोटी आणि २०१६-१७ मध्ये २,३१,००० कोटी एवढे उत्पन्न मिळाले. गेल्या दशकभरात सेवा क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नात चार पटीपेक्षा जास्त वाढ झाली. भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा वाढता सहभाग यातून दिसून येतो.

(iv) **इतर कर :** विक्री करातही वाढीची प्रवृत्ती दिसून येत आहे. विक्री करापासून २००९-१० मध्ये ११७० कोटी, २०१२-१३ मध्ये १९६८ कोटी आणि २०१६-१७ मध्ये ३०४४ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. राज्य अबकारी कर, स्टँप आणि नोंदणी कर इ.पासून कमी प्रमाणात उत्पन्न मिळाले.

(v) **एकूण उत्पन्न :** एकूण अप्रत्यक्ष करांपासून २००९-१० मध्ये २,५६,९३२ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. २०१२-१३ मध्ये ४,८२,१७२ कोटी आणि २०१६-१७ मध्ये ७,९१,१९१ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. अप्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात दुपटीपेक्षाही जास्त वाढ झाली आहे.

१.२.३ सन १९९१ पूर्वीच्या करविषयक सुधारणांचा संक्षिप्त आढावा

कर सुधारणा ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. आर्थिक विकास, तंत्रज्ञानविषयक सुधारणा आणि सरकारी धोरणांमधील बदल यामुळे कर रचनेमध्ये बदल करणे क्रमप्राप्त होते. वित्तीय धोरण आणि चलनविषयक धोरणांमध्ये बदल होत असताना करविषयक सुधारणा करणे आवश्यक असते, त्यामुळे करविषयक धोरणातील सुधारणा ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

१. जॉन मथाई समिती १९५३ :-

अगोदरच्या कायद्यामध्ये असणाऱ्या त्रुटी लक्षात घेऊन भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५३ साली जॉन मथाई यांच्या अध्यक्षतेखाली कर चौकशी समिती नेमली. चालू करापासूनच्या उत्पन्नात वाढ व्हावी आणि त्याचबरोबर कर उत्पन्नाचे नवीन मार्ग शोधून काढण्यासाठी या समितीची स्थापना केली. या समितीने केंद्र व राज्य सरकारच्या करांचा अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. त्यांच्या शिफारशीनुसार करपध्दतीमध्ये अनेक बदल केले गेले. उत्पन्न कराची मर्यादा ४२०० वरून कमी करून ३००० केली. तसेच कृषी उत्पन्न कर रद्द करून त्याऐवजी विक्रीकरामध्ये वाढ करण्याची शिफारस केली. देणगी कर, संपत्ती कर, व्याज कर, रद्द करण्याची शिफारस केली. तसेच अबकारी करामध्ये वाढ करण्याची शिफारस केली.

२. प्रा. काल्डोर समिती १९५६ :-

भारताने १९५२ पासून आर्थिक नियोजन आणि पंचवार्षिक योजनांचा अवलंब केला. अल्पविकसित राष्ट्रांमध्ये कर हे सरकारचा हातातील सर्वात महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे भारताची वित्तीय संरचना आणि करपध्दती यांचा अभ्यास करण्यासाठी प्रा. काल्डोर समितीची स्थापना करण्यात आली. जलद आर्थिक विकासासाठी उत्पन्नाच्या नव्या स्रोतांची आवश्यकता होती. प्रा. काल्डोर यांच्या मतानुसार भारतामधील प्रचलित करपध्दती अपुरी व कमी उत्पन्न देणारी आहे. त्यांनी प्रत्यक्ष कराला अधिक महत्त्व दिले. त्यांनी खर्च कर, देणगी कर, संपत्ती कर लागू करण्याची शिफारस केली.

३. भूतलिंगम समिती १९६७ :-

प्रचलित कररचनेमधील गुंतागुंत कमी करून कररचनेमध्ये साधेपणा आणि सोईस्करपणा यावा यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने सार्वजनिक उद्योग आणि इतर उद्योगांमध्ये प्रचलित वेगवेगळा निगम कर रद्द करण्याची शिफारस केली. लाभांश कर आणि सरचार्ज रद्द करण्याची शिफारस केली. सार्वजनिक अबकारी व्याप्ती वाढवण्यासाठीही काही शिफारशी केल्या. देणगी कर आणि संपत्ती कराचे समर्थन केले.

४. वांच्छु समिती १९७२ :-

भारतात प्रत्यक्ष कर चौकशी समितीची स्थापना १९७० मध्ये केली गेली. या समितीने आपला अहवाल १९७२ मध्ये सादर केला. या रिपोर्टनुसार १९६८-६९ मध्ये १४०० कोटी एवढी प्रत्यक्ष कराची करचुकवेगिरी झाली होती. करचुकवेगिरी कमी करण्यासाठी या समितीने काही शिफारशी केल्या. यानुसार खर्च कर पुन्हा एकदा लागू केला. वांच्छु समितीने करचुकवेगिरी टाळण्यासाठी सीमांत उत्पन्न कराची शिफारस केली होती. हा दर ९७.७५ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची शिफारस केली होती.

५. डॉ. एन. के. राज समिती १९७२ :-

१९७२ मध्ये डॉ. एन. के. राज यांच्या अध्यक्षतेखाली कृषी संपत्ती व उत्पन्न कर समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने कृषी उत्पन्नावर कर लावण्याची शिफारस केली होती. प्रत्यक्ष कराऐवजी जमीनधारण क्षेत्रावर कर लावण्याची शिफारस केली होती.

६. एन. के. झा समिती १९७८ :-

१९७८ मध्ये एन. के. झा यांच्या अध्यक्षतेखाली अप्रत्यक्ष करांची चौकशी करणारी समिती स्थापन करण्यात आली. अप्रत्यक्ष करपध्दतीत असणारे दोष शोधून काढणे आणि ते दूर करण्यासाठी शिफारस करणे या कार्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने मूल्यवर्धित कर

लागू करण्याची शिफारस केली. मूल्यवर्धित करामध्ये उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये वस्तूवरील कर मूल्य वाढेल तसा वाढत जातो. तसेच आयात निर्यात कर आणि अबकारी करामध्ये काही सुधारणा करण्याची शिफारस केली होती.

१.२.४ सन १९९१ नंतरच्या करविषयक सुधारणांचा तपशीलवार आढावा

❑ चेलिहा समिती १९९२ :-

भारताने १९९१ मध्ये नव्या आर्थिक धोरणांचा अवलंब केला. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या नव्या धोरणांमुळे अर्थव्यवस्थेचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. विस्तारित होणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे कर संरचनेतही बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यासाठी भारत सरकारने ऑगस्ट १९९१ मध्ये डॉ. आर. जे. चेलिहा यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधारणा समितीची स्थापना केली. या समितीने आपला अहवाल १९९२ मध्ये सादर केला. खाजगी क्षेत्राचा विस्तार होत असताना करव्यवस्था कार्यक्षम आणि न्याय होणे आवश्यक होते. या समितीने प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष करांबाबत ज्या सुधारणा सुचवल्या, त्या पुढीलप्रमाणे :-

१. करदर कमी करून विस्तार वाढवणे :-

प्रत्यक्ष कर पध्दती अधिक परिणामकारक करण्यासाठी करांचे दर कमी करणयची शिफारस चेलिहा समितीने केली. यामुळे कर चुकवेगिरीला आळा बसेल. त्याचबरोबर प्रत्यक्ष करातील कमीत-कमी दर आणि सीमांत कर यातील फरक कमी करण्याची शिफारस केली. करांचे दर कमी केल्यामुळे सार्वजनिक उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा समितीला होती.

२. दुहेरी कराला आळा :-

निगम कर भरताना बऱ्याचवेळा तो दुहेरी भरण्याची शक्यता असते. कंपनी निगम कर भरते आणि त्याचवेळी कंपनीच्या मालकांना याच उत्पन्नावर वैयक्तिक प्राप्तिकरही भरावा लागतो. चेलिहा समितीने कंपनीच्या नफ्यावर वैयक्तिक प्राप्तिकर न आकारण्याची शिफारस केली.

३. वेगवेगळा निगम कर रद्द करणे :-

प्रचलित असणारा देशी उद्योग आणि परकीय उद्योग यांच्यासाठी वेगवेगळा निगम कर रद्द करण्याची शिफारस चेलिहा समितीने केली. परकीय गुंतवणूकीला चालना देण्यासाठी दोन्ही प्रकारच्या उद्योगसंस्थांना सारखाच करदर आकारण्याची शिफारस केली. ४०% पर्यंत करदर आकारण्याची शिफारस केली. अतिरिक्त अधिभारही रद्द केला.

४. व्याजकरामध्ये सुसूत्रीकरण :-

चेलिहा समितीने दीर्घकालीन भांडवलावरील व्याजदरामध्ये सुसूत्रता आणण्याची गरज स्पष्ट

केली. तसेच अल्पकालीन आणि दीर्घकालीन भांडवली साधनांवर वेगवेगळा व्याजकर आकारण्याची शिफारस केली. कारण दीर्घकालीन भांडवलावर महागाईचा परिणाम होत नाही.

५. संपत्ती करामध्ये सुसूत्रता :–

उत्पादक आणि अनुत्पादक संपत्तीवर वेगवेगळा संपत्ती कर आकारण्याची शिफारस चेलिहा समितीने केली. चलन बाजार आणि भांडवल बाजारात गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आवश्यक असते, त्यामुळे शेअर्स, सरकारी कर्जरोखे इ. उत्पादक संपत्तीवर संपत्ती कर न आकारण्याची शिफारस समितीने केली.

६. जकातीमध्ये कपात :–

जकातीच्या बाबतीत पुढीलप्रमाणे महत्त्वाचे बदल करण्याची शिफारस चेलिहा समितीने केली.

(i) जकातीच्या सर्वसाधारण पातळीत कपात करणे.

(ii) वेगवेगळ्या जकात दरात असणारी तफावत कमी करणे.

(iii) जकातीच्या बाबतीत असणाऱ्या सूट आणि सवलती रद्द करणे.

(iv) जकाती कमी करताना देशी उद्योगांचे नुकसान होणार नाही आणि देशांतर्गत बाजारपेठेत ते टिकून राहतील याकडे सरकारने लक्ष द्यावे.

७. अबकारी करामध्ये सुसूत्रीकरण :–

१९९१ च्या आर्थिक सुधारणा करण्यापूर्वी प्रत्येक वस्तूवर निश्चित अबकारी कर लावला जात होता. चेलिहा समितीने निश्चित कराऐवजी वस्तूच्या मूल्यानुसार कर लावण्याची शिफारस केली. यामुळे वस्तूची किंमत जास्त असेल तर अबकारी करातही वाढ होईल.

८. अप्रत्यक्ष करांमध्ये सुधारणा :–

चेलिहा समितीने कमीत कमी प्रकारचे अप्रत्यक्ष कर लावण्याची शिफारस केली. तसेच अप्रत्यक्ष करांचे प्रमाण २०% पेक्षा जास्त नसावे.

❑ चेलिहा समितीचे परिणाम :–

चेलिहा समितीने सुचवलेल्या सुधारणा सरकारने दोन टप्प्यांमध्ये स्विकारल्या. या शिफारशींमुळे भारतात करपध्दतीचा विस्तार झाला. अधिकाधिक लोक करांच्या कक्षेत आले. यामुळे कर आणि राष्ट्रीय उत्पन्न यांचे गुणोत्तर वाढले. प्रत्यक्ष कराचे एकूण कर उत्पन्नाशी प्रमाण १९९०-९१ ला १९% होते, ते १९९५-९६ ला ४८.८% एवढे वाढले. प्रत्यक्ष कर आणि राष्ट्रीय उत्पन्न यांचे गुणोत्तरही २.१% वरून ५.७% एवढे वाढले. १९९४-९५ मध्ये छोटे उद्योग आणि सेवाही

आयकराच्या कक्षेत आल्या. निगम कर देशी उद्योगांना ३०% आणि परकीय उद्योगांना ४०% एवढा निश्चित केला. अप्रत्यक्ष करांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी वस्तूच्या मूल्यानुसार कर लावण्यात येऊ लागला.

❑ केळकर समिती २००२

१९९१ मध्ये भारताने नव्या आर्थिक धोरणांचा स्विकार केला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अर्थव्यवस्थेत परकीय गुंतवणूकीसह नवे तंत्रज्ञानही येऊ लागले. या नव्या तंत्रज्ञानामुळे अर्थव्यवस्थेत अमूलाग्र बदल होऊ लागले. वाढती परकीय गुंतवणूक, वाढते राष्ट्रीय उत्पन्न आणि अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप यामुळे करपध्दतीमध्येही सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली. केंद्र सरकारने २००२ मध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करपध्दतीचा अभ्यास करण्यासाठी विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यदलाची नेमणूक केली. या समितीने भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करपध्दतीचा अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. या समितीने सुचवलेल्या काही महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे :-

१. **वैयक्तिक प्राप्तीकर :** वैयक्तिक प्राप्तीकराची मर्यादा १ लाख रु.पर्यंत वाढवण्याची शिफारस केळकर समितीने केली. जेष्ठ नागरिकांना यात सवलत देण्याचीही शिफारस होती. वैयक्तिक उत्पन्नावरील अधिभार रद्द केला. गृहकर्जावर २% सबसिडी दिली.

२. **निगम कर :** देशी उद्योगांसाठी निगम कराची मर्यादा ३०% आणि परकीय उद्योगांसाठी ३५% एवढी ठेवली. लाभांश आणि भांडवली लाभावरील कर रद्द केला. मशीन आणि यंत्रसामग्रीच्या घसाऱ्याचा दर वाढवला. किमान पर्यायी दर रद्द केला.

३. **संपत्ती कर :** केळकर समितीने संपत्ती कर रद्द करण्याची शिफारस केली. अनुत्पादक संपत्तीवर लागू असणारा हा कर रद्द केला जावा अशी समितीची शिफारस होती. त्याचबरोबर दीर्घकालीन भांडवली साधनांवरील संपत्ती कर रद्द केला गेला.

✡ अप्रत्यक्ष करांबाबत शिफारशी :-

१. **जकातीमध्ये कपात :** १९९०च्या दशकात बिगर-कृषी उत्पादनांवरील जकात कर १२८% होता. तो हळूहळू कमी करण्याची शिफारस केळकर समितीने केली. जकात कर ० ते १५% दरम्यान ठेवण्याची शिफारस या समितीने केली. पण सरासरी जकात दर ११ ते १२% एवढाच होता.

२. **केंद्रिय अबकारी कर :** केळकर समितीने केंद्रिय अबकारी दर रद्द करून त्याऐवजी केंद्रिय मूल्यवर्धित कर लागू करण्याची शिफारस केली. केंद्रिय अबकारी करापासून मिळणारे उत्पन्न कमी असल्यामुळे केळकर समितीने ही शिफारस केली होती.

३. **सेवा कर :** भारतात सेवा कर सर्वप्रथम १९९४-९५ मध्ये लागू केला. सेवा देणाऱ्या वस्तूंवर हा कर लागू होता. सुरूवातीला या कराचा दर ७% एवढा होता. केळकर समितीने जास्त सेवा कराच्या कक्षेत आणण्याची शिफारस केली. तसेच कराचा दरही वाढवला.

४. **वस्तू व सेवा कर :** केळकर समितीने भारतामधील प्रचलित असणारे सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करून त्याऐवजी वस्तू व सेवा कर लागू करण्याची शिफारस केली. वस्तू व सेवा करामुळे अधिकाधिक लोक कराच्या कक्षेत येणार असून करपध्दती साधी, सोपी आणि अधिक विश्वसनीय होणार असल्यामुळे केळकर समितीने वस्तू व सेवा कर लवकरात लवकर लागू करण्याची शिफारस केली.

५. **खर्च कर :** हॉटेलमध्ये देण्यात येणाऱ्या सेवांवर खर्च कर लागू करण्याची शिफारस केळकर समितीने केली. हा कर हॉटेलमधील जेवण, वातानुकूलित खोली इ. सेवांवर लागू केला. हा नवा कर सेवा करामध्येच विलीन केला.

✡ **समारोप :-**

केळकर समितीने सुचविलेल्या शिफारशींपैकी बऱ्याच शिफारशी सरकारने स्विकारल्या आणि त्याची अंमलबजावणी केली. प्रत्यक्ष कर, संपत्ती कर, भागभांडवलावरील कर इ. शिफारशी सरकारने स्विकारल्या आणि त्याची अंमलबजावणी केली. अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप आणि तांत्रिक बदल यानुसार सुचविलेल्या सेवा कर, मूल्यवर्धित कर यासारख्या शिफारशीही मान्य केल्या.

❑ कर प्रशासन सुधारणा समिती, २०१४

भारत सरकारने करपध्दतीचे पुनरावलोकन करण्यासाठी कर प्रशासन सुधारणा समिती २०१४ मध्ये नेमली. २०१३-१४ च्या अंदाजपत्रकीय भाषणावेळी भारताच्या वित्तमंत्र्यानी ही समिती नेमत असल्याची घोषणा केली. करधोरणे, करकायदे यांचा अभ्यास करण्यासाठी आणि जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ट करपध्दती बनवण्यासाठी शिफारशी करणे, ही कार्ये या समितीकडे देण्यात आली. पार्थसारथी शोम हे या समितीचे अध्यक्ष होते.

✡ **कर प्रशासन सुधारणा समितीची कार्ये :-**

१) प्रचलित संस्थात्मक रचनेचा अभ्यास करणे.

२) माहिती आणि तंत्रज्ञानाचा समावेश असणाऱ्या उद्योगात्मक कररचनेचा अभ्यास करणे आणि भारतासाठी सर्वोत्कृष्ठ उपाय सुचविणे.

३) प्रचलित करयंत्रणेचा अभ्यास करून करवसुलीसाठी येणारा खर्च कमी करणे.

४) कर भरण्यासाठी करदात्याला लागणारा वेळ कमी करणे.

✡ कर प्रशासन सुधारणा समितीच्या प्रमुख शिफारशी :–

१. प्रशासन :–

करविषयक माहिती, विश्लेषण आणि देखरेखेसाठी केंद्रिय स्तरावर कायमस्वरूपी मंडळाची स्थापना करणे. यानुसार केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ (CBDT) आणि केंद्रिय अबकारी कर मंडळ (CBEC) या दोन मंडळांची स्थापना करण्यात आली.

२. करधोरण आणि संशोधन :–

नियमित करविषयक सुधारणांसाठी शिफारशी करण्यासाठी करधोरण परिषद (TPC) आणि करविषयक नियमित संशोधन करण्यासाठी करविषयक संशोधन युनिट (TPRU) या दोन नव्या मंडळांची स्थापना करण्यात आली. करविषयक धोरण आखताना त्यासंबंधी मार्गदर्शन आणि शिफारशी करण्याची जबाबदारी या दोन मंडळांवर आहे.

३. प्रशासकीय सुधारणा :–

प्रत्येक करविषयक व्यवस्थापनाने आपले क्षेत्र लक्षात घेऊन त्यावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्यावर भर द्यावा. प्रत्येक विभागाला आपापली माहिती वेळोवेळी वेबसाईटवर ऑनलाईन देण्याची शिफारस या समितीने केली. यासाठी नवीन सॉफ्टवेअर तयार करण्याची सुचना सरकारला केली.

४. करदात्याच्या हिताकडे लक्ष :–

प्रत्येक विभागाने आपल्या करदात्याच्या हिताकडे लक्ष देण्याची शिफारस शोम कमिटीने केली. कर प्रशासनावर करण्यात येणाऱ्या एकूण खर्चापैकी १०% खर्च करदात्याला देण्यात येण्याची शिफारस समितीने केली.

५. ई–पेमेंट :–

ई–पेमेंटला प्रोत्साहन देण्याची शिफारस शोम कमिटीने केली. करभरणा इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून करणाऱ्या करदात्याला काही विशेष सवलतही देण्याची शिफारस होती. तसेच सरकारने यासाठी एकाच वेळी अनेक माध्यमातून कर भरण्याची व्यवस्था करावी. उदा. क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग इत्यादी.

६. करदात्याची नोंदणी :–

सन २००७–१२ या काळात वैयक्तिक प्राप्तीकर भरणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली. पण ही

वाढ २-५ लाख या उत्पन्न गटात झाली. ५-१० लाख या उत्पन्न गटात फारशी वाढ झाली नाही. त्यामुळे या विभागाने करदात्यांची माहिती पुन्हा गोळा करावी. माहिती गोळा करण्यासाठी पॅन कार्ड सक्तीचे करावे. या माध्यमातून पुढील तीन वर्षात करदात्यांनी संख्या दुप्पट करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले.

७. एककेंद्राभिमुखता :-

विस्तृत व्यवसाय सेवा देणाऱ्या कंपन्यांसाठी एककेंद्राभिमुखता देण्याची गरज शोम कमिटीने स्पष्ट केली. या मोठ्या कंपन्यांना दुहेरी कर द्यावा लागतो. एकूण उत्पादनावर अबकारी कर आणि उत्पन्नावर निगम कर भरावा लागतो. शोम कमिटीने या मोठ्या कंपन्यांसाठी सार्वजनिक कर धोरण आणि विश्लेषण (TPA) हे नवे युनिट सुरू करण्याची शिफारस केली. या युनिटमध्ये कर तज्ञ, संशोधक आणि अनुभवी व्यक्तींचा समावेश असेल. या युनिटकडून दुहेरी कर टाळण्याचा प्रत्यन केला जाईल. केंद्रीय अबकारी कर मंडळ (CBEC) आणि केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळ (CBDT) या दोन्ही सेवा एकाच छताखाली दिल्या जातील.

❀ समारोप :-

कर प्रशासन सुधारणा समितीने केलेल्या शिफारशींपैकी जवळजवळ सर्व शिफारशी सरकारने स्विकारल्या. या समितीने प्रत्यक्ष कर पध्दती अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. या समितीने केलेल्या शिफारशींमुळे प्रत्यक्ष कर पध्दतीची रचना अधिक मजबूत होऊन करपध्दतीमध्ये अधिक सुगमता आणि विश्वसनीयता येईल.

१.२.५ भारतातील वैयक्तिक प्राप्तिकर उत्पन्नाचा बदलता भार

वैयक्तिक प्राप्तिकर हा व्यक्तीच्या वैयक्तिक उत्पन्नावर आकारला जातो. हा कर केंद्र सरकारकडून आकारला जातो. वेगवेगळ्या उत्पन्न गटांसाठी वैयक्तिक प्राप्तीकराचे प्रमाण वेगवेगळे असते. वैयक्तिक प्राप्तिकराची करमुक्त मर्यादा स्वातंत्र्यापासूनच कायम बदलत आहे. ती पुढीलप्रमाणे:-

१. १९४९-५० :-

स्वातंत्र्यानंतर प्रथमच कररचना आणि करदरामध्ये बदल केला. अर्थमंत्री जॉन मथाई यांनी वैयक्तिक प्राप्तीकराची करमुक्त मर्यादा १०००० पर्यंत कमी केली. यावेळी रुपयाची दशमान पध्दत आस्तित्वात नसल्यामुळे कररचना गुंतागुंतीची होती.

२. १९७४-७५ :-

अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कमाल सीमांत कर ९७.७५ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत कमी केला. वैयक्तिक उत्पन्न कराची करमुक्त मर्यादाही ६००० पर्यंत कमी केली. सर्व करांवरील

अधिभार कमी करून तो १०% एवढा ठेवला. संपत्ती कर वाढवला.

३. १९८५–८६ :–

विश्वनाथ प्रताप सिंग यांना वैयक्तिक करपध्दतीत आमूलाग्र बदल घडवून आणला. करदराचे टप्पे ८ वरून ४ पर्यंत कमी केले. वैयक्तिक प्राप्तिकराची करमुक्त मर्यादा १८००० एवढी केली. ज्यांचे वार्षिक उत्पन्न १८००१ ते २५००० एवढे आहे त्यांना २५% एवढा करदर ठेवला. तसेच २५००१ ते ५०००० या उत्पन्नगटासाठी ३०% करदर तर ५०००१ ते १ लाख उत्पन्न गटासाठी ४०% एवढा करदर आणि ज्यांचे उत्पन्न १ लाखांपेक्षा अधिक आहे त्यांना ५०% एवढा वैयक्तिक प्राप्तिकर होता.

४. १९९२–९३ :–

अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी कररचनेत मोठे बदल केले. १९९१ मध्ये भारताने नविन आर्थिक धोरण स्विकारल्यामुळे कररचनेमध्ये बदल करणे अनिवार्य झाले. करदराचे टप्पे ४ वरून ३ इतके कमी केले. ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्नावर वैयक्तिक प्राप्तिकरातून मुक्त केले. ३०००० ते ५०००० वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्पन्न गटासाठी वैयक्तिक प्राप्तिकर २०% एवढा होता. त्यापुढे ५०००० ते १ लाख उत्पन्न गटासाठी ३०% आणि १ लाख आणि त्यापुढील उत्पन्नावर ४०% एवढा कर दर होता.

५. १९९४–९५ :–

अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी वैयक्तिक उत्पन्न कराच्या पातळीमध्ये वाढ केली. यानुसार ३५००० पर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. ३५००० ते ६०००० या उत्पन्न गटासाठी करदर २०% तर ६०००० ते १.२ लाख या उत्पन्न गटासाठी ३०% आणि १.२ लाख आणि त्यापुढील उत्पन्नासाठी ४०% एवढा वैयक्तिक उत्पन्न कर होता.

६. १९९७–९८ :–

अर्थमंत्री पी. चिदबंरम यांनी यावर्षी देशाचे अंदाजपत्रक सादर केले. यामध्ये त्यांनी करदर आणि करदाराच्या टप्प्यांमध्ये बदल केला. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा ४०००० पर्यंत वाढवली. वार्षिक उत्पन्न ४०००० ते ६०००० असणाऱ्या करदात्यांना १०% तर ६०००० ते १.५ लाख उत्पन्न गटासाठी २०% आणि १.५ लाख आणि त्यापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या करदात्यांना ३०% एवढा वैयक्तिक प्राप्तिकर केला.

७. २०००५–०६ :–

मागील कररचनेतील बदलानंतर जवळपास दहा वर्षांनी पुन्हा अर्थमंत्री पी. चिदबरम् यांनी करदराच्या टप्प्यांमध्ये बदल केला. वैयक्तिक प्राप्ती कराची करमुक्त मर्यादा १ लाख पर्यंत वाढवली.

१ लाख ते १.५ लाख या वार्षिक उत्पन्न गटातील व्यक्तींसाठी १०% तर १.५ लाख ते २.५ लाख या वार्षिक उत्पन्नगटातील व्यक्तींसाठी २०% आणि २.५ लाख आणि त्यापुढील उत्पन्नावर ३०% एवढा वैयक्तिक उत्पन्न कर लागू केला.

८. २०१०–११ :–

अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी ५ वर्षानंतर उत्पन्न पातळीमध्ये बदल केला. १.६ लाख पर्यंत उत्पन्न करमुक्त केले. १.६ लाख ते ५ लाख या उत्पन्न गटासाठी १०%. ५ लाख ते ८ लाख या वार्षिक उत्पन्न गटासाठी २०% तर ८ लाख आणि त्यापुढील उत्पन्नावर ३०% एवढा वैयक्तिक प्राप्तिकर लागू केला.

९. २०१२–१३ :–

अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी उत्पन्न पातळीमध्ये पुन्हा बदल केला. २ लाख पर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. ज्यांचे वार्षिक उत्पन्न २ लाख ते ५ लाख आहे त्यांना १०% एवढा प्राप्तिकर तर ज्यांचे उत्पन्न ५ लाख ते १० लाख आहे त्यांना २०% एवढा प्राप्तिकर आणि १० लाख आणि त्यापुढील उत्पन्नावर ३०% एवढा वैयक्तिक प्राप्ती कर लागू केला.

१०. २०१७–१८ :–

अर्थमंत्री अरूण जेटली यांनी वैयक्तिक कर उत्पन्न पातळीमध्ये पुन्हा बदल केला. वैयक्तिक प्राप्तीकराची करमुक्त मर्यादा २.५ लाख एवढी वाढवली. २.५ लाख ते ५ लाख वा वार्षिक उत्पन्न गटासाठी करदर ५% एवढा कमी केला. तर त्यापुढील करदर कायम ठेवले.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, उत्पन्न कर आकारणी प्रक्रिया सरकार सोपी व सुटसुटीत करण्याचा प्रयत्न करत आहे. लोकांच्या उत्पन्नपातळीत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे उत्पन्नकराची करमुक्त मर्यादा सरकार वाढवत आहे आणि लोकांवर पडणारा उत्पन्न कराचा भार कमी करण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक व महिलांना उत्पन्न करात सवलत देऊन त्यांच्यावरील उत्पन्नकराचा भार कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

❑ वस्तू व सेवा कर पध्दती :–

संपूर्ण देशामध्ये अप्रत्यक्ष कराच्या एकसमान पध्दतीसाठी जीएसटी (Goods and Service Tax) प्रणालीचा अवलंब भारत सरकारने केला आहे. यासाठी संविधान सुधारणा विधेयक पारित करण्यात आले आणि राज्यघटनेच्या कलम २६८(२) मध्ये सुधारणा करण्यात आली.

✡ जीएसटी प्रणालीची आवश्यकता :-

१. जीएसटी पूर्वी करप्रणालीमध्ये करावर कराची आकारणी केली जात होती. राज्य शासनामार्फत मूल्यवर्धित कर (VAT) आणि केंद्र सरकारतर्फे उत्पादनशुल्क व सेवा कर आकारला जात होता. सदर करांची आकारणी केंद्र व राज्य सरकारतर्फे स्वतंत्रपणे होत असल्याने एका कराची वजावट दुसरा कर भरताना होत नव्हती.

२. जीएसटी पूर्वी उत्पादित मालावर केंद्रिय उत्पादन शुल्क लागु होते आणि त्यावर मूल्यवर्धित कर आकारला जातो. त्यामुळे करांवर करांची आकारणी होऊन करांचा बोजा वाढत होता.

३. जीएसटीपूर्वी आंतरराज्यीय माल विक्रीवर ज्या राज्यातून मालाची विक्री झाली त्या राज्यातून २% केंद्रिय विक्रीकर आकारला जात होता. पण ज्या राज्यामध्ये वस्तूची खरेदी झाली आहे त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेला केंद्रिय विक्री कराची वजावट मिळत नव्हती. कराची वजावट मिळत नसल्यामुळे कराचा भाग मूळ किंमतीत मिळून किंमत वाढते. जीएसटी लागू केल्यामुळे दुहेरी करआकारणीला आळा बसला.

✡ जीएसटी करप्रणालीचे फायदे :-

१. केंद्र व राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करपध्दती सोपी व सुटसुटीत होईल.

२. व्यापारी व उद्योगधंद्यांना हिशोब ठेवणे सोपे जाईल.

३. करावर कर लागत नसल्याने वस्तुंच्या किंमतीत घट होऊन ग्राहकांना फायदा होईल.

४. देशभर एकच प्रणाली लागू झाल्यामुळे संपूर्ण देश एकसंघ बाजारपेठ होईल.

५. कररचना पारदर्शी होईल.

६. संगणक प्रणालीचा जास्त वापर होत असल्याने व्यापाऱ्यांना सुविधा मिळतील.

❑ जीएसटी अंतर्गत येणारे अप्रत्यक्ष कर :-

जीएसटी मध्ये केंद्र व राज्य सरकारचे वस्तु व सेवा संबंधित अप्रत्यक्ष कर एकत्रित केले जातात. जीएसटी मध्ये देशातील सर्व अप्रत्यक्ष करून एकच अप्रत्यक्ष कर प्रणाली लागू केली आहे.

✡ केंद्रिय अप्रत्यक्ष कर :-

१. केंद्रिय उत्पादन शुल्क.

२. अतिरिक्त उत्पादन शुल्क (महत्त्वाच्या सामग्री).

३. उत्पादन शुल्क (औषधे व प्रसाधने).

४. अतिरिक्त सीमा शुल्क (CVD).

५. विशेष अतिरिक्त सीमा शुल्क (SAD).

६. सेवा कर.

७. वस्तु व सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला केंद्रिय अधिभार आणि उपकर.

वरील केंद्रिय अप्रत्यक्ष कर (GST) अंतर्गत एकत्रित करण्यात आले आहेत.

✡ **राज्य अप्रत्यक्ष कर :–**

१. राज्य मूल्यवर्धित कर.

२. केंद्रिय विक्रीकर.

३. ऐषआराम कर.

४. प्रवेश कर (एलबीटी, वाहन व वस्तुंवरील प्रवेश कर).

५. करमणूक व मनोरंजन कर.

६. जाहिरातींवरील कर.

७. खरेदी कर.

८. लॉटरी व जुगारावरील कर.

९. वस्तु व सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला राज्य अधिभार आणि उपकर.

वरील राज्य अप्रत्यक्ष कर (GST) मध्ये विलीन केले आहेत. यापैकी काही कर हे राज्य सरकारच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत होते त्यामुळे जीएसटी अंतर्गत वसूल महसुलापैकी ठराविक हिस्सा राज्यांना दिला जातो.

✡ **जीएसटी अंतर्गत वस्तू व सेवांवर कर लावण्याची पध्दत :–**

जीएसटी मध्ये वस्तू व सेवेच्या प्रत्येक पुरवठा व्यवहारांवर दोन कर लावण्यात येतात.

(i) CGST : हा कर केंद्र सरकारकडून लावला व वसूला केला जातो.

(ii) SGST : हा कर राज्य सरकारकडून लावला व वसूल केला जातो.

(iii) IGST : आंतरराज्य वस्तू व सेवांच्या पुरवठ्यावर तसेच आयातीवरसुद्धा केंद्र शासनातर्फे एकात्मिक वस्तू व सेवा कर (IGST) लावला जातो.

राज्यांचा कर महसूल जर कमी झाला तर त्याची नुकसान भरपाई केंद्रामार्फत केली जाते. तेच जीएसटी पूर्वी आंतरराज्य विक्री व्यवहारांवर २% केंद्रिय विक्रीकर लागु होता व हा कर ज्या राज्यातून विक्री होते, त्या राज्यास प्राप्त होतो. या पध्दतीमध्ये आंतरराज्य खरेदी करणाऱ्यास भरलेल्या केंद्रिय विक्रीकराचा परतावा मिळत नाही. IGST कराची आकारणी केंद्र सरकारतर्फे आंतरराज्य पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर करण्यात येईल. मात्र आकारणी झालेल्या कराची पूर्ण वजावट वस्तू व सेवेची खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यास मिळणार आहे.

❑ कृषीकर :–

निती आयोगाने २०१७ मध्ये कृषी उत्पन्नावर कृषीकर आकारण्याची शिफारस केली आहे. हा एक भावनिक मुद्दा आहे. निती आयोगाने कृषी उत्पन्नावर वैयक्तिंक उत्पन्न कर आकारण्याची शिफारस केली आहे. यामुळे करचुकवेगिरी आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल.

✡ कृषीकर म्हणजे काय?

शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नावरील करास कृषीकर असे म्हणतात किंवा शेती संलग्न उपक्रमापासूनच्या उत्पन्नावर कर उदा. शेतमाल प्रक्रिया इ. सारख्या उत्पन्नावरील कर, सध्या केंद्रिय उत्पन्न करामध्ये शेती उत्पन्नावर कोणताही कर आकारला जात नाही. महाराष्ट्रात कृषी उत्पन्नावर कोणताही कर नाही तर काही राज्यांत तो थोड्याफार प्रमाणात आहे.

✡ कृषीकर सुधारणेचा इतिहास :–

१९२५ साली कर चौकशी समितीने कृषी उत्पन्नावर कर न लावण्याची शिफारस केली होती. स्वातंत्र्यानंतर वित्तविषयक तज्ञ समितीनेही केंद्रिय कृषीकर लागू न करण्याची शिफारस केली होती. भारतीय राज्यघटनेने अधिकारांची विभागणी करताना कृषी हा विषय संयुक्त सुचीमध्ये टाकला. यामुळे काही राज्यांनी कृषी उत्पन्नावर कर लागू केला.

१९७२ साली राज समितीने कृषी उत्पन्न व मालमत्तेवर कर आकारण्याची शिफारस केली होती. २००२ साली केळकर समितीने कृषी उत्पन्नावर कर लागू न करण्याची शिफारस केली होती.

❑ निती आयोग :–

भारतीय निती आयोगाने २०१७ मध्ये कृषी उत्पन्नावर वैयक्तिक उत्पन्न कर लागू करण्याची शिफारस केली. निती आयोगाच्या मते बिगर-कृषी घटकांकडून करचुकवेगिरी करण्यासाठी कृषी उत्पन्नाचा उपयोग केला जातो. काळा पैसा लपविण्यासाठी कृषी क्षेत्राचा वापर केला जातो. कृषी

उत्पन्नावर कर आकारल्यामुळे या भ्रष्टाचाराला आळा बसेल. तसेच वित्तीय तूट कमी करण्यासाठीही मदत होईल.

✡ कृषी कराचे प्रकार :-

भारतामध्ये कृषी कर राज्याकडून आकारला जातो. कृषी कराचे पुढीलप्रमाणे प्रकार आहेत.

१. जमीन महसूल :-

हा कर सर्वात जुना कृषीकर आहे. हा कर एकेकाळी राज्य सरकारच्या उत्पन्नाचा सर्वात महत्त्वाचा स्रोत होता. हा कर राज्य सरकारकडून आकारला जातो आणि वसूल केला जातो. १९५०-५१ मध्ये या करापासून राज्यांना ५२ कोटी एवढे उत्पन्न मिळाले. तर १९७०-७१ मध्ये १२४ कोटी उत्पन्न मिळाले.

२. कृषी उत्पन्न कर :-

हा कर सुध्दा राज्यांकडून लावला जातो आणि वसूल केला जातो. बिहार राज्याने १९३८ मध्ये सर्वप्रथम हा कर लागू केला होता. सध्या आसाम, बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमध्ये हा कर लागू आहे. कृषीकराचे दर उत्पन्न कर दरापेक्षा कमी आहेत. कृषी उत्पन्नापासून राज्यांना पुढीलप्रमाणे उत्पन्न मिळाले.

१९५१-५२	- ४.३ कोटी.
१९७०-७१	- १२ कोटी.
१९८९-९०	- ४६.५ कोटी.
२००९-१०	- ३४.० कोटी.

३. इतर प्रत्यक्ष कर :-

शेतकऱ्यांना खर्च कर, देणगी कर, मालमत्ता कर आणि संपत्ती कर भरावा लागतो. वरील कर भारताच्या कर महसुलाच्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे नाहीत. त्यामुळे यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण खूपच कमी आहे.

४. इतर अप्रत्यक्ष कर :-

शेतकऱ्यांवर लागू होणाऱ्या प्रमुख अप्रत्यक्ष करामध्ये स्टँप आणि नोंदणी कराचा समावेश होतो. तसेच केंद्रिय अबकारी कर लावणे आणि तो वसूल करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. तसेच अल्कोहोल आणि इतर पेयांवर राज्य अबकारी कर लावला जातो. सर्वसाधारण विक्री कराचाही भार कृषीविषयक वस्तूंवर पडतो.

१.३ सारांश

भारताने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना स्विकारली. या राज्यघटनेनुसार केंद्र आणि राज्यांमध्ये प्रशासकीय आणि आर्थिक अधिकारांची विभागणी केली. केंद्र आणि राज्यांना आपापली प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी उत्पन्नाच्या नियमित स्रोतांची आवश्यकता असते. यामुळे राज्य घटनेने आर्थिक अधिकारांची विभागणी केलेली आहे. राज्यघटनेने मजबूत केंद्राची संकल्पना स्विकारल्यामुळे केंद्राला उत्पन्नाची अधिक साधने दिलेली आहेत. केंद्र आणि राज्याच्या महसुली उत्पन्नाचे कर उत्पन्न आणि करेतर उत्पन्न असे दोन प्रकार पडतात. कर उत्पन्नाचे पुन्हा प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर असे उपप्रकार पडतात. महसुली उत्पन्नामध्ये कर उत्पन्नाचा हिस्सा सर्वाधिक आहे.

या प्रकरणामध्ये आपण केंद्र आणि राज्य सरकारच्या उत्पन्न स्रोतांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर आर्थिक विकास आणि अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल होत असताना करव्यवस्थेतही सर्वांगीण बदल होणे आवश्यक असते. यामध्ये जुन्या करांची जागा नवीन कर घेतात तसेच आस्तित्वात असणाऱ्या करांमध्येही मुलभूत स्वरूपाचे बदल होतात. या सर्व करविषयक सुधारणांचा अभ्यास आपण या प्रकरणामध्ये केला आहे. यामध्ये १९९१ पूर्वी करविषयक समित्यांनी सुचवलेले बदल आणि १९९१ च्या जागतिकीकरण धोरणानंतर करविषयक व्यवस्थेत झालेले तांत्रिक बदल यांचा आपण अभ्यास केला आहे. त्याचबरोबर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कराचा सार्वजनिक महसुलामधील बदलता सहभाग आपण अभ्यासला आहे.

वस्तु आणि सेवा कराने भारतीय करव्यवस्थेत अमुलाग्र स्वरूपाचा बदल केला आहे. या बदलांचा अभ्यास आपण या प्रकरणामध्ये केला आहे. वस्तु व सेवा करामुळे केंद्र सरकारच्या अप्रत्यक्ष कर उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. यामुळे केंद्र सरकारला विकास कामांसाठी अधिक निधी उपलब्ध झाला आहे. राज्य सरकारने लावलेल्या कृषीकराचा राज्य महसुलावर झालेला परिणामही आपण अभ्यासला आहे.

१.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. खालीलपैकी कोणता कर हा उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर आकारला जातो?

(अ) उत्पन्न कर (ब) मूल्यवर्धित कर (क) आयात कर (ड) निगम कर.

२. खालीलपैकी कोणता कर हा 'अप्रत्यक्ष कर' आहे?

(अ) उत्पन्न कर (ब) संपत्ती कर (क) निगम कर (ड) विक्री कर.

३. जर टाटा कंपनीने वस्तु विदेशातून आयात केली तर त्यावर कोणता कर आकारला जाईल?

(अ) मूल्यवर्धित कर (ब) जकात (क) उत्पन्न कर (ड) निगम कर.

४. उत्पन्न कर भारतामध्ये सर्वप्रथम कधी लागू केला?

(अ) १९४७ (ब) १८६० (क) १९६० (ड) १८५८.

५. भारतात सेवा कर लागू करण्याची शिफारस कोणत्या समितीने केली होती?

(अ) चेलिहा समिती (क) जॉन मथाई समिती

(ब) केळकर समिती (ड) राज समिती.

६. कोणत्या समितीने भारतात सर्वप्रथम कृषीकर लागु करण्याची शिफारस केली होती?

(अ) भूतलिंगम समिती (क) राज समिती

(ब) चेलिहा समिती (ड) केळकर समिती.

७. आंतरराज्य वस्तु व सेवांच्या पुरवठ्यावर कोणता कर आकारला जातो?

(अ) CGST (ब) SGST (क) IGST (ड) यापैकी नाही.

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. (ब) मूल्यवर्धित कर.

२. (ड) विक्री कर.

३. (ब) जकात.

४. (ब) १८६०

५. (अ) चेलिहा समिती.

६. (क) राज समिती.

७. (क) IGST.

१.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **प्रत्यक्ष कर** : जेव्हा करभार आणि कराघात एकाच व्यक्तीवर पडतो तेव्हा त्याला प्रत्यक्ष कर म्हणतात.

२. **अप्रत्यक्ष कर** : जेव्हा करभार एका व्यक्तीवर आणि कराघात वेगळ्या व्यक्तीवर पडतो तेव्हा त्याला अप्रत्यक्ष कर असे म्हणतात.

३. **व्याज कर** : व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे आणि अग्रिमे यांच्या एकूण व्याज रक्कमेवर जो कर आकारला जातो त्याला व्याज कर असे म्हणतात.

४. **केंद्रिय अबकारी कर** : देशामध्ये उत्पादित होणाऱ्या कोणत्याही वस्तुच्या उत्पादनावर जो कर आकारला जातो त्याला केंद्रिय अबकारी कर असे म्हणतात.

५. **जमीन महसूल** : धारण केलेल्या जमिनीच्या आकारमानावर जो कर राज्य सरकारकडून आकारला जातो त्याला जमीन महसूल असे म्हणतात.

१.७ सरावासाठी स्वाध्याय

❑ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. केंद्र सरकारच्या उत्पन्नाची साधने स्पष्ट करा.

२. २०१० च्या दशकातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष उत्पन्न करातील कल स्पष्ट करा.

३. सन १९९१ पूर्वीच्या करविषयक सुधारणांचा संक्षिप्त आढावा घ्या.

४. कर सुधारणा समिती-२०१४ च्या करसुधारणा स्पष्ट करा.

५. जीएसटी प्रणाली स्पष्ट करा आणि अप्रत्यक्ष करविषयक सुधारणांचा आढावा घ्या.

❑ **ब) टिपा लिहा.**

१. प्रत्यक्ष कर.

२. अप्रत्यक्ष कर.

३. कृषी कर.

४. चेलिहा समिती.

५. राज्य सरकारच्या कर उत्पन्नाचे मार्ग.

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ सूची

१. **संपा. जे. एफ. पाटील** : *''सार्वजनिक अर्थकारण''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. **प्रा. घाटगे / वावरे** : *''भारतीय अर्थव्यवस्था''*, निराली प्रकाशन, नागपूर.

३. **Mishra** and **Puri** : *"Indian Economy",* Himalaya Publishing House, Mumbai.

४. **Economic Survey**, 2017-18.

५. **Datta** and **Sundaram** : *"Indian Economy",* S. Chand and Publication, New Delhi.

६. **प्रा. रसाळ, रा. अ.** : *''सार्वजनिक आयव्यय''*, सक्सेस पब्लिकेशन, पुणे.

७. Mahagov.in

❑❑❑

सत्र-३ : घटक-२

सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ गेल्या दशकातील केंद्रीय आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक खर्चातील कल

२.२.२ केंद्र सरकारचा विकासात्मक बाबीवरील खर्च

२.२.३ केंद्र सरकारचा बिगर विकासात्मक बाबीवरील खर्च

२.२.४ राज्य सरकारचा विकासात्मक खर्च

२.२.५ राज्य सरकारचा बिगर विकासात्मक खर्च

२.२.६ आर्थिक विकासात सार्वजनिक खर्चाची भूमिका

२.२.७ गेल्या दशकात सार्वजनिक कर्जातील अंतर्गत आणि बाह्य काल

२.२.८ सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन

२.३ सारांश

२.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ सूची

२.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. गेल्या दशकातील केंद्र आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक खर्चातील कलाचा अभ्यास करता येईल.

२. केंद्र सरकारचा विकासात्मक बाबींवरील खर्चाचा आढावा घेता येईल.

३. केंद्र सरकारचा बिगर विकासात्मक खर्चाचा अभ्यास करता येईल.

४. राज्य सरकारचा विकासात्मक खर्च लक्षात घेता येईल.

५. राज्य सरकारचा बिगर विकासात्मक खर्च लक्षात घेता येईल.

६. आर्थिक विकासात सार्वजनिक खर्चाची भूमिका काय आहे ती पहावी लागेल.

७. गेल्या दशकात सार्वजनिक कर्जातील अंतर्गत आणि बाह्य काल यांचा अभ्यास करावा लागेल.

८. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन कसे करावे या बाबत माहिति घेता येईल.

२.१ प्रस्तावना

अंदाजपत्रकामध्ये कमाल सामाजिक हित (Maximum Social Advantage) साध्य करणे हे अंदाजपत्रक व सार्वजनिक वित्ताचे मुख्य तत्त्व असते. या तत्त्वाचा उल्लेख सर्वप्रथम ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. डाल्टन यांनी केला. सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून लोकांची जास्तीत जास्त कल्याण किंवा समाजातील अधिकाधिक लोकांचे जास्तीत जास्त कल्याण कसे साधले जाईल या तत्त्वाचा वापर अर्थसंकल्प तयार करताना प्रामुख्याने केला जातो.

राज्यघटनेच्या कलम ११२, ११३, ११४(३) आणि ११० (अ) नुसार अर्थसंकल्प सादर करणे केंद्र सरकारसाठी बंधनकारक असते. या आधीच्या काळामध्ये अर्थसंकल्प म्हणजे केवळ प्रस्तावित ताळेबंद असे स्वरूप असले तरी सध्याच्या काळातील सरकारे पुढील आर्थिक वर्षात महत्त्वाचे धोरण निर्धारित करण्यासाठी व देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध धोरणांचा अवलंब करून त्यामध्ये वार्षिक जमाखर्चाचा हिशोब ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करत असतात. आधुनिक काळामध्ये सरकारच्या खर्चाला अत्यंत महत्त्वाचे साधन प्राप्त झालेले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्वांगीण विकासासाठी सरकारी खर्च हा मोठ्या प्रमाणात जबाबदार घटक मानला जातो. कारण सरकारने केलेल्या खर्चाचे प्रमाण, खर्चाचे वाटप, आणि त्याचा परिणाम व खर्च करण्याची पद्धती यावरून सरकारच्या भविष्यकाळातील वार्षिक धोरणांची दिशा व सरकारचा दूरदर्शीपणा आणि सरकारची कार्यक्षमता यावरून दिसून येते.

केंद्र आणि राज्य सरकारला आपल्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या सर्व नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रकारचे खर्च करावे लागतात. देशांमध्ये वास्तव्य असणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे हित जोपासणे हे केंद्र व राज्य सरकारचे मूलभूत कर्तव्य आहे. देशातील नागरिकांच्या आर्थिक तसेच सामाजिक स्तरात सुधारणा करून त्यांची प्रगती करणे सरकारच्या दृष्टीने क्रमप्राप्त आहे तरच राज्याची तसेच देशाची प्रगती होणे शक्य आहे. सरकारी खर्च हा विविध विभागाकडून केला जातो. केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या आपल्या पातळीवर आर्थिक तसेच सामाजिक सुधारणा करण्यासाठी मदत करतात.

२.२ विषय विवेचन

२.२.१ गेल्या दशकातील केंद्रीय आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक खर्चातील कल

सरकारी खर्च साधारणपणे विकासात्मक खर्च आणि बिगर विकासात्मक खर्च या दोन विभागांमध्ये विभागला जातो. म्हणजे विकासात्मक खर्च आणि बिगर विकासात्मक खर्च हा सरकारच्या दैनंदिन व्यवहारावर केलेला खर्च असल्याचे आपणास पहावयास मिळते. सर्वसाधारणपणे विकासात्मक बाबींवर जेवढ्या मोठ्या प्रमाणात शासन खर्च करेल तेवढ्या मोठ्या प्रमाणात आपल्या अर्थव्यवस्थेची प्रगती झपाट्याने झाल्याचे आपल्यास पहावयास मिळते म्हणून शासनाने बिगर विकासात्मक खर्चाला थोडासा आळा घालून विकासात्मक खर्चाकडे जास्तीत जास्त भर देऊन अर्थव्यवस्थेच्या समृध्दीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

सार्वजनिक खर्चात प्रामुख्याने दोन प्रकार पडतात विकासात्मक खर्च आणि बिगर विकासात्मक खर्च. तक्ता क्रमांक २.१ मध्ये दर्शवल्याप्रमाणे केंद्र सरकारने प्रामुख्याने विकास खर्च व बिगर विकासात्मक खर्च यावर भर दिलेला असतो विकास खर्चामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

२.२.२ केंद्र सरकारचा विकासात्मक बाबीवरील खर्च

केंद्र सरकारला प्रामुख्याने विकासात्मक गोष्टीसाठी अनेक बाबीवर खर्च करावा लागतो त्यामध्ये-

अ) विकासात्मक खर्च :-

१. सामाजिक व सामुदायिक सेवा :-

ग्रामीण जीवनामध्ये, सामाजिक जीवनामध्ये व आर्थिक जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजेच सामाजिक विकास होय. सामाजिक विकास हा ग्रामीण भागातील लोकांच्यामध्ये सामाजिक व आर्थिक पाया भक्कम करून मानवाच्या सर्वांगीण विकासामध्ये ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत असताना आपल्याला दिसून येते. तसेच संपूर्ण समुदायाच्या सहकार्याने व प्रेरणेने समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासाला पूरक अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजेच सामूहिक विकास होय. त्यासाठी सरकार मोठ्या प्रमाणामध्ये खर्च करत असल्याचे आपल्याला अंदाजपत्रकाच्या माध्यमातून दिसून येते. केंद्र सरकारला प्रामुख्याने विकासात्मक गोष्टीवर खर्च करत असताना अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या घटकावर खर्च करावा लागतो, त्याचा आढावा आपण तक्ता क्रमांक २.१ मध्ये पुढीलप्रमाणे पाहूया. (तक्ता पान क्र. ४० वर पहा.)

यामध्ये प्रामुख्याने शिक्षण कला संस्कृती, वैज्ञानिक सेवा आणि संशोधन, वैद्यकीय सार्वजनिक आरोग्य, संधारण आणि पाणीपुरवठा, कुटुंबकल्याण, गृहनिर्माण, शहरी विकास, प्रसारण, श्रम व रोजगार, सामाजिक सुरक्षितता आणि कल्याण, माहिती प्रसारण, आणि इतर घटकाचा समावेश होतो.

२. सामान्य आर्थिक सेवा :-

देशाची अर्थव्यवस्था बळकट करावयाची असेल तर त्या देशाचे देशांतर्गत उत्पन्न, तसेच परकीय व्यापार, आणि विदेशी गुंतवणूक व निर्यात प्रोत्साहन या प्रमुख गोष्टींना चालना देणे अत्यंत गरजेचे आहे. यावरच देशाची आर्थिक स्थिती अवलंबून असल्याचे आपणांस दिसून येते, ही स्थिती जर सुदृढ असली तर परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यामध्ये अर्थव्यवस्थेला सहज शक्य होते. जागतिक बाजारपेठेमध्ये आपले स्थान निश्चित करत असताना केंद्र सरकारला अंदाजपत्रकामध्ये महत्त्वाच्या घटकावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते. अर्थव्यवस्थेला सुदृढ करण्यासाठी आर्थिक व्यवस्था ही प्रबळ असली पाहिजे किंवा मोठ्या प्रमाणामध्ये देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी विविध धोरणांची आखणी करणे गरजेचे असते.

यामध्ये प्रामुख्याने परदेशी व्यापार आणि निर्यात प्रोत्साहन, सामान्य आर्थिक आणि व्यापारी संस्था गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आणि आर्थिक संस्था, विशेष आणि मागासलेले भाग, परकीय व्यापार आणि इतर.

३. कृषी आणि संबंधित सेवा :-

आपल्या देशामध्ये एकूण लोकसंख्येपैकी कृषि क्षेत्रावर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक असल्याचे आपणास दिसून येते. देशातील अनेक उद्योग हे कच्च्या मालासाठी कृषि उत्पादनांवर क्षेत्रावर अवलंबून असल्याचे आपणास दिसून येते. त्यामुळे उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा कितीही विकास झाला तरी कृषि क्षेत्राची महत्त्व कमी होत नाही. देशातील अनेक शेती तज्ञांनी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्त्व सांगितलेले आहे. त्यापैकी डॉक्टर स्वामीनाथन यांनी शेतीबाबत महत्त्वाचा विचार मांडत असताना असे म्हटले आहे की, ''जर कृषी क्षेत्र बिघडले तर देशातील कोणतेही क्षेत्र सुरक्षित राहणार नाही'' यासाठीच केंद्र सरकार आपल्या अर्थसंकल्पामध्ये शेतीक्षेत्राला अतिशय महत्त्वाचे स्थान देत असल्याचे आपणांस दिसून येते.

यामध्ये प्रामुख्याने पिकांची लागवड, पशु पालन, खाद्य साठवणूक व गोदाम, ग्रामीण विकास आणि इतर विशेष घटकांचा समावेश होतो.

४. उद्योग आणि खनिजे :-

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारत देश हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला देश म्हणून ओळखला जात होता. याचं महत्त्वाचं कारण स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश सरकारने कोणत्याही प्रकारचा औद्योगिक विकास

भारतामध्ये होऊ दिला नव्हता. परंतु आज केंद्र सरकारच्या दूरगामी दृष्टीचा परिणाम म्हणून औद्योगिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करून औद्योगिक क्षेत्राला चालना देण्याचे कार्य केंद्र सरकार करत असल्याचे दिसून येते. म्हणूनच आज भारत देश हा औद्योगिकदृष्ट्या प्रगत देश म्हणून आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन जगाचा झालेला आहे. भारताचा औद्योगिक विकास करत असताना केंद्र सरकारने नियोजनात्मक आणि विविध योजनांच्या माध्यमातून औद्योगिक धोरणांचा अवलंब केला आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद करून अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे कार्य केंद्र शासनामार्फत केले जाते.

५. खतांवरील सबसिडी :-

केंद्र शासनाने देशातील कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढीच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली गेली आहेत. जागतिक कृषी क्षेत्राचा विचार केला असता देशातील कृषी क्षेत्राला चालना देण्याचे कार्य केंद्र शासनामार्फत करत असल्याचे आपणास दिसून येते, याचाच महत्त्वाचा भाग म्हणून आपल्या देशामध्ये हरितक्रांतीची योजना केंद्र शासनाने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून राबविली आणि ती यशस्वी करून दाखवली. कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी शासनाने कृषी क्षेत्रासाठी आवश्यक असणारे बी-बियाणे, खते यावर मोठ्या प्रमाणात सबसिडी देण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले, त्यामुळे देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळून नवनवीन प्रकारची खते बियाणे शेतकऱ्यांना कमी किंमतीमध्ये उपलब्ध झाल्याने देशांतर्गत कृषी उत्पन्न वाढीला चालना मिळाल्याचे आपणास दिसून येते. यासाठी केंद्र शासनाने आपल्या अर्थसंकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात तरतूद करून कृषी उत्पन्न वाढीस चालना देण्याचे योजले आहे.

६. सिंचन ऊर्जा आणि पूर नियंत्रण :-

यामध्ये प्रामुख्याने ऊर्जा प्रकल्प, प्रमुख आणि मध्यम सिंचन प्रकल्प, लघु सिंचन, आणि इतर घटकांचा समावेश होतो.

भारतामध्ये लोकसंख्या वाढीचा दर जास्त प्रमाणात असल्यामुळे दैनंदिन गरजाही मोठ्या प्रमाणात वाढत चाललेल्या आहेत. आपल्या देशात पाऊस वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या वेळी कमी-जास्त पडत असतो, त्यामुळे जमिनीवर पडलेल्या पाण्याचे व्यवस्थापन व्यवस्थित करून जलसंधारणाची भविष्यातील उपलब्धता लक्षात घेऊन भविष्यामध्ये पाण्याचे महत्त्व आणि उपलब्धता या सर्व गोष्टीचा विचार करून जलसंधारण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणजे आपणास असे म्हणता येईल की, सुधारित सिंचनाशिवाय शाश्वत आर्थिक विकास आणि स्वस्थ पर्यावरण राखून अन्नाची सुरक्षितता राखणे शक्य नाही. त्यामुळेच पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे

आहे. कमी प्रमाणात पाऊस पडला तरी आणि जर पूर परिस्थिती निर्माण झाली तर त्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासन मोठ्या प्रमाणात खर्च करत असल्याचे आपणास अंदाजपत्रकाच्या माध्यमातून दिसून येते.

७. वाहतूक आणि दळणवळण :–

यामध्ये प्रामुख्याने रेल्वे वाहतूक, रस्ते वाहतूक, पोस्ट आणि दूरसंचार, नागरी विमानचालन, बंदर, जहाजं आणि लाईट हाऊस इत्यादीचा समावेश होतो.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये वाहतूक आणि दळणवळण साधनाना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रगतीमध्ये वाहतूक आणि दळणवळण क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे आपणास दिसून येते. ज्या देशांमध्ये वाहतूक आणि दळणवळणाची साधने अत्यंत चांगल्या पद्धतीची उपलब्ध आहे. त्या देशाचा आर्थिक विकास चांगल्या प्रकारे होत असल्याचे आपणास दिसून येते. यासाठी केंद्र शासन आपल्या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून रस्ते, रेल्वे, हवाई मार्ग तसेच सागरी वाहतूक यांचा विकास करण्यासाठी किंवा त्यांना चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्य करत असते.

८. सार्वजनिक कार्य :–

आधुनिक कालखंडामध्ये देशाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली असल्याने सरकारच्या कार्यामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडलेली आहे. देशांमध्ये असलेल्या प्रत्येक सार्वजनिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून देशांमधील लोकांना सार्वजनिक सेवा–सुविधांचा लाभ देण्याचा प्रयत्न शासनाला करावा लागतो. देशांमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये शासनाला मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. त्यासाठी शासन मोठ्या प्रमाणात खर्चही करत असताना आपल्याला दिसून येते, जेणेकरून सर्वसामान्य जनतेच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे सहज शक्य होते. यासाठी शासन अंदाजपत्रकात मोठ्या प्रमाणात खर्च करत असताना आपणास दिसून येते.

९. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना अनुदान :–

यामध्ये प्रामुख्याने दुष्काळ क्षेत्र कार्यक्रम, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, नवीन भागात रोजगार, वेगवेगळ्या प्रकारच्या योजना आणि अनुदान, मागास वर्गाचे कल्याण, अनुसूचित जातीसाठी विशेष केंद्रीय सहाय्य, तसेच विविध प्रकारचे अनुदान, इत्यादी घटकांचा समावेश होतो.

२.२.३ केंद्र सरकारचा बिगर विकासात्मक बाबीवरील खर्च

ब) केंद्र सरकारला विकासात्मक खर्चाबरोबर बिगर विकासात्मक बाबींवरही खर्च करावा लागतो. त्यामध्ये समाविष्ठ असलेले घटक :–

१. व्याज देयक.

२. संरक्षण सेवा वरील खर्च.

३. सीमा सुधारण्यासाठी केलेला खर्च.

४. राज्यांतर्गत खर्च.

यामध्ये प्रामुख्याने न्याय, निवडणुका, ऑडिट, तसेच इतर घटकांवरील खर्चाचा समावेश होतो.

५. आर्थिक सेवा :–

यामध्ये प्रामुख्याने कर संकलन, शुल्क, चलन व नाणी, अनिवार्य ठेवीवरील व्याज, इंडिया सेक्युरिटी प्रेस खर्च तसेच विविध आर्थिक सेवा वर केला जाणारा खर्च यांचा समावेश केला जातो.

६. प्रशासकीय सेवा :–

यामध्ये प्रामुख्याने पोलीस, स्टेशनरी, छपाई आणि इतर बाबींवरील खर्च इत्यादींचा समावेश होतो.

७. पेन्शन आणि इतर सेवानिवृत्ती वरील खर्च.

८. तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य.

९. वेगवेगळ्या प्रकारची अनुदाने.

१०. सामाजिक सुरक्षा आणि कल्याण.

११. इतर खर्च.

क) कर्ज आणि ॲडव्हान्सेस.

ड) फंड हस्तांतरण.

अशाप्रकारे केंद्र सरकार आपला महसुली आणि भांडवली खर्च करून देशातील नागरिकांना जास्तीत जास्त सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यासाठी तत्पर असते.

देशाच्या आर्थिक विकासामध्ये केंद्र सरकारची सार्वजनिक खर्चाच्या बाबतीत अतिशय महत्त्वाची भूमिका आपल्याला दिसते. केंद्र सरकार हा सार्वजनिक खर्च करत असताना अनेक घटकांवर खर्च करत असते त्यामध्ये विकासात्मक खर्च आणि बिगर विकासात्मक दोन प्रमुख घटकावर खर्च करते तर आपण विस्तृत स्वरूपात केंद्र सरकारने केलेल्या शेवटच्या दहा वर्षातील खर्चाचा तपशील पाहूयात.

तक्ता क्र.२.१ : केंद्रासंबंधीचा एकूण महसूल खर्च आणि भांडवली खर्च

(आकडे कोटी मध्ये)

	१९९०–९१	२०००–०१	२००८–०९	२००९–१०	२०१०–११	२०११–१२	२०१२–१३	२०१३–१४	२०१४–१५	२०१५–१६	२०१६–१७
अ) विकासात्मक खर्च	**३४५६६**	**९१८८४**	**३८३१०७**	**४१३८५२**	**५२५०१९**	**५८०८९७**	**६०२५०३**	**६३८१२४**	**६१८२१५**	**६३४७८३**	**६९५५६०**
१. सामाजिक व सामुदायिक सेवा	६४३२	२५१४३	९०३८६	१०५३१४	१२८९०६	१३९४०४	१४६८१५	१६५५२६	१४७१४३	१६३३२८	१८३८७५
२. सामान्य आर्थिक सेवा	४०४५	११८३	७५८३	५७३४	२८०६७	२३७०७	२०८३८	२४६८१	१५४४२	६४०२१	६५११५
३. कृषी आणि संबंधित सेवा	३२२७	८५०३	६५८२८	६२३३०	७८८६९	७०४१४	७३८१४	७२८२६	१०२०७२	१०९१९१	११६३५९
४. उद्योग आणि खनिजे	२२५७	३९१६	१७९९५	२८६४३	५६१२५	८४८५३	११२६७२	१०२१७४	७७९५२	४८२७९	४९३३७
५. खतावरील अनुदान (सबसिडी)	४४००	१३८११	७६६०२	६१२६४	६२३०१	७०७९२	६५६१३	७०९३३	७१०७६	७२४३८	७००००
६. ऊर्जा, सिंचन व पूरनियंत्रण	३१२४	३९९८	९०३४	१०५८६	९९९३	१६९४६	८२४४	१०२६३	११९०९	१०३७६	२३२१७
७. वाहतूक आणि कम्युनिकेशन्स	३६०३	१७०५८	४२५४२	६०४४३	७६०३५	७४१५६	७०३३३	८१९७३	८७४७१	१०८३३८	१३५९७०
८. सार्वजनिक कार्ये	३७८	७०४	१७५२	२०८४	३८५५	२५८७	२८४२	३०९५	२९०३	२९९५	३५२३
९. राज्ये, केंद्रशासित प्रदेशांना अनुदान	७१००	१७५६९	७१३८५	७७४५२	८०८६८	९८०४०	१०१३३३	१०६६५२	१०२२४७	५५८१८	४८१६५
ब) बिगर विकासात्मक खर्च	**४८९७९**	**१९९८८६**	**४५७७१७**	**५६२६०९**	**६२०१९९**	**६६०५५१**	**७४०३८१**	**८४२९८६**	**९४८५४७**	**१०९१४७८**	**११४३१६८**
१. व्याज देयक	२१४९८	९९३१४	१९२२०४	२१३०९३	२३४०२२	२७३१५०	३१३१७०	३७४२५४	४०२४४४	४४२६२०	४९२६७०
२. संरक्षण सेवा (निव्वळ)	१५४२६	४९६२२	११४२२३	१४१७८१	१५४११७	१७०९१३	१८१७७६	२०३४९९	२१८६९४	२२४६३६	२४९०९९
३. आर्थिक सेवा	१८८७	४१४६	७६८०	११२४३	१६९९३	१०५००	१३७८६	१००७६	१५६११	६५५७८	१४६३०
४. प्रशासकीय सेवा	२८६८	१३४०१	३११२४	३८७५४	४१४६९	४७८२८	५३५०९	६०६३५	६८२४२	७४५७२	८३३११
५. पेंशन,इतर सेवानिवृत्तीचे फायदे	२१३८	१४२२०	३२९४१	५६१४९	५७४०५	६११६६	६९४७८	७४८९६	९३६११	९५७३१	१२३३६८
६. एम सीआयला अनुदान	२४५०	१२०६०	४३७५१	५८४४३	६३८४४	७२८२२	८५०००	९२०००	११७६७१	१३९४१९	१३४८३५
७. इतर	२७१२	७१२२	३५७९४	४३१४७	५२३५०	२४१७१	२३६६१	२७६२७	३२२७३	४८९२१	४५२५५
क) स्वयं उत्पन्न संतुलन	५	०	०	०	०	०	०	०	०	०	०
ड) शासकीय अनुदान संस्था	**३३९४**	**११५७९**	**२७२५९**	**२९६९७**	**३१५१४**	**४३९७३**	**४५२५३**	**५३९०५**	**६३२०५**	**८७४१५**	**१००६४६**
इ) कर्ज आणि उचल	**१३९४०**	**९६६२**	**६७४८**	**७०३४**	**१११६६**	**१५७७**	**५४४०**	**६४५१**	**१५३७५**	**७४५८**	**१७२४३**
एकूण खर्च (अ + ब + क + ड + इ)	**१००८८४**	**३१३०११**	**८७४८३१**	**१०१३१९२**	**११८७८९८**	**१२८६९९८**	**१३९३५७७**	**१५४१४६६**	**१६४५३४२**	**१८२११३४**	**१९५६६१७**

स्रोत : *Handbook of Statistics on The Indian Economy, Reserve Bank of India, 2017-18.*

केंद्र सरकार खर्च करत असताना प्रामुख्याने विकास खर्चावर भर देत लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करत असते. वरील तक्त्यामध्ये आपल्याला असे दिसून येते की केंद्र सरकारने विकासात्मक खर्चासाठी १९९०-९१ व्या वर्षात ३४५६६ कोटी रुपये खर्च केला. त्याचबरोबर तो खर्च हळूहळू वाढवून २०१०-११ या आर्थिक वर्षात ५२५०१९ कोटी रुपये इतका झाला. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर विकासाची गती लक्षात घेता देशांमध्येसुद्धा विकासात्मक खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करावी लागते त्याप्रमाणे केंद्र सरकारने २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ६९५५६० कोटी रुपये इतका खर्च विकासात्मक खर्चावर केल्याचे आपल्याला वरील तक्त्यात आढळून येते.

केंद्र सरकारला विकासात्मक खर्चाबरोबर बिगर विकासात्मक खर्चावर सुद्धा सार्वजनिक स्वरूपाचा खर्च करावा लागतो त्यामध्ये १९९०-९१ या आर्थिक वर्षात ४८९७९ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला होता. अर्थव्यवस्थेची गती वाढत जाते त्याप्रमाणे सरकारलाही आपल्या सार्वजनिक खर्चामध्ये वाढ करणं अपेक्षित असतं त्याचप्रमाणे केंद्र शासनाने २०११-१२ या आर्थिक वर्षात ६६०५५१ कोटी रुपये खर्च करण्यात आला. त्याचबरोबर या खर्चामध्ये वाढ होऊन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ११४३१६८ कोटी रुपये इतका खर्च शासनाने केल्याचे आपल्याला वरील तक्त्यात आढळून येते.

विकासात्मक खर्च हा एकूण प्रमुख ९ विभागात झालेला आपल्याला दिसून येतो त्यामध्ये महत्त्वाचे घटक म्हणजे-

१) सामाजिक व सामुदायिक सेवा या वर जास्त भर दिलेला आपल्याला या आकडेवारीवरून लक्षात येते.१९९०-९१ मध्ये हा खर्च ६४३२ कोटी रुपये इतका होता. कालांतराने दोहोंच्या खर्चात वाढ होवून २०१०-११ या वर्षामध्ये १२८९०६ कोटी रुपये इतका करण्यात आला. कालांतराने या खर्चामध्येही आपल्याला वाढ झालेली दिसून येते ती म्हणजे २०१६-१७ या वर्षामध्ये १८३८७५ कोटी रुपये झाला हे आपल्याला आकडेवारीच्या साह्याने दिसून येते.

२) विकासात्मक खर्चामधील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे सामान्य आर्थिक सेवा यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील असते त्यामध्ये १९९०-९१ मध्ये हा खर्च ४०४५ कोटी रुपये केला होता, या खर्चामध्ये हळूहळू वाढ होऊन २०१२-१३ या वर्षामध्ये २०८३८ कोटी रुपये झाल्याचे दिसून येते. त्यानंतर २०१६-१७ आणखी वाढून ६५११५ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला वरील तक्त्यात दिसून येते.

३) तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे कृषी आणि संबंधित सेवा यावर केंद्र शासनाने भर देणे आवश्यक असते त्यानुसार केंद्र सरकार आता मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे, तो खर्च

१९९०-९१ मध्ये ३२२७ कोटी रुपये इतका करण्यात आला होता. त्यानंतर या खर्चात वाढ होऊन तो २०१०-११ या वर्षात ७८८६९ कोटी रुपये इतका करण्यात आला. आणि सदरच्या खर्चामध्ये वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येते तो खर्च २०१६-१७ या वर्षामध्ये ११६५५९ कोटी रुपये इतका झाल्याचे वरील तक्त्यावरून असे दिसून येते.

४) विकासात्मक खर्चामध्ये महत्त्वाचा घटक म्हणजे उद्योग आणि व्यापार या बाबीवर केंद्र सरकारला प्रामुख्याने लक्ष देणे आवश्यक असते, त्यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील असते. १९९०-९१ मध्ये हा खर्च २२२७ कोटी रुपये इतका करण्यात आला, या खर्चामध्ये वाढ होऊन तो २०११-१२ या वर्षामध्ये ८४५३ कोटी रुपये इतका झाला, नंतर त्या खर्चामध्ये सातत्याने वाढ होत गेली आणि तो खर्च २०१६-१७ वर्षांमध्ये ४९३३७ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला वरील आकडेवारीवरून दिसून येते.

५) केंद्र शासनाला बी-बियाणे यांच्या वरील अनुदानासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो तो खर्च १९९०-९१ मध्ये ४४०० कोटी रुपये इतका होता त्यामध्ये वाढ होऊन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये ७०९९२ कोटी रुपये इतका झाला. पुढे त्यामधील वाढ सातत्याने वाढत गेली आणि तो खर्च २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ७००० कोटी रुपये इतका झाला.

६) ऊर्जा, सिंचन आणि पूर नियंत्रणासाठी केंद्र सरकारला खर्च करावा लागतो. त्यामध्ये १९९०-९१ या आर्थिक वर्षामध्ये ३१२४ कोटी रुपये खर्च करण्यात आला. त्यानंतर त्यामध्ये वाढ होत जाऊन तो खर्च २०१०-११ या वर्षामध्ये ९९९३ कोटी रुपये इतका झाला नंतर त्यामध्ये सातत्याने वाढ होत गेल्याचे आपल्याला दिसून येते आणि तो खर्च २०१६-१७ वर्षांमध्ये २३२१७ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला वरील आकडेवारीवरून दिसून येते.

७) वाहतूक आणि दळणवळण याचा विकास करावयाचा असेल तर त्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक असते आणि त्यामुळे देशातील बाजारपेठा एकमेकाच्या जवळ आणणे शक्य होईल उत्पादित मालाला योग्य बाजार भाव मिळावा यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील असते त्यासाठी १९९०-९१ या आर्थिक वर्षामध्ये ३६०३ कोटी रुपये खर्च केला होता. त्यामध्ये हळूहळू वाढ करून तो खर्च २०११-१२ या आर्थिक वर्षात ७४१५६ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला दिसून येते. पुढे त्यामध्ये हळूहळू वाढ होऊन तो खर्च २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये १३५९७० कोटी रुपये पर्यंत वाढलेला आपल्याला वरील तक्त्यावरून दिसून येतो.

८) सार्वजनिक कार्यांवर केंद्र शासनाला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो तो खर्च १९९०-९१ मध्ये ३७८ कोटी रुपये इतका करण्यात आला होता, त्यामध्ये संथ गतीने वाढ होत २०११-१२ या आर्थिक वर्षात २५८७ कोटी रुपये झाल्याचे आपल्याला येते, त्याचबरोबर या खर्चामध्ये नंतर झपाट्याने वाढ होत २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ३५२३ कोटी रुपये झाल्याचा आपल्याला आढळून येतो.

९) केंद्र सरकारला राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना काही प्रमाणात अनुदान देणे गरजेचे असते त्यानुसार केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात खर्च करत असल्याचे आपल्याला वरील आकडेवारीवरून दिसून येते १९९०-९१ या आर्थिक वर्षामध्ये हा खर्च ७१०० कोटी रुपये झाला होता. त्यामध्ये वाढ होऊन तो २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये ९८०४० कोटी रुपये इतका झाला होता त्यामध्ये पुढे सातत्याने वाढ होत जाऊन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ४८१३५ कोटी रुपये झाल्याचे आपल्याला वरील आकडेवारीवरून ाढळून येते.

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाला काही बिगर विकासात्मक खर्च सुद्धा करावे लागतात. तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे बिगर विकासात्मक खर्चामध्ये अनेक घटकांचा समावेश होत असतो. बिगर विकासात्मक खर्चाचा आपण विचार करता वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे १९९०-९१ या वर्षात ४८९७९ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यामध्ये हळूहळू वाढ होत आपल्याला २०११-१२ मध्ये तो खर्च ६६०५५१ कोटी रुपये इतका झाला आणि शेवटी त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन २०१६-१७ मध्ये ११४३१६८ कोटी रुपये इतका खर्च झाल्याचे आपल्याला दिसून येते.

१) व्याज देयके हा सर्वात मोठा खर्चाचा घटक असल्याचे आपणास दिसून येते १९९०-९१ या वर्षात २१४९८ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात २७३१५० कोटी रुपये इतका झाला. आणि तो शेवटी तो २०१६-१७ या वर्षात तो ४९२६७० कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

२) संरक्षण सेवा हा केंद्र शासनाचा अतिशय महत्वाचा घटक असल्याचे आपल्याला दिसून येते. १९९०-९१या वर्षात १५४२६ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात १७०९१३कोटी रुपये इतका झाला आणि तो शेवटी २०१६-१७ या वर्षात तो २४९०९९ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

३) आर्थिक सेवासाठी १९९०-९१ या वर्षा १८८७ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात १०५०० कोटी रुपये इतका झाला आणि

तो शेवटच्या २०१६-१७ या वर्षात तो १४६३० कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

४) प्रशासकीय सेवासाठी १९९०-९१ या वर्षात रु.२८६८ कोटी खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात रु.४७८२८ कोटी इतका झाला आणि तो २०१६-१७ या वर्षात तो ८३३११ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

५) पेन्शन आणि इतर सेवानिवृत्ती या घटकावर १९९०-९१ या वर्षात २१३८ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात ६११६६ कोटी रुपये इतका झाला आणि तो शेवटच्या २०१६-१७ या वर्षात तो १२३३६८ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

६) केंद्र सरकारला देशातील प्रत्येक राज्यांना वेगवेगळ्या आपत्ती निवारणासाठी मदत देणे आवश्यक असते. त्यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील असते. १९९०-९१ व्या वर्षात रु.२४५० कोटी खर्च करण्यात आला होता त्यानंतर त्यामध्ये सातत्याने वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येते. २०१०-११ मध्ये ६३८४४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले ते आपल्याला वरील आकडेवारीतून दिसून येते. त्यानंतर ती वाढ सातत्याने वाढत जाऊन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये रु.१३४८३५ कोटी झाल्याचे आपल्याला वरील आकडेवारीवरून दिसून येते.

७) तसेच इतर खर्चामध्ये नैसर्गिक आपत्ती, अन्न अनुदान, जमीनधारकांना भरपाई, कर्ज कमी करण्यात येणारा खर्चाचा समावेश होतो. १९९०-९१ या वर्षात २७१२ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जावून २०११-१२ या वर्षात २४१७१ कोटी रुपये इतका झाला आणि तो २०१६-१७ या वर्षात तो ४५२५५ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

क) वरील तक्यात दर्शवल्याप्रमाणे स्वयं उत्पन्न संतुलन या घटकांतर्गत १९९०-९१ या वर्षात ०५ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर २०१६-१७ पर्यंत कांहीही खर्च झालेला नाही हे दिसून येते.

ड) वरील तक्यात दर्शवल्या प्रमाणे शासकीय संस्थाना अनुदान या घटकांतर्गत १९९०-९१ या वर्षात ३३९४ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात ४३९७३ कोटी रुपये इतका झाला आणि तो शेवटच्या २०१६-१७ या वर्षात तो १००६४६ कोटी रुपये पर्यंत झाल्याचे आपणास दिसून येते.

ई) वरील तक्यात दर्शवल्या प्रमाणे मध्ये कर्ज आणि उचल या घटकांतर्गत १९९०-९१ या वर्षात रु.१३९४० कोटी खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो कमी होऊन २०११-१२ या वर्षात १५७७ कोटी रुपये इतका झाला आणि तो शेवटच्या २०१६-१७ या वर्षात तो १७२४३ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

२.२.४ राज्य सरकारचा विकासात्मक खर्च

या प्रकरणांमध्ये राज्य सरकारने तसेच केंद्र सरकारने केलेल्या १९९०-१९९१ ते २०१६-२०१७ या शेवटच्या दहा वर्षात मध्ये केला जाणारा विकासात्मक आणि बिगर विकासात्मक खर्चाचा विस्तृतपणे आढावा घेणार आहोत. तक्ता नं. २.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विकासात्मक खर्चामध्ये महत्त्वाची भूमिका असणारा सामाजिक व सामुदायिक सेवा, सामान्य आर्थिक सेवा, कृषी आणि संबंधित सेवा, उद्योग आणि खनिजे, वाहतूक आणि दळणवळण, तसेच सार्वजनिक कार्यावर मोठ्या प्रमाणात भर दिलेला आपल्याला दिसून येतो.

अ) विकासात्मक खर्च :-

राज्य सरकारला प्रामुख्याने विकासात्मक गोष्टीसाठी अनेक बाबींवर खर्च करावा लागतो त्यामध्ये प्रामुख्याने पुढील खर्चांचा समावेश होतो.

१. सामाजिक व सामुदायिक सेवा :-

यामध्ये शिक्षण, कला आणि संस्कृती, वैज्ञानिक सेवा आणि संशोधन, वैद्यकीय सेवा, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि पाणीपुरवठा, कुटुंब कल्याण, गृहनिर्माण, शहरी विकास, श्रम आणि रोजगार, नैसर्गिक आपत्ती, सामाजिक सुरक्षा व कल्याण, व इतर घटकांवर समावेश केला आहे.

२. सामान्य आर्थिक सेवा :-

सामान्य आर्थिक सेवा यामध्ये राज्य सरकारे ज्या आर्थिक सेवा पुरवते, त्यांचा समावेश होतो.

३. कृषी आणि संबंधित सेवा :-

यामध्ये प्रामुख्याने पिकांची लागवड, पशुपालन, अन्न साठवण व गोदाम, ग्रामीण विकास, आणि इतर घटकांचा समावेश केला आहे.

४. उद्योग आणि खनिजे :-

यामध्ये राज्य सरकारे उद्योग आणि खनिजे निर्मितीसाठी खर्च करत असते.

५. उर्जा सिंचन आणि पूरनियंत्रण :-

या घटकामध्ये मध्यम सिंचन तसेच बिगर व्यावसायिक लघू सिंचन, पॉवर प्रकल्प तसेच इतर घटकांच्या खर्चाचा समावेश केला जातो.

६. वाहतूक आणि दळणवळण :-

यामध्ये प्रामुख्याने दळणवळणाशी निगडीत रस्ते वाहतूक, पूल दुरुस्ती इत्यादी गोष्टींवर खर्च केला जातो.

७. सार्वजनिक कार्य :-

राज्य सरकार राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी जो खर्च करत असते, त्या खर्चाचा समावेश सार्वजनिक कार्यामध्ये होत असतो.

२.२.५ राज्य सरकारचा बिगर विकासात्मक खर्च

१. व्याज देयक.

२. राज्यांतर्गत खर्च :-

यामध्ये प्रामुख्याने न्याय, प्रशासन, निवडणुका तसेच इतर घटकांवरील खर्चाचा समावेश होतो.

३. आर्थिक सेवा :-

यामध्ये प्रामुख्याने कर संकलन, शुल्क इ. खर्च यांचा समावेश केला जातो.

४. प्रशासकीय सेवा :-

यामध्ये प्रामुख्याने स्टेशनरी, छपाई, पोलीस कारागृह, जिल्हा प्रशासन, सचिवालय इ. बाबींवरील खर्च इत्यादींचा समावेश होतो

५. पेन्शन आणि सेवानिवृत्ती वरील खर्च.

६. स्थानिक संस्था व पंचायत राज्यांना भरपाई.

७. सामाजिक सुरक्षा आणि कल्याण.

८. तसेच इतर खर्च :-

यामध्ये नैसर्गिक आपत्ती, अन्न अनुदान, जमीनधारकांना भरपाई, कर्ज कमी करण्यात येणारा खर्चाचा समावेश होतो.

क) शासकीय अनुदान आणि संस्था.

ड) कर्ज आणि उचल.

तक्ता क्र. २.२ : राज्यासंबंधीचा एकूण महसूल खर्च आणि भांडवली खर्च

(आकडे कोटी मध्ये)

	१९९०–९१	२०००–०१	२००८–०९	२००९–१०	२०१०–११	२०११–१२	२०१२–१३	२०१३–१४	२०१४–१५	२०१५–१६	२०१६–१७
अ) विकासात्मक खर्च	**४९५४६**	**१६८४०१**	**४७४३५९**	**५७००४८**	**६४६५९२**	**७४९१६६**	**९०२२६५**	**९७५९१८**	**११८५१२९**	**१५५१७८९**	**१७७०२८६**
१. सामाजिक व सामुदायिक सेवा	*२५९४८	९३५६८	२४९७२१	३१५६५८	३७६२२३	४३४९६४	५२४१३९	५६२८५९	६४४९१६	८३८७५४	९७८७१८
२. सामान्य आर्थिक सेवा **	१६५४	३१७८	१२२३९	१२४७०	११९६४	१४००४	१४८७४	१८६३०	१७६४५	२४९६०	३२२५४
३. कृषी आणि संबंधित सेवा	९२०५	२३७६२	६२५६७	७४६६६	८१७७७	९४४७४	११४०५४	१२००४१	१९८७१७	२५९००१	२९६६०८
४. उद्योग आणि खनिजे	१६१२	२८५१	७०६६	८४३०	१००३७	१२४८२	१२०१२	१२८५८	१४५२२	१८८१५	२३६८४
५. ऊर्जा, सिंचन व पूर नियंत्रण	६९८७	२९८०६	८७८३०	९११३३	९५४९४	११२७१९	१४११३४	१४६५७८	१७९५११	२५०७०३	२६६७३६
६. वाहतूक आणि दळणवळण	३१४८	११९३४	४६८९७	५६९५१	५९५३८	६८२१४	८१८६९	९१२३४	११२५८०	१३६३३५	१४६१४३
७. सार्वजनिक कार्ये	९९३	३३०३	८०४०	१०७४१	११५५८	१२३०९	१४१८५	१५७१८	१७२३८	२३२२२	२६१४३
ब) बिगरविकासात्मक खर्च	**२६४३५**	**१२९२६३**	**२९२१२१**	**३६३८९७**	**४१४०३५**	**४८५५०५**	**५१६९१९**	**६१८००७**	**६७७५६०**	**८१५२८४**	**९१७०४८**
१) व्याज देयके	८६८१	५०३४८	९७६३७	११५६३७	१२७६१९	१४०१२५	१५३७८६	१७२१९९	१९१६३६	२२०१६९	२५८२४०
२) राज्य अवयव	७१२	२६५८	६४८०	९१८०	१०५७४	१२२७०	१२५४०	१४७८४	१८१७६	२०५८०	२२९५४
३) आर्थिक सेवा	१५६२	४८६९	९८९४	१२३५६	१४०३६	१६१२२	१९००४	२१७६३	२३१७५	२५६७३	२८९२३
४) प्रशासकीय सेवा	६५५९	२२६०१	४९९४०	६५८१८	७२८३१	८४३१३	९३८२०	१०४५५१	११४९७४	१३७५३२	१६२९६४
५) पेंशन/इतर सेवानिवृत्तीचे फायदे	३०४६	२४५९९	६१७२७	८३४०३	१०८५५३	१२८०९९	१४५१२४	१६३४७४	१७९६६५	२१०५६५	२४५६७८
६) स्थानिक संस्था व पंचायती राज्यांना भरपाई	७८४	४७१०	१८७०१	२०७०९	२५६८८	३२०३५	३६५६२	४४३८३	४७४९९	५४८८३	६०२५१
७) सामाजिक सुरक्षा व कल्याण (एनपी)	२२५१	७९८३	१७८७१	२३२६३	२३३१४	२५५३८	९३९८	३८३४७	४१६१४	४७४४१	३५२४२
८) इतर	**२८४०**	**११४९९**	**२९८७२**	**३३५३२**	**३१४२१**	**४७००३**	**४६६८२**	**५८५०४**	**६०८२१**	**९८४४३**	**१०२७९७**
क. कर्ज व उचल राज्य व केंद्रशासित प्रदेशांद्वारे (एनईटी)	**४२५१**	**४४८५**	**७८३२**	**१४४३४**	**१९२५६**	**२४७७७**	**२५८२०**	**२१९४४**	**१६४७०**	**८३५०७**	**२६५९७**
ड. निधी हस्तांतरित	**१०७९**	**४५४०**	**४९१८**	**७९५०**	**१०७८३**	**०**	**०**	**०**	**०**	**०**	**०**
एकूण (अ+ब+क+ड)	**८१३११**	**३०६६८९**	**७७९२३०**	**९५६३२९**	**१०९०६६५**	**१२५९४४७**	**१४४५००३**	**१६१५८७०**	**१८७९१५९**	**२४५०५८१**	**२७१३९३१**

स्रोत : *Handbook of Statistics on The Indian Economy, Reserve Bank of India, 2017-18.*

अशाप्रकारे राज्य सरकार आपला महसुली आणि भांडवली खर्च करून नागरिकांना जास्तीत जास्त सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यासाठी तत्पर असते.

विकासात्मक खर्चाचा विचार करता तक्ता क्र.२.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १९९०-९१ या वर्षात ४९५४६ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यामध्ये हळूहळू वाढ होत आपल्याला २०१०-११ मध्ये तो खर्च ६४६५९२ कोटी रुपये इतका झाला. तर २०१६-१७ मध्ये १७७०२८६ कोटी रुपये इतका खर्च झाल्याचे आपल्याला दिसून येते.

वरील आकडेवारीवरून आपल्याला असे दिसून येते की, विकासात्मक खर्चातील अत्यंत महत्त्वाचा प्रमुख घटक म्हणजे सामाजिक व सामुदायिक सेवा या घटकावर सर्वात जास्त भर दिलेला दिसून येतो.१९९०-९१ साली, २५९४८ कोटी रुपये खर्च होता. तो २०१०-११ मध्ये ३१५६५८ इतका झाला. हळूहळू त्यामध्ये आणखी वाढ होऊन तो २०१२-१३मध्ये ९०२२६५ कोटी रुपये इतका झाला, तसेच २०१६-१७ मध्ये तो खर्च आणखी वाढून ९७८७१८ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला आढळून येते.

विकासात्मक खर्चातील पुढील घटक म्हणजे सामान्य आर्थिक सेवा त्यामध्ये १९९०-९१ मध्ये १६९४ कोटी रुपये खर्च इतका होता २०११-१२ मध्ये तो खर्च १४००४ कोटी इतका झाला. त्यामध्ये हळूहळू आणखी वाढ होत तो २०१२-१३ मध्ये ९०२२६५ कोटी रुपये इतका झाला. त्याचबरोबर २०१६-१७ मध्ये त्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन तो ९७८७१८ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला दिसून येते.

विकासात्मक खर्चातील अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे कृषी आणि संबंधित सेवा हा आहे भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो, म्हणूनच कृषीक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर खर्च करणे गरजेचे आहे. तक्त्यामध्ये कृषी आणि संबंधित सेवा या मध्ये प्रामुख्याने पिकांची लागवड, पशुपालन, अन्न साठवण व गोदाम, ग्रामीण विकास आणि इतर घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये १९९०-९१ मध्ये ९२०५ कोटी रुपये खर्च इतका करण्यात आला होता. २०११-१२ मध्ये वाढ होऊन तो ९४४७४ कोटी इतका झाला. त्यामध्ये आणखी वाढ होत तो २०१३-१४ मध्ये तो १२००४१ कोटी रुपये इतका झाला. तसेच २०१६-१७ मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन तो २९६६०८ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला दिसून येते.

कोणत्याही राज्याची प्रगती मोठ्या प्रमाणात आणि वेगाने करायची असेल तर उद्योग व्यवसायावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक असते त्याप्रमाणे राज्य तसेच केंद्र सरकार प्रयत्न करत असते. तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे १९९०-९१ साली १६६२ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. २०११-१२ मध्ये वाढ होऊन तो १२४८२ कोटी इतका झाला. त्यामध्ये आणखी वाढ होत तो

२०१४-१५ मध्ये १४५२२ कोटी रुपये इतका झाला. तसेच २०१६-१७ मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन तो २३६८४ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला दिसून येते.

विकासात्मक खर्चातील पुढील महत्वाचा घटक म्हणजे उर्जा, सिंचन आणि पूर नियंत्रण, या घटकामध्ये प्रमुख आणि मध्यम सिंचन तसेच बिगर व्यावसायिक लघू सिंचन, पॉवर प्रकल्प तसेच इतर घटकांच्या खर्चाचा समावेश केला जातो. देशातील उपलब्ध पाणी साठ्याचा पुरेपूर उपयोग करून जास्तीत जास्त सिंचन सुविधा उपलब्ध करून देऊन उत्पादनात मोठ्या प्रमाणात आमूलाग्र बदल घडूवून आणणे गरजेचे असते त्यासाठी सरकार प्रयत्नशील असते. तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे १९९०-९१ साली हा ६९८७ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर २०१०-११ मध्ये वाढ होऊन तो ९५९९४ कोटी इतका झाला. त्यामध्ये हळुहळू वाढ होत तो २०१३-१४ मध्ये १४६५७८ कोटी रुपये इतका झाला. पुढे २०१६-१७ मध्ये तो खर्च मोठ्या प्रमाणात वाढून तो २६६७३६ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला दिसून येते.

वाहतूक आणि दळणवळण हा कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासाचा पाया असतो. त्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागत असतो. तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे वाहतूक आणि दळणवळण या घटकांमध्ये प्रामुख्याने वाहतूकीशी निगडीत रस्ते वाहतूक, पूल दुरुस्ती इत्यादी गोष्टींवर खर्च केला आहे. १९९०-९१ साली हा खर्च ३१४१ कोटी रुपये खर्च इतका करण्यात आला होता. त्यानंतर तो २०११-१२ साली खर्चामध्ये वाढ होऊन तो ६८२१४ कोटी इतका झाला. त्यामध्ये वाढ होऊन २०१३-१४ मध्ये तो ९९२३४ कोटी रुपये इतका झाला. त्याचबरोबर २०१६-१७ मध्ये वाढ होऊन तो १४६१४३ कोटी रुपये इतका झाल्याचे आपल्याला आपल्याला दिसून येते.

विकासात्मक खर्चात महत्वाचा मानला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक कार्यासाठी केला जाणारा खर्च होय. वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सार्वजनिक कार्यासाठी शासन नेहमी प्रयत्नशील असते. त्यासठी राज्य शासनाने १९९०-९१या वर्षात ९९३ कोटी रुपये खर्च केला, त्यामध्ये हळुवार वाढ होत २०११-१२ यावर्षात तो १२३०९ कोटी रुपये झाला. तदनंतर २०१६-१७ मध्ये तो २६१४३ कोटी रुपये झाल्याचे आपणास दिसून येते.

सरकारच्या दृष्टीने विकासात्मक खर्च महत्वाचा असतो त्याप्रमाणे बिगर विकासात्मक खर्च सुद्धा महत्त्वाचे असतो. तक्त्यामध्ये दर्शवल्याप्रमाणे बिगर विकासात्मक खर्चामध्ये अनेक घटकांचा समावेश होत असतो. बिगर विकासात्मक खर्चाचा आपण विचार करता तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे १९९०-९१ या वर्षात २६४३५ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यामध्ये हळूहळू वाढ होत २०११-१२ मध्ये तो खर्च ४८५५०५ कोटी रुपये इतका झाला आणि शेवटी त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन २०१६-१७ मध्ये ९१७०४८ कोटी रुपये इतका खर्च झाल्याचे आपल्याला दिसून येते.

व्याज देयके हा सर्वात मोठा खर्चाचा घटक असल्याचे आपणास दिसून येते. १९९०-९१ या वर्षात ८६८९१ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता, त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात १४०१२५ कोटी रुपये इतका झाला. आणि २०१६-१७ या वर्षात तो २५८२४० कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते. राज्यांतर्गत खर्चामध्ये प्रामुख्याने न्यायप्रशासन, निवडणुका, तसेच इतर घटकांच्या खर्चाचा समावेश होतो.१९९०-९१ या वर्षात ७१२ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात १२२७० कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो २२९५४ कोटी रुपयांपर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

आर्थिक सेवा यामध्ये प्रामुख्याने कर संकलन, शुल्क, इतर खर्च यांचा समावेश केला जातो. तो १९९०-९१ या वर्षात १५६२ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात १६१२२ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो २८९२३ कोटी रुपयांपर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

प्रशासकीय सेवा यामध्ये प्रामुख्याने स्टेशनरी, छपाई, पोलीस, कारागृह, जिल्हा प्रशासन, सचिवालय बाबींवरील खर्च तसेच आणि इतर खर्च इत्यादींचा समावेश होतो. १९९०-९१ या वर्षात ६५५९ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात ८४३१३ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो १६२९६४ कोटी रुपयांपर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

पेन्शन आणि इतर सेवानिवृत्ती वरील खर्च, या घटकावर १९९०-९१ या वर्षात ३०४६ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात १२८०९९ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो २४५६७८ कोटी रुपयांपर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

स्थानिक संस्था व पंचायत राज्यांना भरपाई, या घटकावर१९९०-९१ या वर्षात ७८४कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात ३२०३५ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो ६०२५१ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

सामाजिक सुरक्षा आणि कल्याण या घटकावर १९९०-९१ या वर्षात २२५१ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात २५५३८ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो ३५२४२ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

इतर खर्च या घटकामध्ये नैसर्गिक आपत्ती, अन्न अनुदान, जमीनधारकांना भरपाई, कर्ज कमी

करण्यात येणारा खर्चाचा समावेश होतो. १९९०-९१ या वर्षात २८४० कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात ४७००३ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो १०२७९७ कोटी रुपये पर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

वरील तक्ता क्र.२.२ मध्ये दर्शवल्याप्रमाणे ‘क’ मध्ये ‘कर्ज आणि उचल’ या घटकांतर्गत १९९०-९१ या वर्षात ४२५१ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २०११-१२ या वर्षात २४७७७ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो २६५९७ कोटी रुपयांपर्यंत वाढत गेल्याचे आपणास दिसून येते.

तक्यात दर्शवल्याप्रमाणे ‘ड’मध्ये निधी हस्तांतरण या घटकांतर्गत १९९०-९१ या वर्षात १०७९ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. त्यानंतर तो वाढत जाऊन २००८-०९ या वर्षात ४९१८ कोटी रुपये इतका झाला आणि २०१६-१७ या वर्षात तो ०० कोटी रुपये पर्यंत कमी झाल्याचे आपणास दिसून येते.

२.२.६ आर्थिक विकासात सार्वजनिक खर्चाची भूमिका

सार्वजनिक खर्च करत असताना शासनाला विविध विविध धोरणाच्या अधीन राहून बराच खर्च करावा लागतो या खर्चाची आर्थिक विकासातील भूमिका पुढील पुढीलप्रमाणे .

१. कृषी क्षेत्राचा विकास करणे :-

देशातील सर्वांगीण विकासाचा पाया हा शेतीक्षेत्र हाच असल्याचे आपल्याला आढळून येते. आज जगातील दोन तृतीयांश पेक्षा जास्त लोक शेती हा व्यवसाय करत असल्याचे आपल्याला दिसून येते. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेती व्यवसायाला अनन्यसाधारण असे महत्त्व असते. अनेक शेती तज्ञांच्या मते शेती हा अर्थव्यवस्थेतील मुलभूत क्षेत्र मानले जाते. महात्मा गांधी यांच्या मते, भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे. आज जगातील सर्वात मोठी कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेचा उल्लेख केला जातो. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. विशेषत: भारतासारख्या कृषिप्रधान व विकसनशील देशांमध्ये शेतीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. प्राचीन काळापासून भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणून शेती व्यवसायाची ओळख आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून, भारतातील जवळजवळ ६५ टक्के लोक या क्षेत्रावर अवलंबून आहेत. म्हणूनच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेती क्षेत्राची ओळख आपल्याला पहावयास मिळते. म्हणूनच शासन कृषी क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देऊन शेती क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न करत असते. म्हणूनच आज जगातील बहुतांश देशाचा

विकासाचा मुलभूत घटक म्हणून शेती या व्यवसायाला चालना देण्याचे कार्य शासनाला सार्वजनिक खर्चाद्वारे करावे लागते.

२. औद्योगिक क्षेत्राचा विकास :-

जगात सर्वप्रथम १८ व्या शतकामध्ये युरोप (इंग्लंड) मध्ये औद्योगिक क्रांती घडून आली, नंतर अमेरिका, जर्मनी आणि जपान या देशांमध्ये सुद्धा ती घडून आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात योजनाबद्ध रीतीने औद्योगीकरण घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. भारतामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये औद्योगिकरणाला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले, तिथूनच खऱ्या अर्थाने भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगिकरणाच्या विकासाला सुरुवात झाली. औद्योगीकरणाचा आकारबंद आणि नियोजनबद्ध विकासाला गती देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यास सुरुवात झाली, त्यानुसार जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगिकरणाचे महत्त्व लक्षात आल्यामुळे शासन मोठ्या प्रमाणावर खर्च करत असल्याचे आपणास दिसून येते. भारताने धातू, पेट्रोकेमिकल, रासायनिक, यंत्र, कापड, लोखंड पोलाद, साखर, चर्म, अभियांत्रिकी, सिमेंट, खते इत्यादी उद्योग निर्माण केल्याचे दिसून येते. गेल्या काही दिवसात उद्योगधंद्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनण्याचे प्रयत्न करत असल्याचे आपल्याला दिसून येते. यादृष्टीने सार्वजनिक खर्च अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडताना आपल्याला दिसून येते.

३. वाहतूक व दळणवळण क्षेत्राचा विकास :-

ज्याप्रमाणे मानवी शरीरामध्ये रक्तवाहिन्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्याप्रमाणे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये वाहतुक आणि दळणवळण अतिशय महत्त्व असल्याचे आपणास दिसून येते. देशाच्या आर्थिक विकासासाठी या क्षेत्राचा आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे वाहतूक आणि दळणवळण यांच्यातही सुधारणा घडून येणे अत्यंत गरजेचे असते. कार्यक्षम आणि पुरेशी वाहतूक व्यवस्था म्हणजे आधुनिक अर्थव्यवस्थेचा पाया असतो. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ६३ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात, त्यामुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था सुधारणे, त्यांना आधुनिक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे, आधुनिक विज्ञानाचा प्रसार होऊन त्यांना आधुनिक प्रकारची माहिती उपलब्ध करून देणे हे वाहतूक व दळणवळणाच्या माध्यमातून आपल्याला अतिशय प्रभावीपणे पार पाडता येते. जेवढ्या मोठ्या प्रमाणात दळणवळण साधनांचा विकास होईल तेवढ्या मोठ्या प्रमाणात लोक जवळ येतील त्यादृष्टीने त्यांच्या शेती, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रांमध्ये त्यांची जवळीक वाढेल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यासाठी शासन मोठ्या प्रमाणात खर्च करत असल्याचे आपल्यास वरील खात्यातील आकडेवारीवरून दिसून येते.

वाहतूक क्षेत्राचे जाळे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्यांचे जाळे असते. हे जाळे

जेवढे मोठे व सशक्त तेवढी वाहतूक सुकर! भारतीय अर्थव्यवस्था पुढील १५ वर्षांत जर ८ ते ९% दराने वाढणार असेल तर त्याचा अर्थ त्यापेक्षा जास्त दराने व्यापाराची वृद्धी होण्याची गरज आहे. व्यापाराची वृद्धी याचाच अर्थ देशांतर्गत व आयात-निर्यातीसाठी मालाची अधिक ने-आण म्हणजेच ती ने-आण करणारी वाहतुकीची साधने व त्यांचे जाळे व या सर्वाचे व्यवस्थापन यांत प्रचंड प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

४. देशाचा सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न करणे :-

सुरक्षा या विषयाची व्याप्ती मोठी आहे, भारताला बाह्य व अंतर्गत सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. बाह्य सुरक्षा म्हणजे परकीय राष्ट्राकडून केल्या जाणाऱ्या आक्रमणापासून सुरक्षा करणे होय व अंतर्गत सुरक्षा म्हणजे देशाच्या सीमांतर्गत असणारी सुरक्षा ज्यामध्ये शांतता, कायदा आणि सुव्यवस्था व देशाचे सार्वभौमत्व अबाधित ठेवणे इत्यादी येते. भारतामध्ये अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी गृह मंत्रालयावर आहे आणि बाह्य़ सुरक्षेची जबाबदारी संरक्षण मंत्रालयावर आहे.

आपल्या देशाची भौगोलिक परिस्थिती व रचना यांचे आकारमान खूपच मोठे असल्याचे आपल्याला दिसते त्याचतबरोबर राजकीय स्थान इतर देशाशी असलेले आपले संबंध इत्यादी गोष्टी घेऊन सरकारला खर्च करणे आवश्यक असते त्यासाठी मोठ्या प्रमाणात संरक्षणावरील खर्च अवलंबून आहे. देशाच्या सीमांच्या सर्व बाजू मजबूत असणे गरजेचे आहे त्यामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात संरक्षणासाठी खर्च करणे अनिवार्य असते त्यातूनच वेगवेगळ्या देशांशी असलेले व्यापारी संबंध तसेच इतर संबंध यांची जपणूक करणे गरजेचे असत.

५. कल्याणकारी राष्ट्राची निर्मिती करणे :-

जगातील सर्वच देशांनी कल्याणकारी राज्य ही संकल्पना मान्य केली आहे. आपल्या देशातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक, विकासाची जाणीव आणि त्या जाणिवेतूनच समाजातील विविध घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मोठ्या खर्चाची तरतूद शासनाला करावी लागते. विकासासाठी अपेक्षित स्थिती निर्माण करणे हे कल्याणकारी राज्याचे मार्गदर्शक तत्व होय. प्रत्येक देशाला आपल्या देशाची अर्थव्यवस्थेची प्रगती जलद गतीने होण्यासाठी त्याची गती वाढविण्यासाठी आर्थिक नियोजन या कार्यक्रमावर भर देऊन प्रगत राष्ट्र निर्माण करण्यासाठी शासनाला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. आर्थिक नियोजन हे त्या देशाच्या प्रगतीचा सर्वात मोठं लक्षण समजलं जातं आणि सार्वजनिक खर्च योग्य नियोजन करून शासन राष्ट्रनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात हातभार लावत असल्याचे आपल्याला दिसून येते.

६. शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे :-

शिक्षण हा आर्थिक विकासाचा पाया आहे, अन्न, वस्त्र, निवाऱ्याबरोबरच 'शिक्षण' ही सहा ते १४ वर्षे वयोगटातील मुलांची मूलभूत गरज आहे, यावर २००९ च्या शिक्षण हक्क कायद्याने शिक्कामोर्तब केले. हा कायदा अस्तित्वात आल्यापासून यात बऱ्याच सुधारणा झाल्या, भविष्यात होत राहतील. पण, शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेलेल्या मुलांना न्याय देण्यात किंवा जे या प्रवाहात आधीपासून आहेत त्यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षणाअभावी सुरू असलेले 'गटांगळ्या' घेणे थांबले आहे का, याचा विचार होणे आवश्यक आहे. प्रगत देशांचा, त्यांच्या समाजाचा उत्कर्ष झाला तो तिथल्या शिक्षणासाठी असलेल्या व्यवस्थेमधून झाल्याचे आपणास दिसून येते. भारताला नालंदा विद्यापीठासारख्या शिक्षण संस्थांचा इतिहास आहे. त्यामुळे शिक्षणावरील खर्च वाढवून जलद गतीने आर्थिक विकास साध्य करणे सहज शक्य आहे.

७. सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब नियोजन :-

केंद्र सरकार राज्य सरकार सार्वजनिक आरोग्य यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत असल्याचे आपल्या दिसून येते. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे लोकसंख्या वाढीचा दर होय, त्यासाठी देशातील सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्यदायी सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार नेहमी प्रयत्नशील असल्याचे आपल्याला दिसून येते. देशातील प्रत्येक नागरिक सुदृढ आणि दीर्घायुष्य लाभण्यासाठी शासन मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे. नियोजनाच्या बाबतीत शासन स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी किंवा दोन मुलींनंतर कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहन मिळावे त्यासाठी शासन वेगवेगळ्या योजनांमार्फत मोठ्या प्रमाणात फायदा उपलब्ध करून देत असल्याचेही आपणास दिसून येते. या सर्व गोष्टीसाठी शासन आरोग्य आणि कुटूंब नियोजन यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

८. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे :-

देशातील ३० कोटीच्या आसपास नागरिक अजूनही गरिबी रेषेखाली राहत आहेत. कृषी क्षेत्राची रोजगार निर्माण करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर आहे त्याचा सुयोग्य उपयोग करून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याच बरोबर देशातील उद्योग व सेवा क्षेत्रात निर्माण होणा-या लाखो रोजगार निर्माण करण्यासठी मोठ्या प्रमाणावर खर्च करत आहे. त्यामुळे देशतील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासठी शासनाची अतिशय महत्वाची भूमिका आहे.देशातील प्रत्येक तरुणांच्या हाताला काम मिळण्यासाठी केंद्र व राज्य शासन कायम कटिबद्ध असल्याचे आपणास दिसून येते. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शासन रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात

रोजगार हमी आणि वेगवेगळ्या प्रकारच्या रोजगाराभिमुख योजनांची निर्मिती करून त्यांच्या हाताला काम देण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत असल्याचे दिसून येते.

९. देशांतर्गत सार्वजनिक सुरक्षितता :-

लोकसंख्येचा विचार करता भारतामध्ये १२१ कोटी लोकसंख्या असल्याचे दिसून येते. देशांतर्गत राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या खाजगी तसेच सार्वजनिक जीवनामध्ये शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी शासनाला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो जेणेकरून सर्वसामान्य लोकांच्या आयुष्यामध्ये सुरक्षितता आणि शांतता अबाधित राखण्यासाठी शासन मोठ्या प्रमाणावर प्रयत्नशील असते. सर्वसामान्यांचे जीवन सुरळीतपणे चालावे त्यांना सार्वजनिक जीवनामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नये यासाठी शासन प्रयत्न करत असते. त्यासाठी देशामध्ये मोठ्या प्रमाणावर खर्च, शासन करत असल्याचे आपणास दिसून येते.

१०. नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण :-

देशांमध्ये निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तीपासून जनतेचे संरक्षण करण्यासाठी शासनाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. कोणत्याही प्रकारची आपत्ती ही कधी सांगून येत नसते त्यामुळे कधी पूर येतो कधी दुष्काळ तर पडतो तर कधी अन्य समस्या निर्माण होते, त्यासाठी शासनाला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. सरकार आपल्या आपत्ती निवारण या खात्याकडून मोठ्या प्रमाणात सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील असते. येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी शासन महत्वाची भूमिका पार पाडताना आपल्याला दिसून येते.

११. प्रशासन व्यवस्थेवर खर्च :-

सरकारला प्रशासनाच्या विविध कार्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो यापूर्वी हा खर्च अत्यंत मर्यादित होता सरकारची कार्येसुद्धा मर्यादित होती, परंतु विसाव्या शतकात त्याची व्यापकता आणि गुंतागुंत मोठ्या प्रमाणात वाढली त्यामुळे शासन व्यवस्थेचे स्वरूप आणि व्याप्ती वाढली, त्यामुळे शासनाच्या खर्चावर मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे आपणास दिसून येते, त्याचबरोबर शासनाची नैतिक जबाबदारी अशी आहे की व्यवस्थित, चांगली-चांगली सुविधा, प्रशासकीय व्यवस्थेवर खर्च करून नागरिकांना सेवा सुविधा पुरविण्याचे कार्य प्रशासनामार्फत चांगल्या रीतीने पार पाडता येते.

१२. सामाजिक कार्यावरील शासनाचा खर्च :-

देशातील सर्व नागरिकांसाठी शासनाला विविध कल्याणकारी योजना देशाच्या किंवा राज्याच्या

जनतेसाठी राबवाव्या लागतात. शासनाचे कार्य विसाव्या शतकामध्ये सर्वत्र वाढत चालले असून त्यामध्ये निवृत्ती वेतन, बेकारी भत्ता, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता यासारख्या अनेक विविध योजनांची जबाबदारी सरकार पार पडताना आपल्याला दिसून येते व पार पाडणे सरकारला अनिवार्य आहे.

१३. व्यापारी कार्यावरील खर्च :–

शासनाला व्यापारी कार्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करावे लागत असल्याचे आपणास आकडेवारी–वरून दिसून येते. त्यामध्ये शासनाला देशांतर्गत व देशाबाहेर व्यापार व्यापाराचे जाळे वाढवण्यासाठी महत्त्वाची भूमिका करावी लागते आणि देशातील नागरिकांना प्रत्येक वस्तू व सेवा पुरवणे गरजेचे असते. यासाठी शासनाला मोठ्या प्रमाणात खर्चही करावा लागतो आणि ते करत असल्याचे आपल्याला दिसून येते.

१४. राष्ट्राच्या निर्मितीसाठी करावा लागणारा खर्च :–

प्रत्येक देशाला आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेची प्रगती जलद गतीने करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी आर्थिक नियोजन या कार्यक्रमावर भर द्यावा लागतो. राष्ट्र निर्माण करण्यासाठी शासनाला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सार्वजनिक खर्च योग्य नियोजन करून शासन, राष्ट्र निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात हातभार लावत असल्याचे आपल्याला दिसून येते.

२.२.७ गेल्या दशकात सार्वजनिक कर्जातील अंतर्गत आणि बाह्य कल

सार्वजनिक कर्ज हे सरकारच्या महसुलाचे अत्यंत महत्त्वाचे साधन मानले जाते. केंद्र किंवा राज्य शासन आपल्या खर्चाची मर्यादा ओलांडते, म्हणजेच सरकारी उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होतो, त्यावेळी (तुटीचा अर्थसंकल्प) सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन करावे लागते. सार्वजनिक कर्ज हे दोन प्रकारे उभा करता येते. अंतर्गत स्त्रोताद्वारे उभा केले जाणारे कर्ज व बहिर्गत स्त्रोताद्वारे उभा केले जाणारे कर्ज. अंतर्गत स्त्रोतांद्वारे देशांतर्गत बँका, वित्तसंस्था यांच्याकडून त्याचप्रमाणे भविष्य निर्वाह निधी कर्मचारी, निर्वाह निधी आणि पोस्टाच्या योजना, बँकांनी (एसएलआर) केलेली गुंतवणूक याचा समावेश होतो. सार्वजनिक कर्जामध्ये एक नाजूक आणि अलीकडील काळात महत्त्वाचा ठरलेला प्रकार म्हणजेच परदेशी कर्ज. परदेशातून घेण्यात येणारे कर्ज हे राज्य सरकारांना थेट घेता येत नाही आणि त्यामुळे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या सहकार्यातूनच परदेशी कर्ज घेतले जाऊ शकते. हे कर्ज ज्या वित्तसंस्थांकडून किंवा आंतरराष्ट्रीय विकास संस्थांकडून घेतले (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, एशियन विकास बँक आणि अन्य) जाते.

आपले खर्च भागविण्यासाठी सरकारकडे निरनिराळे उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध असतात. त्यामुळे कर्ज उभे करण्याचा मार्ग का स्वीकारला जातो? तर निधी उपलब्ध करण्याच्या प्रत्येक पद्धतीला काही

मर्यादा आहेत, हे ध्यानात घेतले पाहिजे. उदा. कर बसवून भरपूर रक्कम गोळा होऊ शकते; पण करांना नेहमीच विरोध होतो. कर गोळा करण्यासाठी मोठी व खर्चिक प्रशासकीय यंत्रणा उभारावी लागते. अप्रत्यक्ष कर गरिबांवर अन्याय करणारे ठरू शकतात. उत्पन्न कर किंवा संपत्ती करांसारखे प्रत्यक्ष कर देशातील फार थोडे लोक भरतात.

कर्ज उभारण्याची सरकारला गरज का भासते ? एकतर प्रशासनावर सरकारला खर्च करावा लागतो. रस्ते, धरणे, पाटबंधारे, पूल अशा कामांसाठी मोठा निधी उभारावा लागतो. वार्षिक जमाखर्च जर तुटीचा झाला म्हणजे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल, तर तो जादा खर्च भागविण्यासाठी काही तरतूदही करावी लागते. कर्जाव्दारे उभा केलेला निधी मदतीला येऊ शकतो. विकसनशील देशांसमोर अनेक सामाजिक, सार्वजनिक खर्च प्राधान्याने उभे असतात. गरिबी, बेकारी दूर करण्याचे कार्यक्रम असतात. अशा कार्यकमांवर सतत खर्च करावा लागतो. अशा कामांबाबत पूर्वी सरकारची ठाम किंवा आग्रही भूमिका नसे. सरकार निर्हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारीत असे; पण गेल्या पन्नास वर्षांत सरकारची भूमिका बदलली आहे.

सरकारचा खर्च आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त झाला असेल त्यावेळी शासन जनतेकडून किंवा परस्परांकडून, परकीय सत्तांच्या कडून कर्ज घेताना दिसून येते. देशामध्ये असणारे विविध अधिकोष, व्यापारी संस्था तसेच खाजगी व्यक्ती सार्वजनिक संस्थांना कर्ज देतात. आंतरराष्ट्रीय अधिकोष, आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी यासारख्या संस्था ही वेगवेगळ्या देशांना किंवा उद्योगांना मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करतात अशाप्रकारे शासन वेगवेगळ्या प्रकारे कर्जाची उभारणी करत असते.

नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर केंद्र तसेच राज्य सरकारच्या कार्याची जबाबदारी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे आपणास दिसून येते, ही जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी शासनाला वाढता खर्च करणे अत्यावश्यक बाब होऊन बसलेली आहे. पण त्याचबरोबर वाढत्या खर्चाच्या मानाने त्याचे महसुली उत्पन्न कमी पडत आहे त्यामुळे शासनाला कर्ज उभारणे भाग पडत आहे. वाढत जाणाऱ्या अंतर्गत व बाह्य कर्जामुळे आपल्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याचे आपणास दिसून येते त्यामुळे गंभीर समस्यांना सामोरं जावं लागत आहे व त्यांची समाधानकारकरित्या सोडवणूक होणे तितकेच महत्त्वाचे आहे

अंतर्गत कर्जाच्या बाबतीत आपल्याला असे म्हणता येईल की त्यावर उपाय म्हणून केंद्र व राज्य सरकारने आपल्या खर्चात विशेषता आणि उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात कपात घडवून आणणे गरजेचे आहे अंतर्गत कर्ज ही जास्तीत जास्त प्रमाणात लोकांच्या बचतीतून उभे करण्यात यावे म्हणजे चलनवाढ व भाववाढ अतिरेकीची परिस्थिती टाळता येणे शक्य आहे.

पुढील तक्ता क्र.२.३ च्या आधारे केंद्र सरकारच्या सार्वजनिक कर्जाचा आढावा घेतला आहे.

तक्ता क्र. २.३ : केंद्र सरकारचे सार्वजनिक कर्ज (१९९४–९५ ते २०१६–१७)

(आकडे कोटी मध्ये)

वर्ष	अंतर्गत कर्ज	बाह्य कर्ज	एकूण सार्वजनिक कर्ज
१९९४–९५	४८७६८२	५०९२९	५३८६११
१९९५–९६	५५४९८३	५१२४९	६०६२३२
१९९६–९७	६२१४३७	५४२३९	६७५६७६
१९९७–९८	७२२९६२	५५३३२	७७८२९४
१९९८–९९	८३८५५२	५७२५४	८९५८०६
१९९९–००	९६२५९२	५८४३७	१०२१०२९
२०००–०१	११०२५९६	६५९४५	११६८५४१
२००१–०२	१२९४८६३	७१५४६	१३६६४०९
२००२–०३	१४९९५८९	५९६१२	१५५९२०१
२००३–०४	१६९०५५४	४६१२४	१७३६६७८
२००४–०५	१९३३५४४	६०८७७	१९९४४२१
२००५–०६	२१६५९०२	९४२४३	२२६०१४५
२००६–०७	२४३५८८०	१०२७१६	२५३८५९६
२००७–०८	२७२५३९४	११२०३१	२८३७४२५
२००८–०९	३०३६१३२	१२३०४६	३१५९१७८
२००९–१०	३३९५८७७	१३४०८३	३५२९९६०
२०१०–११	३७८११३५	१५७६३९	३९३८७७४
२०११–१२	४३४७१६४	१७००८८	४५१७२५२
२०१२–१३	४८९३३०३	१७७२८९	५०७०५९२
२०१३–१४	५४८४८४८	१८४५८१	५६६९४२९
२०१४–१५	६०४५००५	१९७५१४	६२४२५१९
२०१५–१६	६६८३२१४	२०८९९८	६८९२२१२
२०१६–१७	७२१०३८८	२२८०९३	७४३८४८१

स्रोत : *Handbook of Statistics on The Indian Economy, Reserve Bank of India, 2017-18.*

आलेख नं. १ : अंतर्गत देयता



***स्रोत :** Handbook of Statistics on The Indian Economy, Reserve Bank of India, 2017-18.*

कोणत्याही देशाचे सरकार सार्वजनिक कर्जाची उभारणी करत असताना अंतर्गत आणि बहिर्गत कर्ज या मार्गांचा अवलंब करत असते. अंतर्गत कर्जापेक्षा बाह्य कर्जाचा भार अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात पडत असतो, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची करावी लागणारी व्याजासह परतफेड करत असताना देशांतर्गत उत्पन्न हे दुसऱ्या देशाच्या नावे हस्तांतरित करावे लागत.

तक्ता क्र. २.३ मध्ये आपल्याला असे दिसून येते की, ज्या वेळेपासून भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला तेव्हापासून आंतरराष्ट्रीय व्यापारात सातत्याने तूट वाढत गेली असल्याचे आपल्यास या आकडेवारीवरून दिसून येते. अशी तूट भरून काढण्यासाठी आणि देशातील सार्वजनिक विकासासाठी नवीन नवीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात विदेशी भांडवलाची आवश्यकता असते आणि ती पूर्ण करण्यासाठी सरकार काही प्रमाणात बाह्य कर्ज उभारण्याचा मार्ग अवलंबत आहे. सुरुवातीला बाह्य कर्ज म्हणजे १९९४-९५ मध्ये ५०९२९ कोटी रुपये इतके होते. जसजसे अर्थव्यवस्थेमध्ये नवनवीन धोरणाचा अवलंब करून विकासात्मक गोष्टीसाठी खर्चाचे प्रमाण वाढत गेले आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात बाहेर खर्चामध्ये वाढ होत गेली ही वाढ २०००-०१ या वर्षामध्ये ६५९४५ कोटी रुपये पर्यंत वाढत गेली. त्याचबरोबर अंतर्गत कर्जामध्ये सुद्धा वाढ झाल्याचे आपल्याला या तक्त्यावरून दिसून येते १९९४-९५ या वर्षामध्ये ४८७६८२ कोटी रुपये इतके होते. त्यामध्ये सुद्धा वाढ होऊन २०००-०१ झाली ११०२५९६ कोटी रुपये झाल्याचे दिसून येते. त्यानंतरसुद्धा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये झपाट्याने वाढ होऊन मोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण होऊ लागल्या आणि या स्पर्धांमुळे अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलाची गरज निर्माण होऊ लागली आणि या मुळेच कर्जाचा भार हळूहळू वाढत गेल्याचे आपणास दिसून येते. २००५-०६ मध्ये बाह्य कर्ज ९४२४३ कोटीपर्यंत वाढत गेले आणि त्यानंतर सुद्धा त्यामध्ये झपाट्याने वाढ होत गेली आणि शेवटी

२०१६-१७ वर्षांमध्ये २२८०९३ कोटी रुपये इतकी वाढ झाल्याचे आपणास वरील तक्त्यात दिसून येते. त्याचबरोबर अंतर्गत कर्जामधील वाढ सुद्धा त्याच गतीने झाल्याचे आपणास दिसून येते २००५-०६ या वर्षामध्ये २१६५९०२ कोटी रुपये इतके होते. तर ते २०१६-१७ या आर्थिक वर्षात ७२१०३८८ कोटी रुपये पर्यंत वाढ होत गेल्याचे आपणास वरील तक्त्याद्वारे दिसून येते.

एकंदरीतच भारताने ज्यावेळेपासून नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला आहे, तेव्हापासून भारतीय अर्थव्यवस्थेला अंतर्गत तसेच बाह्य कर्जावर जास्त प्रमाणात अवलंबून राहावे लागत आहे. अंतर्गत कर्जाचे व्यवस्थापन हे विकासात्मक खर्चासाठी केले तर अर्थव्यवस्थेवर त्याचा सकारात्मक परिणाम पाहावयास आपणास मिळतो अन्यथा त्याचे अर्थव्यवस्थेवर दूरगामी अनिष्ट परिणाम होऊन अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण होऊ शकतात. म्हणूनच सार्वजनिक कर्ज हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक अतिशय महत्त्वाचा व अविभाज्य भाग मानला जातो.

२.२.८ सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन

आधुनिक काळामध्ये सार्वजनिक कर्ज, अर्थव्यवस्थेच्या उत्पन्न प्राप्तीचा एक मार्ग मानला जातो. सार्वजनिक कर्जापासून प्राप्त होणारे उत्पन्न स्थायी स्वरूपाचे उत्पन्न नसते, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे घेतल्याल्या कर्जाची रक्कम काही कालावधीनंतर ती व्याजासह परत करावी लागते. सार्वजनिक कर्जाच्या व्यवस्थापनाचा मुख्य उद्देश देशावरील सार्वजनिक कर्जाचा भाग कमीत कमी असावा असा असतो. कोणत्याही देशांनी सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन योग्यरीत्या केले नाही तर त्याच्या गंभीर परिणामांना संबंधित अर्थव्यवस्थेला सामोरे जावे लागते. कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये घेतलेल्या कर्जाचे व्यवस्थापन सुयोग्य रीतीने केले तर त्याची परतफेड करणे शक्य होते, अन्यथा कर्जाचे व्यवस्थापन हे अनुत्पादक कारणासाठी केल्यास त्या कर्जाची परतफेड करणे कोणत्याही अर्थव्यवस्थेला अतिशय अवघड जाते.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक कर्ज विकासाच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत असते, परंतु सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन अयोग्य आणि अकार्यक्षमतेने केल्यास ते देशाच्या आर्थिक विकासात अडचणी निर्माण करण्याची दाट शक्यता असते. थोडक्यात आपल्याला असं म्हणता येईल, देशामध्ये सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन योग्य रीतीने केल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी ते पोषक ठरते.

फिलीप टेलर शास्त्रज्ञांच्या मते सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन करताना खालील गोष्टी विचारात घेणे अतिशय महत्त्वाचं आहे.

१. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन योग्यरीतीने केल्यास शासनाला आवश्यक असलेले कर्ज

बाजारपेठेतून सहज उपलब्ध होते. या कर्जाची उपलब्धता करत असताना बाजारपेठेवर अनावश्यक दबाव पडणार नाही याची दक्षता घेणेही अत्यंत गरजेचे असते. तसेच त्याचा खर्चसुद्धा कमीत कमी राहील याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

२. शासनाने केलेले कर्ज व्यवस्थापन आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून पोषक असणे गरजेचे आहे.

३. अंदाजपत्रकामध्ये अडचणीच्या काळामध्ये कर्ज घेण्यासाठी कमीत कमी आवश्यकता निर्माण होईल अशी रचना निर्माण गरजेचे आहे, आपल्याला थोडक्यात असे म्हणता येईल की कर्जाचे व्यवस्थापन करताना बाजारातील व्याजदरावर त्याचा परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यामध्ये आणखी महत्त्वाचं म्हणजे सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन हे विकासाभिमुख असणे गरजेचे आहे.

४. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन लवचिक असावे लागते. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये त्यामध्ये बदल करणे सहज शक्य होईल.

सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचा संबंध सार्वजनिक कर्जाच्या संरचनात्मक वैशिष्ट्यांशी येतो. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन करत असताना सार्वजनिक कर्जाची परतफेड आणि व्याजावरील खर्च कमीत कमी असणे अत्यंत आवश्यक आहे. सार्वजनिक कर्जाचे दीर्घकालीन कर्जात रूपांतर तसेच सार्वजनिक कर्जविषयक धोरण राजकोषीय आणि मौद्रिक धोरणाशी सुसंगत असणे अर्थव्यवस्थेचा दृष्टीने फायद्याचे असते. ही सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनातील प्रमुख तत्त्वे सांगितली जातात. कर्ज व्यवस्थापन करत असताना त्याचा खर्च कमीत कमी राहील याची दक्षता घेणे क्रमप्राप्त असते, तसेच एकूण सार्वजनिक कर्जात अल्पकालीन कर्जाचे प्रमाण कमी प्रमाणात असावे यासाठी आपण अल्पकालीन कर्जाचे दीर्घकालीन कर्जामध्ये रूपांतर करण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर देशाचे राजकोषीय व मौद्रिक धोरण यांच्या धोरणाशी सुसंगत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा प्रकारे सार्वजनिक कर्जाची व्यवस्थापन करण्याची प्रमुख तत्त्वे सांगितली आहेत.

२.३ सारांश

अर्थव्यवस्थेतील शासनाची भूमिका पार पडत असताना शासनाला अर्थव्यवस्थेत सार्वजनिक खर्चाला अत्यंत महत्त्व असल्याचे आपल्याला दिसून येते. कोणताही देश आपल्या खर्चाचे सुयोग्य नियोजन केल्याशिवाय आर्थिक प्रगती करू शकत नाही, मग ती अर्थव्यवस्था भांडवलशाही असो, समाजवादी असो किंवा साम्यवादी असो. कोणत्याही प्रकारची अर्थव्यवस्था असली तरी सरकारला

सार्वजनिक खर्चाचे उत्तम नियोजन करून देशाच्या अर्थव्यवस्थेला प्रगतीपथावर नेण्याचे काम करावे लागते.

कोणत्याही देशाच्या आर्थिक व्यवस्थेसमोर आर्थिक प्रगती करणे हे प्रमुख उद्दिष्ट असते. परंतु प्रत्येक देशातल्या वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या निर्माण झालेली असतात, त्या समस्यांवर मार्ग काढून शासनाला अत्यंत आवश्यक गोष्टीवर सुयोग्य नियोजन करून खर्च करणे अनिवार्य असते त्यामुळेच देशातील आर्थिक विकासाला चालना मिळण्याची संधी असते. प्रत्येक देशाला आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करून घेण्यासाठी सार्वजनिक बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो तर अर्थव्यवस्थेमध्ये सरकारच्या भूमिकेबाबत अर्थशास्त्रामध्ये दोन प्रकारचे दृष्टिकोनातून येतात. सनातनवादी दृष्टिकोनानुसार ॲडम स्मिथ यांच्या भांडवलशाही अर्थव्यवस्था ही स्वयंचलित असते. तर आधुनिक दृष्टिकोनानुसार देशातील प्रत्येक घटकाचे महत्तम कल्याण होणे गरजेचे असल्याचे त्यामध्ये देशातील प्रत्येक नागरिकाला कल्याण प्राप्त करून देणे अपेक्षित आहे. यादृष्टीने शासनाला सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज यांचे सुनियोजन करावे लागते.

२.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. केंद्र सरकारने २०१३-१४ या आर्थिक वर्षात विकासात्मक खर्चासाठी .... कोटी रुपये खर्च केला होता.

(अ) ६०२५०३ कोटी *(क) ५८०८९७ कोटी*

(ब) ६३८१२४ कोटी *(ड) ३८३१०७ कोटी.*

२. केंद्र सरकारने २०१५-१६ या आर्थिक वर्षात बिगर विकासात्मक खर्चासाठी .... कोटी रुपये खर्च केला होता.

(अ) १०९१४७८ कोटी *(क) ८४२९८६ कोटी*

(ब) ११४३१६८ कोटी *(ड) ९४८५४७ कोटी.*

३. राज्य सरकारने २००९-१० या आर्थिक वर्षात विकासात्मक खर्चासाठी .... कोटी रुपये खर्च केला होता.

(अ) ४७४३५९ कोटी *(क) ५७००४८ कोटी*

(ब) ७४९१६६ कोटी *(ड) ६४६५९२ कोटी.*

४. राज्य सरकारने २००९ -१० या आर्थिक वर्षात बिगर विकासात्मक खर्चासाठी .... कोटी रुपये खर्च केला होता.

(अ) ४१४०३५ कोटी *क) २१२१२१ कोटी*

(ब) ५१६११९ कोटी *(ड) ३६३८१७ कोटी.*

५. कोणत्याही देशाला सार्वजनिक कर्ज उभा करताना कोणत्या मार्गाचा अवलंब करणे योग्य ठरते.

(अ) अतर्गत कर्ज *(क) आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना*

(ब) बहिर्गत कर्ज *(ड) युनो.*

६. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापनात महत्वाची भूमिका कोण बजावते.

(अ) केंद्र सरकार *(क) आर. बी. आय*

(ब) परकीय धोरण *(ड) मध्यवर्ती बँका.*

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *(ब) ६३८१२४ कोटी.*

२. *(अ) १०११४७८ कोटी.*

३. *(क) ५७००४८ कोटी.*

४. *(ड) ३६३८१७ कोटी.*

५. *(अ) अतर्गत कर्ज.*

६. *(अ) केंद्र सरकार.*

२.६ सरावासाठी स्वाध्याय

१. अर्थव्यवस्थेमध्ये विकासात्मक खर्चाचे महत्व विशद करा.

२. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात सार्वजनिक खर्चाची भूमिका स्पष्ट करा.

३. अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राची भूमिका स्पष्ट करा.

४. अर्थव्यवस्थेमध्ये शिक्षणक्षेत्राचे महत्त्व स्पष्ट करा.

५. सार्वजनिक कर्जातील गेल्या दशकातील शासनाच्या धोरणाचे सविस्तर स्पष्टीकारण करा.

६. अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक कर्जाची भूमिका स्पष्ट करा.

७. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये अंतर्गत कर्जाचे महत्त्व स्पष्ट करा.

८. अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन कसे असावे यावर आपले मत नोंदवा.

२.७ संदर्भ सूची

१. Indian Public Finance Statistics Report, 2016-2017, Ministry of Finance Department of Economic Affairs, Economic Division, Government of India.

२. Datta and Sundaram : Indian Economy, S. Chand and Company Private Limited, Ramnagar, New Delhi-110055.

३. Agarwal R. C. : Public Finance, Published by Lakshmi Narayan Agarwal Agra-2.

४. Indian Public Finance Statistics Report, 2016-2017, Ministry of Finance Department of Economic Affairs, Economic Division, Government of India.

५. डॉ. संतोष दास्ताने, 'सरकारी खर्च', स्त्रोत-मराठी विश्वकोश.

६. देसाई आणि भालेराव : 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, अभ्यत प्रगती-१३१२, शिवाजी नगर, पुणे-४११००५.

७. जे. एफ. पाटील : 'सार्वजनिक अर्थकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. देव सु. पा., झांबरे ग. ना. : 'राजस्व', प्रकाशक-मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे आणि कंपनी, प्रकाशक ८५, कॉनोल रोड, रामदास पेठ, नागपूर-४४० ०१०.

९. ओझरकर सु. रा.: 'राजस्व' प्रकाशक-श्री. प्रोमोद मुंजे, विद्या प्रकाशन, रुइकर रोड, महाल, नागपूर-४४० ००२.

१०. डॉ. संतोष दास्ताने : 'सरकारी कर्ज', स्त्रोत-मराठी विश्वकोश.

११. रंजन कोलंबी, भारतीय अर्थव्यवस्था.

१२. गजानन दत्तात्रय सरकटे : '१९९१ च्या आर्थिक सुधारणा', 22/11/2018. www. majhasakha.in

१३. डॉ. जी. आर. पाटील : 'आर्थिक सुधारणा', https://www.loksatta.com.

१४. लोकसत्ता, Fecruary 6, 2015 01:45 am.

१५. लोकसत्ता, Decemcer 7, 2017 1:00 am.

१६. कौस्तुभ जोशी, लोकसत्ता, January 14, 2019.

१७. लोकसत्ता, February 6, 2015, 01:45 am.

१८. लोकसत्ता, Decemcer 7, 2017 1:00 am.

१९. कौस्तुभ जोशी, लोकसत्ता, January 14, 2019.

❑❑❑

सत्र-३ : घटक-३

तुटीची वित्तव्यवस्था, स्थानिक वित्त आणि राज्यकोषीय धोरण
(Deficit Financing, Local Finance and Fiscal Policy)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ तुटीचा अर्थभरणा : तुटीच्या अर्थभरण्याच्या विविध संकल्पना

३.२.२ वित्तीय तूट कमी करण्यासाठी उपाय योजना

३.२.३ केंद्र आणि राज्य सरकाची अंदाजपत्रकीय वित्तीय तूट

३.२.४ गेल्या तीन वर्षातील केंद्र आणि राज्य सरकारच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण

३.२.५ स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाची प्रमुख साधने

३.२.६ स्थानिक वित्तव्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना

३.२.७ आर्थिक संकट आणि आर्थिक सुधारणा

३.२.८ राजकोषीय दायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा, २००३

३.३ सारांश

३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ संदर्भ सूची

३.० उद्दिष्टे

१. तुटीचा अर्थभरण्याची संकल्पना काय आहे ते अभ्यासता येईल.

२. वित्तीय तूट कमी करण्यासाठी उपाय योजना काय आहेत ते अभ्यासता येईल.

३. गेल्या तीन वर्षातील केंद्र आणि राज्य सरकारच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणे.

४. स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाची प्रमुख साधने आहे काय आहेत ते अभ्यासता येईल.

५. स्थानिक वित्तव्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना काय आहेत ते समजून घेता येईल.

६. आर्थिक संकट आणि आर्थिक सुधारणा या संकल्पना काय आहेत ते अभ्यासता येईल.

७. राजकोषीय दायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा, २००३ याची माहिती घेता येइल.

३.१ प्रस्तावना

जागतिक आर्थिक विकास वाढीचा वृद्धी दर लक्षात घेता भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी अर्थव्यवस्थेमधील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे अपेक्षित असते, त्यामध्ये शेती, उद्योग, व्यापार, सेवा-क्षेत्र इत्यादीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून अर्थव्यवस्थेला नियोजनबद्ध विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक असलेली साधन सामग्री, कर्ज उभारणी, कर आकारणी, पुरेशा भांडवलाची उभारणी करणे अशक्य असते. म्हणूनच शासनाला तुटीचा अर्थभरणा हा मार्ग अवलंबावा लागतो.

तुटीचा अर्थभरणा ही संकल्पना वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या अर्थानी वापरली जाते आणि त्याचा वेग वेगळा अर्थ पाहायला मिळतो. भारतात तुटीचा अर्थभरणा हा शब्द प्रयोग विशिष्ट अर्थाने वापरला जातो. नियोजन आयोगाच्या मते, सरकारच्या अंदाजपत्रकी व्यवहारामुळे अर्थव्यवस्थेतील खरेदीशक्तीत होणारी निव्वळ वाढ म्हणजे तुटीचा अर्थभरणा होय.

३.२ विषय विवेचन

३.२.१ तुटीचा अर्थभरणा

❑ तुटीचा अर्थभरणा म्हणजे काय?

सर्वसाधारणपणे शासनाचा चालू महसूलापेक्षा चालू खर्च हा अधिक होतो त्या वेळेला जो ज्यादाचा झालेला खर्च भरून काढण्यासाठी सार्वजनिक कर्जाचा वापर केला जातो, त्यावेळी आपण तुटीचा अर्थभरणा झाला असे म्हणतो. सार्वजनिक कर्जाचा वापर केवळ तुटीचा अर्थभरणासाठीच केला जातो, असे नाही तर अन्य काही करणासाठी पण वापर केला जातो.

सरकाराला वेगवेगळ्या मार्गांनी उत्पन्न मिळत असते. उदाहरणार्थ कर, शुल्क, व अनुदान इत्यादी अनेक मार्गांनी उत्पन्न मिळत असते. या सर्वच मार्गांनी मिळणाऱ्या उत्त्पनापेक्षा शासनाचा खर्च

अधिकच असतो. हा जो जादाचा खर्च भरून काढण्यासाठी शासन तुटीचा अर्थभरणा मार्ग अवलबंते. शासन नेहमीच्या मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जादाचा हा खर्च भरून काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेजवळ किंवा ट्रेझरीजवळ ठेवलेली रोख रक्कमसुद्धा वापरू शकते अथवा नवीन नोटांची छपाई अथवा शासन रिझर्व्ह बँकेकडून कर्ज सुद्धा घेऊ शकते. यापैकी कोणतीही योजना अंमलात आणून शासन अर्थव्यवस्थत पेशाच्या पुरवठ्यात वाढ घडून आणण्याचा प्रयत्न करते.

सोप्या भाषेत आपण उदाहरणासहित तुटीचा अर्थभरणा म्हणजे नेमकं काय ते समजून घेऊया. भारत सरकारचे एकूण उत्पन्न १,००,००० रुपये आहे. आणि सरकारचा एकूण खर्च २,००,००० रुपये आहे. तर शासनाला वरील जादाचा खर्च १,००,००० रुपये हे कर्जाच्या स्वरूपात इतर अंतर्गत किंवा संस्थांच्या कडून घ्यावे लागतात या १,००,००० उभा करण्यासाठी जो पर्याय वापरला जातो आणि वरील १,००,००० रुपयांचा खर्च भरून काढला जातो. या भरून काढलेल्या खर्चास आपण तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात.

अ) तुटीच्या विविध संकल्पना

अ) महसुली तूट = महसूली उत्पन्न - महसुली खर्च.

ब) अर्थसंकल्पीय तूट = एकूण उत्पन्न - एकूण खर्च.

क) राजकोषीय/वित्तीय तूट = एकूण खर्च - महसूली उत्पन्न + कर्ज वसुली व + इतर भांडवली मिळकत.

ड) प्राथमिक तूट = राजकोषीय तूट-घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा खर्च.

अशाप्रकारे महसूल तूट अंदाजपत्रकीय तूट, राजकोषीय/वित्तीय तूट, प्राथमिक तूट हे राजकोषीय संकटाचे प्रमुख निर्देशक आहेत.

३.२.१ वित्तीय तूट कमी करण्यासाठी उपाय योजना

वित्तीय तुटीची संकल्पना अर्थव्यवस्थेमध्ये औषधासारखे काम करते, जास्त प्रमाणात कर्ज घेतले तर ते अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने धोकादायक होऊ शकतो आणि योग्य प्रमाणात त्याचा वापर झाल्यास ती अर्थव्यवस्थेच्या फायद्याचे अथवा पोषक ठरू शकते.

१. करावर आधारित असलेल्या महसुलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करून, कर चोरीसाठी अथवा कर चुकवेगिरीला आळा घालने अत्यंत आवश्यक आहे, आणि कर चुकवेगिराना मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.

२. ज्या मालमत्ताचे अथवा संपत्तीचे प्रभावीपणे विनियोग योग्य प्रकारे होत नसल्यास त्या

मालमत्तेचे निर्गुंतवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे.

३. सरकारकडून दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या अनुदानामार्फत सुद्धा वित्तीय तूट कमी करणे शक्य आहे. शासनाने अनुदानाचा उपयोग कमी प्रमाणात केल्यास सुद्धा वित्तीय तूट भरून मिळण्यासाठी मदत होते.

४. शासनाने अनियोजित खर्च मर्यादित केल्यास किंवा तो टाळल्यास किंवा टाळण्याचा प्रयत्न केल्यास सरकारी तूट कमी करणे शक्य आहे.

५. स्वदेशांमध्ये उपलब्ध असलेल्या मोठ्या भांडवली संस्था कडून कर्ज घेऊन सुद्धा ही सरकारी तूट कमी करणे शक्य आहे.

६. शासन संकटकाळी बाह्य स्त्रोताकडून सुद्धा कर्ज घेऊ शकते.

७. शासन प्रचलित करप्रणाली पेक्षा थोडासा जास्तीचा कर वाढवूनसुद्धा वित्तीय तूट कमी करणे शक्य आहे.

८. विकासात्मक बाबींसाठी गुंतवणूक करण्यास जास्तीत जास्त भर देण्याचा प्रयत्न करणे.

९. शासन अतिरिक्त उत्पन्न हा मार्ग अवलंबून लोकांच्या बचतीमधून आणि करामध्ये वाढ करूनसुद्धा वित्तीय तुटीवर नियंत्रण आणू शकते.

१०. अर्थव्यवस्थेमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक ही मोठ्या प्रमाणामध्ये भांडवलाचा परतावा देणारी गुंतवणूक असते त्यामुळे अल्प काळाचा विचार न करता दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी शासनाने कायम प्रयत्नशील असणे गरजेचे आहे.

११. अर्थव्यवस्थेमध्ये बाजारपेठेतील वाढत्या किमतीवर नियंत्रण ठेवून शासनाला वित्तीय तूट भरून काढण्यास मदत होते.

३.२.३ केंद्र आणि राज्य सरकाची अंदाजपत्रकीय वित्तीय तूट

केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या अंदाजपत्रकीय तुटीचा अभ्यास आपण पुढील तक्ता नं. ३.१ द्वारे विश्लेषणात्मक पद्धतीने करूया. तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे ही तूट केंद्र आणि राज्य सरकाची अंदाजपत्रकीय वित्तीय तूट अशी एकूण दोन विभागांमध्ये विभागली आहे. केंद्र सरकारला आलेली वित्तीय तूट आणि राज्य सरकारला आलेली वित्तीय तूट याचा विश्लेषणात्मक अभ्यास आपण येथे केला आहे.

तक्ता क्र. ३.१ : केंद्र आणि राज्य सरकारची अंदाजपत्रकीय वित्तीय तूट

(आकडे कोटी मध्ये)

वर्ष	केंद्र	राज्य	एकूण
२०००-०१	६९११	-७८२०	- ९०९
२००१-०२	३४१०	- ७३	३३३७
२००२-०३	१००९५	- ७०५३	३०४३
२००३-०४	- ४७९६	- ७७८०	- १२५७६
२००४-०५	- ६३८१९	- १२७५५	- ७६५७४
२००५-०६	६४८५०	- ३७०९६	२७७५४
२००६-०७	२५९३०	५६५७८	८२५०८
२००७-०८	३१०	- १२७३९	- १२४३०
२००८-०९	१५२१९३	- ४८४५	१४७३४८
२००९-१०	- ११९५५	८७५१	- २४०४
२०१०-११	१४१८९	- २२७०६	- ८५१७
२०११-१२	१११९५६	- १४००३	९७१५४
२०१२-१३	२३३८	- २४९९७	- २२६५९
२०१३-१४	- ११४३७	१७१२६	५६८९
२०१४-१५	८७०२४	१८६०२	१०५६२६
२०१५-१६ (सुधारित अंदाजे-RE)	४६५७८	४४६६१	९१२३९
२०१६-१७ (अंदाजित - BE)	२९८४४	- २४४२	२७४०२
स्रोत : *Handbook of Statistics on The Indian Economy, Reserve Bank of India, 2017-18.*			

तक्ता नं. ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण तूट २००००-०१ साली ९०९ कोटी रुपये इतकी होती त्यामध्ये हळूहळू वाढ होऊन ती दोन हजार पाच सहा या आर्थिक वर्षामध्ये २७,७५४ कोटी रुपये इतकी झाली. त्यानंतर वाढीचा आलेख सतत वाढत गेला आणि तो २०१४-१५ या वर्षामध्ये १,०५,६२६ कोटी रुपये पर्यंत वाढत गेले. २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये त्यामध्ये थोडीफार घट होऊन ती २७४०२ कोटी रुपये इतकी झाली.

केंद्र सरकारची अंदाजपत्रकीय तूट २०००-०१ या वर्षामध्ये ६९११ कोटी रुपये इतकी होती. त्यानंतर त्यामध्ये वाढ होत, ती वाढ २००६-०७ या आर्थिक वर्षात २५९३० कोटी रुपये पर्यंत वाढत

गेली. त्यानंतर ही वाढ २०११-१२ या वर्षामध्ये १११९५६ कोटी रुपये पर्यंत झाल्याचे आपणास दिसून येते आणि ती वाढ सातत्याने वाढत जाऊन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये २९८४४ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते.

राज्य सरकारच्या अंदाजपत्रकीय वित्तीय तुटीमध्ये २०००-०१ मध्ये -७८२० कोटी रुपये इतकी होती. नंतर त्यामध्ये वाढ होऊन २००६-०७ ला ५६५७८ कोटी रुपये झाला आणि नंतर त्यामध्ये सातत्याने कमी जास्त प्रमाणात वाढ होत गेली आणि शेवटी २०१६-१७ मध्ये ही -२४४२ कोटी रुपये इतका झाला असे आपल्याला वरील तक्त्यातून दिसून येते.

३.२.४ गेल्या तीन वर्षातील केंद्र आणि राज्य सरकाराच्या अर्थसंकल्पांचे विश्लेषण

केंद्र शासनाच्या वर्ष २०१९-२० साठी चालू तूट जीडीपीच्या ३.४ टक्के इतकी झाली. वर्ष २०२०-२१ पर्यंत चालू तूट ३ टक्के घटविण्याचे ध्येय निश्चित करण्यात आली आहे. सात वर्षांपासून निरंतर ६ टक्के असणारी चालू आर्थिक तूट वर्ष २०१८-१९ मध्ये सुधारीत ३.४ टक्क्यांपर्यंत कमी झाली , वर्ष २०१९-२० मध्ये अंदाजपत्रकीय प्रस्तावित एकूण खर्च १३ टक्क्यांनी वाढवून २७,८४,२०० कोटी रुपये करण्यात आला. वर्ष २०१९-२० मध्ये अंदाजपत्रकीय प्रस्थापित भांडवली खर्च ३,३६,२९२ कोटी ठरविण्यात आला आहे. तसेच जागतिक अर्थव्यवस्थेशी तुलना करता भारताकडे प्रभावी कामगिरी करणारा देश म्हणून गेली पाच वर्षे पाहिले गेले.

तक्ता क्र. ३.२ : केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ ते २०१९-२०

	२०१६-१७ वास्तविक	२०१७-१८ अंदाजित	२०१८-१९ अंदाजित	२०१९-२० अंदाजित
महसूली उत्पन्न	१४,३५,२३३	१७,२५,७३८	१७,२९,६८२	१९,७७,६९३
भांडवली उत्पन्न	७,०६,७४२	७,१६,४७५	७,२७,५५३	८,०६,५०७
एकूण उत्पन्न	**२१,४१,९७५**	**२४,४२,२१३**	**२४,५७,२३५**	**२७,८४,२००**
योजनाविरहित खर्च	५,२८,९५२	५,७५,७९५	५,८७,५७०	६,६५,०६१
योजना खर्च	१८,७८,८३५	२१,४१,७७२	२१,४०,६१२	२४,४७,९०७
एकूण खर्च	**२१,४१,९७५**	**२४,४२,२१३**	**२४,५७,२३५**	**२७,८४,२००**
महसुली तूट	४,४३,६०२	४,१६,०३४	४,१०,९३०	४,७०,२१४
वित्तीय तूट	५,९१,०६४	६,२४,२७६	६,३४,३९८	७,०३,९९९
प्राथमिक तूट	६२,११२	४८,४८१	४६,८२८	३८,९३८

स्रोत : *केंद्रीय अर्थसंकल्प २०१६-१७ ते २०१९-२०.*

आलेख नं. ३.१



तक्ता क्र.३.२ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्प २०१६–१७ चे एकूण उत्पन्न २१,४१,९७५ कोटी इतके तर महसुली उत्पन्न १४,३५,२३३ आणि भांडवली उत्पन्न ७०६,७४२ कोटी रुपये इतके होते. एकूण खर्च २१,४१,९७५ कोटी रुपये कोटी इतके तर योजना विरहित खर्च ५,२८,९५२ कोटी रुपये, योजना खर्च १८,७८,८३५ कोटी रुपये, त्यानंतर महसुली तूट ४,४३,६०२ कोटी रुपये वित्तीयतूट ५,९१,०६४ कोटी रुपये प्राथमिक तूट ६२,११२ कोटी रुपये असल्याचे आपल्याला वरील तक्त्यातून दिसून येते.

तक्ता क्र.३.२ मध्ये अर्थसंकल्प २०१७–१८ एकूण उत्पन्न २४४२२१३ कोटी इतके तर महसुली उत्पन्न १७,२५,७३८ आणि भांडवली उत्पन्न ७,१६,४७५ कोटी रुपये इतके होते. एकूण खर्च २४,४२,२१३ कोटी रुपये कोटी इतके तर योजना विरहित खर्च ५,७५,७९५ कोटी रुपये, योजना खर्च २१,४१,७७२ कोटी रुपये ,त्यानंतर महसुली तूट ४,१६,०३४ कोटी रुपये वित्तीय तूट ६,२४,२७६ कोटी रुपये प्राथमिक तूट ४८,४८१ कोटी रुपये असल्याचे आपल्याला वरील तक्त्यातून दिसून येते.

तक्ता क्र.३.२ मध्ये अर्थसंकल्प २०१८–१९ एकूण उत्पन्न २४,५७,२३५ कोटी इतके तर महसुली उत्पन्न १७,२९,६८२ आणि भांडवली उत्पन्न ७,२७,५५३ कोटी रुपये इतके होते. एकूण खर्च २४,५७,२३५ कोटी रुपये कोटी इतके तर योजना विरहित खर्च ५,८७,५७० कोटी रुपये, योजना खर्च २१,४०,६१२ कोटी रुपये, त्यानंतर महसुली तूट ४,१०,९३० कोटी रुपये वित्तीय तूट ६,३४,३९८ कोटी रुपये प्राथमिक तूट ४६,८२८ कोटी रुपये असल्याचे आपल्याला वरील तक्त्यातून दिसून येते.

तक्ता क्र.३.२ मध्ये अर्थसंकल्प २०१९-२० एकूण उत्पन्न २७८४२०० कोटी इतके तर महसुली उत्पन्न १९,७७,६९३ आणि भांडवली उत्पन्न ८,०६,५०७ कोटी रुपये इतके होते. एकूण खर्च २७,८४,२०० कोटी रुपये कोटी इतके तर योजना विरहित खर्च ६,६५,०६१ कोटी रुपये, योजना खर्च २४,४७,९०७ कोटी रुपये, त्यानंतर महसुली तूट ४,७०,२१४ कोटी रुपये वित्तीय तूट ७,०३,९९९ कोटी रुपये प्राथमिक तूट ३८,९३८ कोटी रुपये असल्याचे आपल्याला वरील तक्त्यातून दिसून येते.

शेती, सामाजिक क्षेत्र, शिक्षण आणि आरोग्य इत्यादी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक किंवा खर्च करून मोठ्या प्रमाणात पायाभूत विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे दिसून येते. यासाठी शासनाने ३,२६,९६५ कोटी रुपये तरतूद केली आहे. कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून उत्पादन वाढीस प्रेरणा देण्यासाठी शासनाने शेतमाल विकास व शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या आहेत.देशातील प्रत्येक राज्याच्या आर्थिक विकास व वृद्धी होण्यासाठी केंद्र शासनाने भरघोस अशा निधीची तरतूद राज्य शासनांनी त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी केल्याचे आपणास अर्थसंकल्पावरून दिसून येते. केंद्र शासनाच्या अंदाजपत्रक २०१९-२० मधील महत्त्वाच्या काही ठळक बाबी आपण खालीलप्रमाणे पाहूया.

- **अर्थसंकल्प २०१९-२० ठळक बाबी/तरतुदी**
  - बारा कोटी लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान योजनेद्वारे वार्षिक सहा हजार रुपयांच्या मिळकतीची हमी देण्यात आली.
  - यासाठी २०१९-२० या आर्थिक वर्षात ७५ हजार कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. शिवाय २०१८-१९ वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात २० हजार कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद.
  - शेतकऱ्यांना पशु उत्पादन आणि मत्स्योद्योग व्यवसायासाठी व्याजात दोन टक्के परतावा. वेळेवर कर्जफेड करणाऱ्यांसाठी ३ टक्के अतिरिक्त परताव्याची संधी देण्यात आली.
  - गो-धनाच्या शाश्वत जनुकिय श्रेणीवाढीचे प्रयत्न करण्यासाठी राष्ट्रीय कामधेनु आयोगाची स्थापना करण्यात आली.
  - आपत्ती काळात शेतकऱ्यांना उपलब्ध होणारा २ टक्के व्याज परतावा कर्जाच्या फेररचनेच्या पूर्ण कालावधीत मिळण्याची तरतूद.
- **श्रमिक विभाग :-**
  - असंघटीत क्षेत्रातील १० कोटी कामगारांना मासिक निवृत्ती वेतनाची सुनिश्चिती करण्यासाठी 'प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना' सुरु करण्यात आली.
  - केवळ १०० किंवा ५५ रुपयांच्या मासिक सहभागाने ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर मासिक ३

हजार रुपये निवृत्ती वेतनाची तरतूद करण्यात आली.

- ☞ २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी ६० हजार कोटी रुपयांची तरतूद.
- ☞ वैयक्तिक करदात्यांचे ५ लक्ष रुपयांपर्यंतचे उत्पन्न आयकर मुक्त.
- ☞ ३ कोटी मध्यमवर्गीय करदात्यांना २३ हजार कोटी रुपयांहून अधिक आयकर सूट.
- ☞ वार्षिक प्रमाण वजावटीची (स्टँडर्ड डिडक्शनची) रक्कम ४० हजार रुपयांवरुन ५० हजार रुपये एवढी वाढविली.
- ☞ बँक आणि टपाल खात्यातील ठेवींवरील व्याज मर्यादा १० हजार रुपयांवरून ४० हजार रुपये करण्यात आली आहे.
- ☞ गरिबांसाठी शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण.
- ☞ सौभाग्य योजनेअंतर्गत प्रत्येक घरात विज जोडणी.
- ☞ आयुष्यमान भारत योजना : ५ कोटी लोकांसाठी जगातील सर्वात मोठा आरोग्य कार्यक्रम.
- ☞ ११५ पिछाडलेल्या जिल्ह्यांमध्ये महत्त्वकांक्षी जिल्हा कार्यक्रम.
- ☞ गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी स्वस्त धान्य खरेदी करण्यासाठी २०१८-१९ मध्ये एक लाख ७० हजार कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद करण्यात आली.
- ☞ आयुष्यमान भारत योजने द्वारे १० लाख रुग्णांना फायदा देण्याचे ठरवाले आहे.
- ☞ २०१४ मध्ये घोषणा झाल्यापासून आजवर २१ पैकी १४ एम्स रुग्णालय कार्यरत करण्याचे योजले आहे.
- ☞ प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत २०१४-१८ या काळात १.५३ कोटी घरे बांधली.
- ☞ उज्वला योजनेद्वारे ६ कोटी घरगुती गॅस जोडण्या देण्यात आल्या.
- ☞ ८ कोटी जोडण्या पुढच्या वर्षापर्यंत देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

एकूणच या वर्षीच्या अंदाज पत्रकात मोठ्या प्रमाणात विकास योजनाचे नियोजन शासनाने केले आहे.

तक्ता क्र. ३.३ : मागील तीन वर्षातील राज्य सरकारांच्या अर्थसंकल्पांचे विश्लेषण

(आकडे कोटी रु.मध्ये)

	२०१६-१७ वास्तविक	२०१७-१८ अंदाजित	२०१८-१९ अंदाजित
महसूली उत्पन्न	२०,४६,४००	२४,५७,७१८	२८,१२,९९४
भांडवली उत्पन्न	६,७५,३८३	५,९४,१७९	७,०६,६६२
एकूण उत्पन्न	२७,२१,७८४	३०,५१,८९७	३५,१९,६४६
योजनाविरहित खर्च	७,१०,३६५	८,६४,६५७	९,८६,३६७
योजना खर्च	१८,३१,१६४	२०,९२,५२४	२२,९०,५१२
एकूण खर्च	२७,०८,२१९	३१,७७,४११	३५,५९,७२९
महसुलीतूट	४०,४९१	६१,०७९	-२९,२१९
वित्तीयतूट	५,३४,३३२	५,१४,३१६	४,८६,५१३
प्राथमिक तूट	२,८३,०२९	२,२१,५६९	१,७१,०५८
स्त्रोत : Handbook Of Statistics On The Indian Economy, Reserve Bank Of India 2017-18			

❑ महाराष्ट्र राज्याचा २०१८-१९ साठीचा अर्थसंकल्प

महाराष्ट्र राज्याचा २०१८-१९ या अर्थसंकल्पात १५ हजार ३७५ कोटी रुपयांची विक्रमी महसुली तूट अपेक्षित धरण्यात आली आहे. २०१८-१९ मध्ये राज्याची महसुली जमा दोन लाख ८५ हजार ९६८ कोटी रुपये राहील, तर महसुली खर्च तीन लाख एक हजार ३४३ कोटी रुपये राहील, असा अंदाज आहे. त्यामुळे १५ हजार ३७५ कोटी रुपयांची विक्रमी महसुली तूट होणार आहे. मागील अर्थसंकल्पात ४५११ कोटी रुपयांची महसुली तूट अपेक्षित धरण्यात आली होती. चालू आर्थिक वर्षात राज्याच्या इतिहासातील सर्वाधिक महसुली तूट आली आहे.

✡ अर्थसंकल्प २०१८-१९ ठळक वैशिष्ट्ये/तरतुदी

- ☞ गृह विभागासाठी १३,३८५ कोटी.
- ☞ रस्तेबांधणीसाठी २२५५ कोटी.
- ☞ विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग विभागासाठी २,९६३ कोटी ३५ लाख.
- ☞ स्मार्ट सिटी अभियानात निवड झालेल्या आठ शहरांसाठी १३१६ कोटींची तरतूद प्रस्तावित.

- ☞ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षांत राज्यातील रस्ते विकासासाठी १०,८२८ कोटींचा निधी प्रस्तावित आहेत.
- ☞ एसटीच्या प्रस्तावित मालवाहतूक योजनेसाठी ४० कोटींची तरतूद करण्यात आली.
- ☞ मिहान प्रकल्पाकरिता १०० कोटींची तरतूद.

❑ **ग्रामीण आरोग्य :-**

ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपाय योजनाचे नियोजन केले आहे.ग्रामीण भागात सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्याने गंभीर आजार उद्भवतात. ही बाब लक्षात घेऊन सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केला जाणार आहे. ज्या गावची लोकसंख्या १५ हजार किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्या ठिकाणी 'मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थापन प्रकल्प' ही योजना राबवली जाईल. २०१८-१९ मध्ये यासाठी ३३५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला जाणार आहे.

❑ **घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प :-**

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी शासनाने गांभीर्याने दाखल घेत आतापर्यंत राज्यातील १५२ शहरांमध्ये १८५६ कोटी ३६ लाख किंमतीच्या घनव्यवस्थापन प्रकल्पांना सरकारकडून मंजूरी देण्यात आली आहे. राज्यातील २१० शहरांत ओला व सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करण्यात येते. २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात १ हजार ५२६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या तरतुदीमुळे शहरातील कचऱ्याची समस्या संपुष्टात येईल व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

❑ **महिला :-**

केंद्र सरकारच्या नवीन स्वाधारगृह योजना- २०१५ च्या निकषानुसार राज्यात सध्या ३३ अल्पमुदती निवासगृहे व ५३ स्वाधारगृहे निर्माण करण्यात आली आहेत. या दोन्हींना एकत्रित करून संकटग्रस्त महिलांसाठी स्वाधारगृहे निर्माण करण्याची नवीन योजना आहे. यासाठी २० कोटींची तरतूद आहे. १६ जिल्ह्यांसाठी तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी २१ कोटी १९ लाखांची योजना राबविली जाणार आहे.

❑ **पर्यटन :-**

गणपतीपुळे येथे पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी यावर्षी २० कोटी रु. निधीची तरतूद. माचाळ (तालुका-लांजा, जि. रत्नागिरी) येथे नवीन पर्यटन स्थळ- १५० कोटींच्या विकास आराखड्यास मंजूरी. विदर्भातील रामटेक या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता यावर्षी २५ कोटींची तरतद. १० कोटी रु. कोकणातील मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधीची तरतूद. ५ कोटी रु. निधी

सिरोंचा (ता.गडचिरोली) येथील हजारो वर्षांपूर्वीच्या जीवाष्मांचे (फॉसिल्स) जतन, संरक्षण व अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून सिरोंचा येथे जीवाष्म संग्रहालयाची स्थापना करणार. संशोधन व पर्यटन विभागाच्या दृष्टीकोनातून कोकणातील सागर किनाऱ्यावरील कातळ शिल्पांचे जतन, त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी २४ कोटींची तरतूद. सातारा येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या बांधकाम व सुशोभिकरणासाठी ५ कोटी रुपये निधीची तरतूद.

- **हवाई वाहतूक :–**

मिहान प्रकल्पांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासासाठी यावर्षी १०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

- **रस्ते :–**

राज्यातील रस्ते बांधकामासाठी आणि विकासासाठी १० हजार ८२८ कोटी खर्चाचा प्रस्ताव आहे. शिवाय रस्ते दुरुस्ती आणि पूल बांधकामासाठी ३०० कोटींची तरतूद. मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवेच्या विस्तारासाठी ४ हजार ७९७ कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी. ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी यावर्षी २ हजार २५५ कोटी ४० लाख रुपयांचा निधी प्रस्तावित आहे.

- **ऊर्जा :–**

ऊर्जा निर्मितीसाठी आणि विभागाच्या पायाभूत सुविधेसाठी ७ हजार २३५ कोटीं, महावितरणसाठी ३६५ कोटी ५५ लाख, अपारंपरिक उर्जेसाठी ७७४ कोटी ५३ लाख, वीजनिर्मितीसाठी ४०४ कोटी १७ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

- **वस्त्रोद्योग :–**

वस्त्रोद्योग विकासासाठी शासनाने सहकारी सूतगिरण्यांना प्रति युनिट ३ रुपये दराने, तर सहकारी सूतगिरण्या व्यतिरिक्त अन्य वस्त्रोद्योग संचांना प्रति युनिट २ रुपये दराने वीज अर्थसाहाय्य. विणकाम व विणमाल (होजिअरी) संचांनाही अर्थसाहाय्य. नवीन संचांना प्रकल्प खर्चाच्या २५ टक्क्यांपर्यंत अर्थसाहाय्य. कापूस उत्पादक क्षेत्रातील संयुक्त गिरण्यांसाठी ४५% अर्थसाहाय्य. प्रकल्प खर्चाच्या ९ कोटी रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य पुरवून वस्त्रोद्योग केंद्रांना चालना.

- **सूक्ष्म लघुउद्योग :–**

सूक्ष्म लघु उद्योगाना चालना देण्यासाठी सूक्ष्म व लघु उद्योगांना परवडणाऱ्या किमतीत जागा देण्यासाठी 'विस्तारित गाळा योजने'ची घोषणा. त्यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध करून दिला. राज्यात ४४ सूक्ष्म व लघु उद्योग समूहांना मंजुरी. त्याद्वारे ३ वर्षांत १०० कोटी रुपये अपेक्षित अनुदानासह प्रोत्साहन व एक लाख थेट रोजगार. महिला उद्योजकांकरिता विशेष धोरण घोषित केले

असून त्याद्वारे पाच वर्षांत त्यांच्या संख्येत ९ टक्क्यांवरून २० टक्के इतकी वाढ अपेक्षित.

- **स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाची प्रमुख चार साधने आहे**

  १. कर, स्थानिक साधने.

  २. राज्य सरकारकडून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा.

  ३. अनुदाने.

  ४. कर्ज.

या प्रमुख चार साधनांच्या माध्यमातून स्थानिक संस्थांना आपल्या उत्पन्नाची साधने मिळवता येत असतात. संस्थाचे उत्पन्न आणि खर्च यामध्ये समन्वय राहण्याच्या भूमिकेतून राज्य सरकारची अतिशय महत्त्वाची भूमिका असली पाहिजे त्यासाठी राज्य शासनाने आपल्या करातून किंवा कर उत्पन्नातून जास्तीत जास्त कराचा वाटा स्थानिक संस्थांना देणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे शासनाने योग्य रीतीने शास्त्रीय पद्धतीने अनुदाने आणि तीही अत्यंत वेळेवर देणे गरजेचे आहे. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांना आपला खर्च भागवण्यासाठी वेगवेगळ्या संस्थांकडून कर्ज घ्यावं लागतं त्या कर्जाची हमी राज्य शासनाला द्यावी लागते किंवा राज्य शासनाने देणे गरजेचे आहे राज्य शासनाने हमी दिली तर स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात कर्ज मिळणे शक्य होते. म्हणजे आपल्याला असे म्हणता येईल की, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या उत्पन्न आणि खर्च यामध्ये योग्य रीतीने समन्वय साधण्याच्या दृष्टीने राज्य सरकारचा कार्यभाग हा अतिशय महत्त्वाचा आणि प्रमुख भूमिका असताना आपल्याला दिसून येते.

स्थानिक संस्थांना अनेक बाबीवर खर्च करावा लागतो त्यामध्ये नोकरदार वर्गाचा पगार, रस्ते, पूल, स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, आरोग्य, शिक्षण इत्यादी वरील चालू खर्चाचा समावेश करण्यात येतो तर भांडवली खर्च सुद्धा शासनाला करावा लागतो उदाहरणार्थ शाळेच्या इमारतींची बांधणी करणे, दवाखाने उभा करणे पाणीपुरवठा च्या नवीन योजना कार्यान्वित करणे बाजार समिती तयार करण अशा पद्धतीने शासनाला किंवा स्थानिक संस्थांना मोठ्या प्रमाणात प्रशासकीय खर्च असतो या सर्व मोठ्या खर्चातून म्हणजेच विकासात्मक खर्चासाठी शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना कमी निधी उपलब्ध होतो तेव्हा राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी पुरवावा अशी स्थानिक स्वराज्य संस्थांची अपेक्षा असते. अनुदान याच्या व्यतिरिक्त इतर दुसरी काही वित्तीय साधनेसुद्धा स्थानिक संस्थांना उपलब्ध असतात, त्यामध्ये गुरांचे कोंडवाडे, खत विक्री, स्थानिक क्षेत्रातील वणे, चराऊ गायरान यांची कंत्राटे आणि विक्री, आणि विशिष्ट प्रकारचे उत्पादन आणि सेवा विक्री, उदाहरणार्थ, शेतकी शाळा निर्माण केलेल्या मालाची विक्री, महानगरपालिकेने चालविलेल्या बस किंवा वाहतुकीत झालेला नफा, नदीवरील रेती विक्रीपासून झालेले उत्पन्न इत्यादी प्रकारे स्थानिक संस्थांना

उत्पन्न उभारण्यासाठी मार्ग अवलंबता येतात.

परंतु या सर्व साधनाचे स्वरूप निश्चित नसते आणि याचा अंदाज करता येणे कठीण आहे. या उत्पन्न साधनाचे योजनाबद्ध प्रयत्न केले असता अशी उत्पन्न साधने (बस वाहतूक, कंपोस्ट खत खड्डे) अशा काही सुविधा स्थानिक संस्थांना सहजरीत्या उत्पन्न मिळवून देऊन जातात. ग्रामपंचायत सारख्या स्थानिक सत्तांना शेती विकासाच्या वर्तमान युगात, अनेक शेतीची अवजारे भाड्याने घेऊन नियमित स्वरूपात उत्पन्न मिळवण्याची शक्यता आजही निर्माण झाली आहे. ट्रॅक्टर पासून फवारणी यंत्रांपर्यंत अनेक अवजारे ते विकत घेऊन शेतकऱ्यांना वापरायला देऊ शकतात त्यामुळे एका बाजूने पंचायतीला भाड्याने उत्पन्न मिळते आणि दुसऱ्या बाजूला शेतीच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळून गाव भागातील कर देय क्षमता वाढण्यास भरपूर प्रमाणात मदत होते.

३.२.६ स्थानिक वित्तव्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना

लोकशाहीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष महत्त्व असते. स्थानिक संस्थेच्या आर्थिक विकासावर मोठ्या प्रमाणात भर देण्याची गरज आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे संस्थांच्या यशापयशावर लोकशाहीची नियमित वाटचाल सुरू असते. दिवसेंदिवस स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढत आहे मात्र त्या प्रमाणात उत्पन्न स्त्रोतांमध्ये वाढ होत नाही. एल.सी.टंडन या तज्ञांच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थांची तुलना अशा व्यक्तीशी केली आहे, की व्यक्तीचे शरीर वाढत आहे, परंतु त्या व्यक्तीसाठी लागणारे कपडे मात्र घटत आहेत. याबाबत सरदारवल्लभभाई पटेल म्हणतात की स्थानिक संस्थांना पर्याप्त पैसे दिल्याशिवाय त्यांच्या अधिकारात वाढ करणे म्हणजेएखाद्यामृत स्त्रीला समजावणे प्रमाणे होय. थोडक्यात असे म्हणता येईल स्वराज्य संस्थांच्या कारभार कार्यक्षमतेने कार्यान्वित करणे, आणि त्यामध्ये करवसुलीचे प्रमाण वाढवणे कोणत्याही संस्थेच्या दृष्टीने अतिशय हितकारक असते. थोडक्यात असे म्हणता येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनेक उत्पनाची साधने असली पाहिजेत, तरच त्यांची स्थिती सुधारण्यासाठी मदत होईल.

प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या कार्यक्षेत्रामध्ये खर्च करत असते. परंतु केला जाणारा खर्च पूर्ण कार्यक्षमतेने केला जाईल असेच नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे काही संस्थांचे क्षेत्र तुलनेने लहान असते. अशावेळी कार्यक्षेत्रातील दोन किंवा तीन स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्र येऊन खर्च करणे हे संयुक्तिक असल्याचे म्हंटले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेतील खर्चाच्या मर्यादेची सीमा ओलांडणे सहज शक्य होते.

वित्तीय स्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचविण्यात आले आहेत उपायांचे सविस्तर वर्णन पुढील मुद्यांच्या आधारे केले आहे.

१. अशा संस्थांची उत्पन्नाची साधने वाढवणे गरजेचे आहे तर मिळालेल्या उत्पन्नापासून सुयोग्य पर्याय उत्पन्न मिळवणे गरजेचे आहे.

२. राज्य सरकार आणि स्थानिक संस्था यांच्यामध्ये वित्तीय साधनांचे वितरण होते त्यामध्ये संतुलन व समन्वय असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तरच ते यशस्वीपणे पूर्ण करता येईल म्हणूनच पर्याप्त उत्पन्न मिळेल अशी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या मिळणाऱ्या उत्पन्नाच्या साधनांची वेळोवेळी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे आणि त्यामध्ये पारदर्शकता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे तरच अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल आणि उत्पन्नातील काही अडचणी असल्यास त्या समोर येतील.

४. स्थानिक संस्थांना केंद्र व राज्य सरकार अनुदान देते त्या अनुदानामध्ये वेळेनुसार आणि काळानुसार बदल होणे अत्यंत गरजेचे आहे, तरच स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास होण्यास जलद गतीने चालना मिळेल.

५. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेने भविष्य काळामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत कोणत्या पद्धतीने जास्तीत जास्त वाढतील यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे तरच वाढत्या कार्याचा खर्च भागविणे शक्य आहे.

६. स्थानिक स्वराज्य संस्थांनी नव-नवीन उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे किंवा त्याचे संशोधन करणे गरजेचे आहे, तरच उत्पन्नामध्ये वाढ होण्यास मदत होईल.

डॉ. ध्यानचंद यांच्या मते स्थानिक वित्ताच्या समस्या खऱ्या अर्थाने केवळ वित्ताच्या समस्या नाहीत तर राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या समस्या बनून राहिल्या आहेत. त्यामुळे अशा समस्या सोडवण्यासाठी त्यामध्ये विकासात्मक दृष्टिकोन राबवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास घडवून आणावयाचा असेल तर स्थानिक सेवा आणि साधने यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करणे गरजेचे आहे. आणि प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने वित्तीय कुशलतेचा उच्च स्थर राखणे गरजेचे आहे. तसेच केंद्र व राज्य सरकार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत केल्यास त्यांच्या अनेक समस्या सुटण्यास मदत होईल त्यांच्या कार्याचा दर्जामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात सुधारणा होऊ शकतात, शिक्षण, आरोग्य, रस्ते बांधणी, घरे इत्यादीसाठी केंद्र व राज्य सरकारांनी भरघोस मदत केली तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी महत्त्वाचे वरदान ठरेल व नागरिकांच्या गरजा आणि विकासाच्या आवश्यकता या दोन्ही बाबी लक्षात घेता केंद्र व राज्य सरकारांनी स्थानिक स्वराज्य संस्थानाभरघोस आर्थिक मदत करणे अत्यंत गरजेचे आहे.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील कार्यक्षेत्रातील महत्त्वाच्या कार्यापैकी पाणी पुरवठा,

सार्वजनिक पायाभूत सुविधा, यासारख्या अनेक सुविधांसाठी मदत प्रादेशिक संस्थांमार्फत केल्यास त्यांची कार्यक्षमता वाढू शकते. तसेच काही तांत्रिक स्वरुपाची मदत लागल्यास राज्य सरकारतर्फे मिळवणे सहज शक्य होईल. सरकारचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्यास स्थानिक संस्थांची अनेक कामे मार्गी लागण्यास सहज रीतीने मदत होईल. थोडक्यात राज्य किंवा केंद्र सरकारची मदतीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

३.२.७ आर्थिक संकट आणि आर्थिक सुधारणा (Fiscal Crisis and Fiscal Reform)

आर्थिक सुधारणा ही अखंड प्रक्रिया आहे. आर्थिक प्रक्रिया सुलभतेने पार पडाव्यात, आंतरराष्ट्रीय पातळीवरचे देवाणघेवाण व्यवहार, मालमत्ता हस्तांतराचे व्यवहार सुलभ व्हावेत, या दृष्टीने संस्थात्मक, धोरणात्मक अशा स्वरूपाचे करण्यात आलेले बदल म्हणजे आर्थिक सुधारणा होय.१९९१ चे आर्थिक संकट हे काही देशावरील पहिले-वहिले आर्थिक संकट नव्हते. उदा. १९६० च्या दशकातील १९६२ मध्ये भारत-चीन युद्ध, १९६५ भारत-पाकिस्तान युद्ध, १९६६-६७ च्या दुष्काळामुळे ओढवलेलं संकट, १९७२ आणि १९७४ मधल्या अपुऱ्या पावसामुळे आलेले संकट १९७३ च्या तेल संकटामुळे ओढवलेलं आर्थिक संकट इ. संकटांचा सामना देशाने केला होता. मात्र १९९१ चे आर्थिक संकट फार वेगळे होते. ते अचानक उद्‌भवलेले नव्हते. १९९० च्या आखाती युद्धामुळे तसेच या काळातील राजकीय अस्थैर्यामुळे आणि १९८० च्या दशकातील आर्थिक गैरव्यवस्थापनामुळे या सर्व घटकांचा परिपाक म्हणजे १९९१ चे आर्थिक संकट होते. १९९१ चे आर्थिक संकट पुढील तीन मुख्य बाबीशीं संबंधित होते. राजकोषीय संकट, अनियंत्रित व्यवहारतोलाचा प्रश्न आणि चलनवाढीचा उच्च दर.

१. राजकोषीय संकट :-

केंद्र शासनाची राजकोषीय तूट १९८०-८१ मधील जीडीपीच्या ६.३ % वरून १९८९-९० मध्ये ८.२ % पर्यंत वाढली. ही तूट भरून काढण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणात अंतर्गत व परकीय कर्ज घ्यावे लागले व या कर्जावरील व्याजही मोठय़ा प्रमाणावर वाढत गेले.

२. अनियंत्रित व्यवहारतोलाचा प्रश्न :-

१९८० च्या दशकात आयात मोठ्या प्रमाणात वाढली, मात्र निर्यात तेवढ्या प्रमाणावर वाढू शकली नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय देयता वाढली, याचा परिणाम म्हणजे १९८० च्या दशकात चालू खात्यावरील तूट वाढत गेली. ही तूट भरून काढण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर परकीय कर्ज घ्यावे लागले व आपल्याकडे असलेला परकीय चलन साठा कमी झाला.

३. चलनवाढीचा उच्च दर :-

वाढत्या तुटीचे चलनीकरण व त्यामुळे चलनपुरवठयातील अतिरिक्त वाढ यामुळे चलनवाढ घडून आली होती. या सर्व कारणांबरोबरच भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक दीर्घकालीन संरचनात्मक दोष निर्माण झालेले होते. ज्यामुळे अर्थव्यवस्थेत अपेक्षित वाढ होत नव्हती.

❑ **राजकोषीय सुधारणा** (Fiscal Reforams)

भारत सरकारने १९९१ च्या आर्थिक सुधारणा धोरणाअंतर्गत आर्थिक उदारीकरणाच्या नीतीचा अवलंब केला, ज्याद्वारे भारतीय अर्थव्यवस्था खुली करण्यात आली. भारताने आर्थिक संकटापासून स्वत:ला वाचविण्यासाठी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घेतले आणि अल्पकाळासाठी स्थैर्य कार्यक्रम (Stabilisation Programme) तसेच संरचनात्मक समायोजन कार्यक्रम (Structural adjustment Programme) भारत सरकारने १९९१ मध्ये सुरू केले आणि यावर आधारित भारतात नवीन आर्थिक सुधारणा राबविण्यास प्रारंभ झाला, ज्या उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाच्या अनुषंगाने जाणाऱ्या होत्या. नवीन आर्थिक धोरणाद्वारे विविध रचनात्मक बदल भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सुरू करण्यात आले.

१. सरकारची राजकोषीय तूट कमी करणे.

२. चलनवाढीवर नियंत्रण ठेवणे.

३. नवीन औद्योगिक धोरणाद्वारे परवाना पद्धती रद्द करणे.

४. सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी कमी करून खासगीकरण व निर्गुंतवणूक धोरण.

५. देशामध्ये परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञान यांना चालना देणे.

६. अधिक वेगाने देशाचा विकास साध्य करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाची सोय उपलब्ध करणे.

७. भारतीय बाजारपेठ परकीय व्यापारास खुली करणे.

८. पायाभूत संरचना क्षेत्रातही खासगी गुंतवणुकीला मान्यता देणे.

९. महसूल वाढीला प्रेरणा देणे.

१०. राजकोषीय जबाबदारी व अंदाजपत्रक व्यवस्थापन विधेयक २०००.

थोडक्यात, या नवीन आर्थिक सुधारणा भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या होत्या आणि या सुधारणांना आत्ता जवळपास २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या सुधारणांचे सकारात्मक

आणि नकारात्मक परिणाम दिसून येतात. सद्य:स्थितीमध्ये भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, पण याच्या जोडीला अजूनही भारताला मानवी विकास निर्देशांकामध्ये म्हणावी अशी प्रगती साधता आलेली नाही. थोडक्यात, अजूनही भारतात गरिबी, बेरोजगारी, आर्थिक विषमता यांसारख्या समस्या भेडसावत आहेत.

३.२.८ राजकोषीय दायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा, २००३ (FRBM Act) :-

भारतीय अर्थव्यवस्थेला १९८० व १९९० दशकाच्या सुरवातीला मोठ्या वित्तीय तुटीचा सामना करावा लागला होता त्यामध्ये प्रामुख्याने राजकोषीय तूट आणि वित्तीय तूट यांचा समावेश होतो आणि त्याचा परिणाम सर्वत्र अर्थव्यवस्थेवर दिसून येऊ लागला. अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये या वित्तीय तुटीचा परिणाम दिसून येऊ लागला आणि अर्थव्यवस्थेमध्ये सर्वत्र निराशाजनक वातावरण तयार होण्यास सुरुवात झाली होती. याच कालावधीमध्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाची (RBI) आर्थिक स्थिती अतिशय बिकट होत चालली होती. याच पार्श्वभूमीवर १९९१ यावर्षी आर्थिक सुधारणांची सुरुवात झाल्याचे आपणास दिसून येते आणि याच कालावधीमध्ये खुले व्यापारी धोरण हे आर्थिक सुधारणांचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणून उदयास आले. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण धोरणांचा स्विकार करून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक आरोग्य संघटना यांना सुचवण्यात आले की, आमच्या अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी योग्य त्या उपाययोजना सुचवाव्यात. नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीस चांगली सुरुवात झाल्यानंतर १९९७-९८ नंतर वित्तीय तूट कमी झाल्याचे दिसून आले. मात्र परत १९९७-९८ नंतर वित्तीय तूट वाढू लागली. अर्थव्यवस्थेची ही बिघडणारी वित्तीय परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सरकारने एफआरबीएम (FRBM) हा कायदा २००३ ला भारतीय अर्थव्यवस्थेत आणला.

तत्कालीन अर्थमंत्री श्री. यशवंत सिन्हा यांनी डिसेंबर २००० मध्ये हा वित्तीय जबाबदारी व अंदाजपत्रक व्यवस्थापन विधेयक (एफआरबीएम विधेयक) भारतात सादर केले. सर्वप्रथम, या विधेयकात भारतातील सरकारच्या वित्तीय परिस्थितीची भीषण स्थिती अधोरेखित करण्यात आली.

- ☞ हा कायदा २६ ऑगस्ट २००३ रोजी पास करण्यात आला आणि तो ३ जुलै २००४ ला लागू करण्यात आला. या कायदा पास करण्यापाठीमागे प्रमुख कारण किंवा संकल्पना अशी होती की राजकोषीय तुटीमुळे दिर्घ काळात आर्थिक वाढ मोठ्या प्रमाणात घडून येईल. या कायद्याची रचना डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली होती. या कायद्यातील राजकोषीय तूट आणि महसुली तूट यातील लक्ष गाठण्यासाठी

पुढील परिस्थितीत सूट देण्यात आली होती. राष्ट्रीय सर्वेक्षण, नैसर्गिक संकट, आर्थिक संकट.

❑ कायद्याची मुख्य उद्दीष्टे :–

- ☞ देशात पारदर्शक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली सुरू करणे.
- ☞ वर्षानुवर्षे देशाच्या कर्जाचे, अधिक न्याय्य आणि व्यवस्थापकीय वितरण सादर करणे.
- ☞ दीर्घ काळासाठी वित्तीय स्थिरतेचे उद्दिष्ट ठेवणे.
- ☞ याव्यतिरिक्त, या अधिनियमातून भारतीय महागाई व्यवस्थापित करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला (आरबीआय) आवश्यक लवचिकता मिळेल अशी अपेक्षा होती.

❑ वित्तीय जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्याचे प्रमुख घटक :–

१. **राजकोषीय तुटीचे :** GDP शी असलेले प्रमाण कमी करणे. २००३–०४ यावर्षी ४.८% होते ते ०.३% पर्यंत कमी करणे. २००३–०४ यावर्षी ठरवण्यात आले होते कि २००८–०९ पर्यंत २.८% पर्यंत कमी करणे.

२. **महसुली तूट :** महसुली तुटीचे प्रमाण ०.५% नी कमी करायचे आणि २००८–०९ पर्यंत +०.२% पर्यंत आणणे.

३. कर आणि GDP शी असलेले प्रमाण कमी करणे, ते प्रमाण ९.२% होते ते २००८–०९ पर्यंत १३.२% पर्यंत करणे.

४. अर्थसंकल्पातील खर्च आणि GDP शी असलेले प्रमाण १५.४% होते ते १४.३% पर्यंत, २००८–०९ पर्यंत कमी करणे.

अर्थव्यवस्थेतील राजकोषीय तूट व महसुली तूट कमी करण्यासाठी व सरकारवर कायद्याने बंधन आणण्यासाठी FRBM हा कायदा २००३ मध्ये संमत करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी ५ जुलै, २००४ रोजी करण्यात आली. हा कायदा करत असताना केंद्र सरकारवर अनेक प्रकारची बंधने आणण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने –

१. मार्च २००९ पर्यंत महसुली तूट शून्यावर आणणे.

२. मार्च २००९ पर्यंत राजकोषी तूट तीन टक्क्यांपर्यंत कमी करणे.

वरील बाबी साध्य करण्यासाठी आवश्यक असलेली वार्षिक लक्ष्ये ठेवण्यासाठी सरकारने विजय केळकर यांच्या नावाने एक कार्यकारी गटाची नियुक्ती केली. त्यांनी जुलै २००४ मध्ये आपला

अहवाल सादर केला. त्यानुसार FRBM कायदा २००४, ५ जुलै, २००४ पासून लागू करण्यात आला. या कायद्यानुसार पुढील आर्थिक लक्ष्ये निश्चित करण्यात आली.

१. २००४-०५ पासून प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी महसुली तूट जीडीपीच्या ०.५ टक्के किंवा अधिक टक्क्याने कमी व्हावी.

२. २००४-०५ पासून प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी राजकोषीय तूट जीडीपी च्या ०.३ टक्के किंवा अधिक टक्क्याने कमी व्हावी.

❑ २००८-०९ मध्ये लक्ष्य साध्य करण्यासाठी सुचवलेल्या शिफारशी :-

या कायद्याचे लक्ष गाठण्यासाठी शासनाला पुढील शिफारशी करण्यात आल्या. अर्थसंकल्प तसेच अनुदानाच्या मागणी सोबत शासन खालील तीन प्रकारची विवरणपत्रे संसदेत मांडेल.

१. राजकोषीय धोरणाचे विवरण पत्र (FPSS : Fiscal Policy Strategy Statement).

२. मध्यवर्ती धोरणाचे विवरण पत्र (MTFPS : Medium Term Fiscal Policy Statement).

३. ब्रहतलक्ष्यीय रचनाचे विवरण पत्र (MFS : Micro Economics Frame work Statement).

४. अर्थसंकल्पास अंदाजित असलेल्या जमा व खर्चाचे त्रैमासिक (Quarterly) परीक्षण करून संसदेत मांडले जाईल.

५. भारत सरकार RBI कडून WMAS (Wages and means Advances) शिवाय कोणतेही कर्ज घेणार नाही.

या कायद्याच्या आधारे केंद्र सरकारने महसुली तसेच राजकोषीय तूट मोठ्या प्रमाणात आटोक्यात आणल्या होत्या. बऱ्याच राज्य सरकारानी तर आपले लक्ष्य जवळजवळ पूर्ण केले होते. मात्र अर्थव्यवस्थेमध्ये २००८ पासून सुरू झालेली मंदी घालवण्यासाठी, केंद्र सरकारने दोन मोठ्या योजनांची घोषणा केली. त्यामुळे सरकारी खर्च वाढून, महसुली व राजकोषीय तूट पुन्हा वाढत आहे. २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात वित्तमंत्र्यांनी ह्या कायद्यात सुधारणा करण्याचे घोषित केले.

३.३ सारांश

आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी अर्थव्यवस्थेमधील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे अपेक्षित असते त्यामध्ये शेती, उद्योग, व्यापार, सेवा इत्यादी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून अर्थव्यवस्थेला नियोजनबद्ध विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, कर्ज उभारणी,कर आकारणी, पुरेशा

भांडवलाची उभारणी करणे अशक्य असते. म्हणूनच शासनाला तुटीचा अर्थभरणा हा मार्ग अवलंबावा लागतो.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील कार्यक्षेत्रात असणाऱ्या महत्त्वाच्या कार्यापैकी पाणी पुरवठा, सार्वजनिक पायाभूत सुविधा, यासारख्या अनेक सुविधांसाठी प्रादेशिक संस्थांमार्फत केल्यास त्यांची कार्यक्षमता वाढू शकते. तसेच काही तांत्रिक स्वरुपाची मदत लागल्यास राज्य सरकारतर्फे मिळवणे सहज शक्य होते. सरकारने वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्यास स्थानिक संस्थांची अनेक कामे मार्गी लागण्यास सहज रीतीने मदत होईल. त्यामध्ये राज्य किंवा केंद्र सरकारची मदतीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. महसुली तूट =

(अ) महसूली उत्पन्न - महसुली खर्च (क) एकूण खर्च - महसूली उत्पन्न

(ब) एकूण उत्पन्न - एकूण खर्च (ड) महसूली उत्पन्न + कर्ज वसुली.

२. अर्थसंकल्पीय तूट =

(अ) एकूण खर्च - महसूली उत्पन्न (क) एकूण उत्पन्न - एकूण खर्च

(ब) एकूण उत्पन्न - एकूण खर्च (ड) महसूली उत्पन्न+ कर्ज वसुली

३. राजकोषीय/वित्तीय तूट =

(अ) महसूली उत्पन्न + कर्ज वसुली (ब) एकूण खर्च - महसूली उत्पन्न

(क) एकूण खर्च - महसूली उत्पन्न + कर्ज वसुली व + इतर भांडवली मिळकत

(ड) एकूण उत्पन्न - एकूण खर्च.

४. प्राथमिक तूट =

(अ) राजकोषीय तूट - घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा खर्च

(ब) एकूण खर्च - महसूली उत्पन्न (क) एकूण उत्पन्न- एकूण खर्च

(ड) महसूली उत्पन्न + कर्ज वसुली.

५. भारताने नवीन आर्थिक धोरण .... यावर्षी स्वीकारले.

(अ) १९९० *(ब) १९९१* *(क) १९९५* *(ड) २००१.*

६. FRBM कायदा .... यावर्षी स्वीकारला.

(अ) १९९० *(ब) १९९१* *(क) १९९५* *(ड) २००४.*

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *(अ) महसूली उत्पन्न - महसुली खर्च.*

२. *(ब) एकूण उत्पन्न - एकूण खर्च.*

३. *(क) एकूण खर्च - महसूली उत्पन्न + कर्ज वसुली व + इतर भांडवली मिळकत.*

४. *(अ) राजकोषीय तूट - घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा खर्च.*

५. *(ब) १९९१.*

६. *(ड) २००४.*

३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. तुटीचा अर्थभरणा म्हणजे काय? सांगून तुटीच्या अर्थभरण्याच्या विविध संकल्पना स्पष्ट करा.

२. वित्तीय तूट कमी करण्यासाठी कोण-कोणत्या उपाययोजनांचा अवलंब केला जातो.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाच्या प्रमुख चार साधनाचे स्पष्टीकरण करा.

४. स्थानिक वित्तव्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना स्पष्ट करा.

५. अर्थव्यवस्थेमधील आर्थिक संकट आणि आर्थिक सुधारणा यावर चर्चा करा.

६. FRBM-२००३ कायदा यावर आपले मत स्पष्ट करा.

३.७ संदर्भ सूची

१. Indian Public Finance Statistics Report, 2016-2017, Ministry of Finance Department of Economic Affairs, Economic Division, Government of India.

२. **देव सु. पा., झांबरे ग. ना.** : 'राजस्व', प्रकाशक-मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे आणि कंपनी, प्रकाशक ८५, कॉनोल रोड, रामदास पेठ, नागपूर-४४० ०१०.

३. **ओझरकर सु. रा.**: 'राजस्व' प्रकाशक-श्री. प्रोमोद मुंजे, विद्या प्रकाशन, रुइकर रोड, महाल, नागपूर-४४० ००२.

४. लोकसत्ता, Fecruary 6, 2015 01:45 am.

५. लोकसत्ता, Decemcer 7, 2017 1:00 am.

६. **कौस्तुभ जोशी**, लोकसत्ता, January 14, 2019.

७. **डॉ. संतोष दास्ताने** : 'सरकारी कर्ज', स्त्रोत-मराठी विश्वकोश.

८. **रंजन कोलंबी**, भारतीय अर्थव्यवस्था.

९. **गजानन दत्तात्रय सरकटे** : '१९९१ च्या आर्थिक सुधारणा', 22/11/2018. www.majhasakha.in

१०. **डॉ. जी. आर. पाटील** : 'आर्थिक सुधारणा', https://www.loksatta.com.

❑❑❑

सत्र-३ : घटक-४

संघराज्य वित्त

(Federal Finance)

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ घटनात्मक तरतुदी-संघराज्य शासन व्यवस्थेतील वित्त आयोगाची भूमिका, गाडगीळ सूत्र

४.२.२ दहा, अकरा, बारा आणि तेराव्या वित्त आयोगांचे अहवाल

४.२.३ चौदावा वित्त आयोग-संदर्भीय अटी, दृष्टिकोण व शिफारशी

४.२.४ वित्तीय असमतोलाची समस्या, उर्ध्व व समपातळी असमतोल

४.३ सारांश

४.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ सूची

४.० उद्दिष्टे

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासामधून आपणास पुढील बाबींचे आकलन होण्यास मदत होईल.

१. संघराज्य वित्त व्यवस्थेतील घटनात्मक तरतुदी समजतील.

२. वित्त आयोगाची भूमिका समजण्यास मदत होईल.

३. दहा, अकरा, बारा आणि तेराव्या वित्त आयोगांचे अहवाल माहित होतील.

४. चौदाव्या वित्त आयोगाची सविस्तर कल्पना येईल.

५. वित्तीय असमतोलाचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

४.१ प्रास्ताविक

भारतात संघराज्य शासन व्यवस्था प्रचलित आहे. १९३५ च्या कायद्यानुसार भारतात संघराज्य शासन व्यवस्था आस्तित्वात आलेली आहे. भारतीय संघराज्य व्यवस्था त्रिस्तरीय स्वरूपाची आहे. केंद्रस्थानी केंद्र सरकार राज्यपातळीवर राज्य सरकारे तर स्थानिक पातळीवर विविध प्रकारची स्थानिक सरकारे (स्थानिक स्वराज्य संस्था) मिळून देशाचा राज्यकारभार चालवित असल्याचे दिसते.

भारतात संघराज्याला घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे. भारतीय राज्यघटनेनुसार संघराज्यातील प्रत्येक सरकारला स्वतंत्र अधिकार प्राप्त झालेले आहेत. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र सरकार राज्य सरकारे आणि स्थानिक सरकारे यांचे वित्तीय अधिकार आणि जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या आहेत, असे असले तरी भारतीय संघराज्य व्यवस्थेत वित्तीय अधिकारांच्या बाबतीत केंद्र सरकारचे वर्चस्व दिसून येते. यासाठी वित्तीय साधनसामग्रीचे हस्तांतरण योग्य प्रकारे करण्यासाठी भारतात दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. वित्त आयोगाने सुचविलेल्या शिफारशींनुसार केंद्र व घटकराज्यांमध्ये वित्तीय साधनांचे योग्य वाटप करून केंद्र व राज्य सरकारांच्या वित्त व्यवस्थेतील असमतोल दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

४.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटकामधून आपण संघराज्य वित्ताचा अभ्यास करणार आहोत. त्यामध्ये मुख्यत: संघराज्य वित्त व्यवस्थेसंबंधी घटनात्मक तरतुदी, वित्त आयोगाची भूमिका, विविध वित्त आयोगांचे अहवाल व वित्तीय असमतोलाची समस्या व स्वरूप इ. घटक अभ्यासणार आहोत.

४.२.१ घटनात्मक तरतुदी (Constitutional Provisions)

भारतात संघराज्य शासन व्यवस्था खऱ्या अर्थाने १९३५ च्या कायद्यानुसार आस्तित्वात आली आहे. अशा संघीय शासन पध्दतीमध्ये केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशी त्रिस्तरीय रचना भारतात आस्तित्वात आहे. अशा सर्व स्तरावरील सरकारांना आपआपल्या जबाबदाऱ्या, अधिकार आणि उत्पन्न साधने इ. बाबतची कार्ये पाडण्यासाठी भारतीय राज्यघटनेत महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

भारतात २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना आस्तित्वात झाली. अशा राज्यघटनेनुसार भारत हे एक 'संघराज्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यामुळेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वीकारलेल्या संघराज्य शासन व्यवस्थेमध्ये सरकारांच्या जबाबदाऱ्या व वित्तीय साधनसामग्रीचे वाटप याबाबतीत राज्यघटनेने महत्त्वपूर्ण तरतुदी केलेल्या आहेत त्यांचा थोडक्यात परामर्श या ठिकाणी आपण घेणार आहोत.

अ) केंद्र व राज्य सरकारची कार्य विभागणी (Division of Functions)

भारतीय राज्यघटनेच्या ७व्या परिशिष्टामध्ये तीन प्रकारच्या तरतुदी नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये केंद्र सरकार आणि घटकराज्ये यांच्या कार्याबद्दल तसेच वित्तीय अधिकारांबाबत विभागणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पहिल्या सूचीस केंद्र यादी (Union List) म्हणून ओळखली जाते. त्यामध्ये केंद्र सरकारने पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या तसेच केंद्राचे वित्तीय अधिकार दिले आहेत. या केंद्र यादीत एकूण ९७ विषय समाविष्ट आहेत. दुसऱ्या सूचीला राज्य (State List) म्हणून ओळखले जाते. अशा राज्य सूचीमध्ये राज्य सरकारांची कामे व त्यांचे वित्तीय अधिकार यांची यादी निर्दिष्ठ केली आहेत. या राज्य सूचीमध्ये एकूण ६६ विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. तिसरी सूची संयुक्त किंवा समवर्ती यादी (Concurrent List) या नावाने ओळखली जाते. या समवर्ती यादीमध्ये केंद्र व राज्य सरकारे या दोघांच्याही संयुक्त जबाबदाऱ्या व अधिकारांचा समावेश करण्यात आला असून समवर्ती सूचीत एकूण ४७ विषय समाविष्ट करण्यात आले आहेत.

उपरोक्त स्पष्ट करण्यात आलेल्या तिन्ही प्रकारच्या सूची व त्यामध्ये समाविष्ट कार्ये पुढीलप्रमाणे.:-

(अ) केंद्र सूची (Central List)

१) संरक्षण.

२) अणुऊर्जा निर्मिती.

३) रेल्वे वाहतूक विकास.

४) जहाज बांधणी, जलवाहतुकीचा विकास, सागरी वाहतूक व बंदर विकास.

५) राष्ट्रीय महामार्ग विकास.

६) हवाई वाहतूक.

७) पोस्टल सेवा आणि टेलिग्राफिक, टेलिफोन दूरसंचार सेवांचा विकास.

८) आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय व्यापार, विनिमय नियंत्रण.

९) विमा व्यवसाय, बँकींग व्यवसाय.

१०) शेअर बाजार व वायदे बाजार.

११) मूलभूत व अवजड उद्योगांचा विकास, उद्योगांचे नियंत्रण व संरक्षण.

१२) खनिज तेल उद्योग विकास व नियंत्रण.

१३) चलन व्यवस्था, नाणी व नोटा छपाई व नियंत्रण इ.

वरील सर्व कार्ये केंद्र सरकारच्या अखत्यारित येतात.

(ब) राज्य सूची (State List)

१) पोलीस यंत्रणा.

२) न्याय व्यवस्था.

३) स्थानिक स्वराज्य संस्था.

४) सार्वजनिक आरोग्य सुविधा.

५) शिक्षण.

६) रस्ते, पूल निर्मिती.

७) शेती विकास, सिंचन योजना.

८) पशुधन.

९) पाणीपुरवठा.

१०) वीज निर्मिती.

११) केंद्राच्या यादीत नसणाऱ्या उद्योगांचे संरक्षण.

वरील विविध प्रकारची कार्ये राज्यसरकारांच्या अखत्यारित येतात.

(क) समवर्ती सूची (Unian List)

समवर्ती सूचीमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारे या दोहोंच्या अखत्यारित येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा व अधिकारांचा समावेश होतो. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) आर्थिक व सामाजिक नियोजन.

२) कामगार संघटना.

३) कामगार कल्याण.

४) औद्योगिक कलह.

५) सामाजिक सुरक्षा.

६) किंमत नियंत्रण.

७) व्यावसायिक तसेच तांत्रिक मार्गदर्शन इत्यादी.

वरील बाबींचा समावेश जरी समवर्ती यादीमध्ये केला जात असला तरीसुद्धा एकूण राष्ट्रीय हित व कार्यक्षमता या बाबींबा विचार करून केंद्र सरकारला अंतिमत: निर्णय घेण्याबाबत अधिकचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

ब) केंद्र व राज्यांमध्ये वित्तीय साधनसामग्रीचे विभाजन (Distribution of Resources between Union & State)

भारताच्या १९३५ च्या कायद्यानुसार संघराज्य व्यवस्थेत केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यात वित्तीय साधनसामग्रीचे विभाजन करण्यात आलेले आहे. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वानुसार संघराज्यातील करविषयक बाबींची विभागणी केंद्र सरकार आणि घटक राज्यांमध्ये करण्यासाठी पुढील तरतुदींचा अवलंब करण्यात आलेला आहे.

(i) जे कर केंद्र सरकारकडून आकारले जातात व त्यांची वसुली आणि विनियोग केंद्र सरकारच करते असे कर उदा. निगम कर, जकात कर इत्यादी.

(ii) जे कर केंद्र सरकार आकारते आणि त्यांची वसुली केंद्र सरकारच करते, मात्र त्यामधून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातील काही हिस्सा राज्य सरकारांना द्यावा लागतो असे कर उदा. उत्पन्न कर, केंद्रीय उत्पादन शुल्क इत्यादी.

(iii) जे कर केंद्र सरकारकडून आकारले आणि वसूलही केले जातात आणि त्यामधून मिळणारे सर्व उत्पन्न राज्य सरकारांना देण्यात येते असे कर. यामध्ये प्रामुख्याने वारसा कर, रेल्वे वाहतूक कर, शेतजमीन कर, मालमत्ता कर इ.चा समावेश होतो.

(iv) जे कर केंद्र सरकारकडून आकारले जातात, मात्र त्यांची वसुली व विनियोग करण्याचा अधिकार राज्य सरकारांना दिला जातो, असे कर उदा. स्टँप ड्युटी, औषधांवरील कर, सौंदर्य प्रसाधने कर इत्यादीचा समावेश यामध्ये होतो.

(क) केंद्र सरकारची उत्पन्न साधने (Central Sources of Revenue)

राज्य घटनेतील परिशिष्ठ ७ मधील केंद्र सुचीनुसार केंद्र सरकारला पुढील उत्पन्न साधने मिळविण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

१) उत्पन्न कर (कृषी उत्पन्न वगळून).

२) महामंडळ कर (निगम कर).

३) जकात कर (आयात-निर्यातीवरील कर).

४) उत्पादन शूल्क (मादक पेये, औषधे वगळून).

५) वारसा व मालमत्ता कर (शेतजमिन वगळून).

६) रेल्वे वाहतूक प्रवाशी व भाडे कर.

७) पोस्ट व तार सेवांवरील कर (टपाल सेवा).

८) दूरध्वनी व प्रसारण सेवा इत्यादी कर.

९) शेअरबाजार व वायदे बाजारातील व्यवहार तिकिटे कर.

१०) चेक्स, हुंडी, विमा पॉलिसी, शेअर हस्तांतरण इ.साठी वापरण्यात येणारी तिकिटे इ.साठी वापरण्यात येणारी तिकिटे इत्यादी कर.

(ड) राज्य सरकारची उत्पन्न साधने (State Sources of Revenue)

भारतीय राज्यघटनेनुसार काही कर आकारण्याचे स्वातंत्र्य राज्य सरकारांना देण्यात आलेले आहे. असे कर पुढीलप्रमाणे :-

१) जमिन महसूल.

२) शेती उत्पन्न कर.

३) मादक पेये अफू व इतर मादक औषधांवरील उत्पादन कर.

४) शेत जमिनीवरील वारसा कर.

५) मनोरंजन, जुगार इत्यादीवरील कर.

६) वीज उपभोग व विक्रीवरील कर.

७) रस्ते व जलमार्ग याद्वारे केल्या जाणाऱ्या वाहतुकीवरील कर.

८) मोटार गाडीवरील कर.

९) स्थानिक जकात.

१०) दरडोई कर इ.

११) प्राणी व बोटींवरील कर.

१२) पथ कर इत्यादी.

वरील प्रकारे भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्यातील केंद्र व राज्य सरकारांनी पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या व त्यासाठी लागणारा निधी उभा करण्यासाठी लागणारी वित्तीय साधने यांचे विभाजन केलेले आहे. याबरोबरच भारतीय घटनेच्या कलम २७५ नुसार केंद्र सरकार राज्य सरकारांना महसुली

गरज किंवा तूट स्वरूपाची अनुदाने देऊ शकते. तसेच कलम २८२ प्रमाणे केंद्र सरकार घटक राज्यांना मोठ्या प्रमाणात नियोजनासाठी वित्तीय मदत देऊ शकते.

भारतातील वित्तीय साधनसामग्रीचे केंद्र व राज्य सरकारांमध्ये होणारे हस्तांतरण अधिक शास्त्रीय स्वरूपाचे व्हावे यासाठी भारतीय राज्यघटनेत कलम २८० नुसार दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना दिलेला आहे.

❑ संघराज्य शासन व्यवस्थेतील वित्त आयोगाची भूमिका :-

संघराज्य वित्त व्यवस्थेत समतोल व सूत्रता निर्माण व्हावी, त्याबरोबरच केंद्र सरकार आणि घटकराज्ये यांच्यामध्ये साधनसामग्रीच्या वितरणाबाबत निर्माण होणारे वाद विवाद मिटावेत म्हणून भारताच्या राज्यघटनेतील कलम २८० नुसार भारतात वित्त आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. वित्त आयोगाला पुढील महत्त्वाची कार्ये पार पाडावी लागतात.

अ) केंद्र सरकार आणि घटकराज्ये यांच्या कक्षेत येणारे कर कोणते याविषयीचे विवरण वित्त आयोगाला करावे लागते.

ब) केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यामध्ये करांपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न कोणत्या प्रकारे वाटले पाहिजे याविषयी आधारभूत निकष वित्त आयोगाला ठरवावे लागतात.

क) घटक राज्यांना विकास कार्यक्रमांवरील खर्चासाठी आवश्यक असणारी कर्जे, अनुदाने, मदत इत्यादी कोणत्या तत्वांवर आधारित असावी याविषयी सल्ला व मार्गदर्शन करणे.

ड) वित्तीय साधनांचा उपयोग देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी कसा होईल, याविषयी मार्गदर्शन करण्याचे कार्य वित्त आयोगाला करावे लागते.

इ) केंद्र सरकार व घटक राज्ये यांच्या वित्तीय स्थितीत संतुलन राखणे, प्रादेशिक समतोल साधणे, तसेच संघराज्याची वित्त व्यवस्था कार्यक्षम व बळकट करणे यासारखी कार्ये वित्त आयोगाला पार पाडावी लागतात.

(इ) केंद्र सरकार व घटक राज्ये यांच्यात सहकारी तत्त्वावर आधारीत संघराज्याची (Co-operative Federation) कल्पना सादर करणे.

वित्त आयोगाची वरील विविध कार्ये विचारात घेतल्यास संघराज्य वित्त व्यवस्थेतील वित्त आयोगाची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात येते. वित्त आयोगाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेतून केंद्र व राज्य यांच्या वित्तीय हस्तांतरणाला एक प्रकारची लवचिकता प्राप्त झालेली आहे. भारतात संघराज्य शासन व्यवस्थेमध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत दर पाच वर्षांसाठी एक वित्त आयोग याप्रमाणे एकूण चौदा वित्त आयोग स्थापन करण्यात आलेले आहेत. या सर्व वित्त आयोगांनी केंद्र व राज्य

सरकारांमधील वित्तीय हस्तांतरणाबाबत महत्वपूर्ण अशा शिफारशी केलेल्या आहेत. जवळपास सर्वच वित्त आयोगांनी वित्तीय हस्तांतरणामध्ये खालील बाबींना महत्त्व दिलेले आहे.

(अ) कर महसूलातील राज्यांचा वाटा निश्चित करणे.

(ब) राज्यांना सहाय्यक अनुदानांचे निर्धारण करणे.

(क) राज्यांना कर्जविषयक शिफारशी करणे.

वित्त आयोगाने वरील विविध मार्गाने वित्तीय हस्तांतरण करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे, तसेच निकष ठरविले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने घटकराज्यांची लोकसंख्या, क्षेत्रफळ, राज्यांचे कर गोळा करण्याचे प्रयत्न, राज्यांचे दरडोई उत्पन्न, राज्यांची वित्तीय शिस्त यासारखे निकष ठरवून केंद्र व राज्ये यांच्या वित्तीय हस्तांतरणाला अधिक लवचिकता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच केंद्र व राज्ये यांच्या वित्तीय स्थितीत निर्माण होणारे उर्ध्व आणि समस्तर असमतोल कमी करण्यामध्ये वित्त आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.

❑ गाडगीळ सूत्र (Gadgil Formula)

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनाचा अंगीकार करण्यात आला. नियोजनाच्या माध्यमातून देशात पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. सन १९५१ मध्ये देशात पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. पंचवार्षिक योजना राबवित असताना केंद्र सरकार राज्य सरकारांना योजनेच्या कार्यवाहीसाठी साधारण केंद्रीय सहाय्य (Normal Central Assistance) देत असे. अशा प्रकारचे सहाय्य राज्या-राज्यांमध्ये कसे वाटले जावे यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनाकाळात नियोजन आयोगाकडून विशिष्ठ निकष ठरविले जात असत. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजना काळात (१९५१ ते १९५६) विविध राज्यांमध्ये केंद्र सरकारकडून देण्यात आलेल्या साधारण अर्थसहाय्याचे असमान वितरण झालेले आहे. अशी टिका काही तज्ञांनी केली होती. यावर उपाय शोधण्याचे श्रेय धनंजयराव गाडगीळ यांना जाते. चौथ्या पंचवार्षिक योजना काळात (१९७० ते ७५) भारतीय नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची नियुक्तीकरण्यात आली. त्यावेळी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी केंद्राकडून राज्यांना देण्यात येणारे सहाय्य राज्या-राज्यांमध्ये वाटप करण्यासंदर्भात एक सूत्र शोधून काढले. या सूत्राला 'गाडगीळ सूत्र' (Gadgil Formula) असे म्हटले गेले. त्यावेळच्या राष्ट्रीय विकास परिषदनेही या सूत्राला मान्यता दिली. या गाडगीळ सूत्राचा अवलंब भारताच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून आठव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत करण्यात आला.

गाडगीळ सूत्रानुसार केंद्र सरकारकडून राज्य सरकारांना योजनेच्या अंमलबजावणीसाठी जे साधारण सहाय्य देण्यात येते त्याचा राज्या-राज्यांमधील वाटा ठरविताना राज्यांचे वर्गीकरण दोन

प्रकारात करण्यात आले होते. त्यानुसार विशेष दर्जा राज्ये (Special Categary States) आणि अविशेष दर्जा राज्ये (Non-Special Categary States) असे वर्गीकरण करण्यात आले. त्यानुसार केंद्र सरकारकडून देण्यात येणाऱ्या साधारण सहाय्यापैकी ३०% वाटा विशेष दर्जा असणाऱ्या राज्यांना तर उर्वरित ७०% वाटा हा अविशेष दर्जा असणाऱ्या राज्यांना देण्यात आला.

वरील प्रमाणे राज्यांना वाटा देण्यासाठी भारताच्या चौथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजना काळात धनंजयराव गाडगीळ यांनी आपल्या सूत्रानुसार विशिष्ट निकष ठरवून दिले. त्या निकषांच्या आधारावर कोणत्य घटकाला किती भार देण्यात आला होता ते पुढील पत्रकामध्ये दर्शविले आहे.

अ.क्र.	घटक / निकष	वाटा (%)
१.	लोकसंख्या आधार	६०%
२.	करप्रयत्न	१०%
३.	दरडोई उत्पन्न	१०%
४.	सिंचन व ऊर्जा क्षमता	१०%
५.	राज्याचे वैयक्तिक प्रश्न	१०%

भारताच्या आठव्या पंचवार्षिक योजनानंतरच्या काळात वरील गाडगीळ सूत्रात आणखी काही सुधारणा करण्यात आल्या होत्या. सन १९९१ मध्ये नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष श्री. प्रणव मुखर्जी यांनी वरील गाडगीळ सूत्रामध्ये काही बाबतीत सुधारणा करून पुढील काळातील सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये त्याचा वापर केलेला होता. त्यामुळे पुढील काळात गाडगीळ सूत्र हे 'गाडगीळ मुखर्जी सूत्र' या नावाने ओळखले जाऊ लागले.

❑ गाडगीळ सूत्र व वित्त आयोग :-

वरीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेल्या गाडगीळ सूत्राचा संदर्भ भारतीय संघराज्य वित्त व्यवस्थेत घेतला असल्याचे दिसून येते. संघराज्य वित्त व्यवस्थेत केंद्र सरकार व घटक राज्ये यांच्यात वित्तीय साधनसामग्रीच्या हस्तांतरणामध्ये वित्तीय साधनांचे न्याय्य वाटप घडवून आणण्यासाठी राज्य घटनेच्या कलम २८० नुसार राष्ट्रपतींकडून दर पाच वर्षांसाठी वित्त आयोगाची स्थापना केली जाते. केंद्र व घटक राज्यांमध्ये वित्तीय हस्तांतरणाबाबत वित्त आयोगाकडून महत्त्वपूर्ण अशा शिफारशी केल्या जातात. तसेच केंद्र सरकारकडून महसुलातून तसेच विभाजन योग्य कर उत्पन्नातून घटक राज्यांना किती वाटा द्यावा व राज्या-राज्यांमध्ये त्याचे वाटप कोणत्या आधारावर केले जावे यासाठी वित्त आयोगाकडून विशिष्ट असे निकष ठरविण्यात येतात. धनंजयराव गाडगीळ यांनी विकसित केलेल्या

वरीलप्रमाणे चर्चा करणेत आलेल्या 'गाडगीळ सूत्रात' अंतर्गत असणारे सर्वच निकष वित्त आयोगांच्या कार्यवाहीमध्ये वापरल्याचे दिसून येते. भारतात आतापर्यंत स्थापन करणेत आलेल्या एकूण चौदा वित्त आयोगांपैकी नवव्या वित्त आयोगापासून सर्वच वित्त आयोगांमध्ये केंद्र व राज्यांच्या वित्तीय साधन सामग्रीच्या वाटपामध्ये नवा दृष्टीकोण स्वीकारण्यात आलेला आहे. अलिकडील काळातील सर्वच वित्त आयोगांचा आढावा घेतल्यास असे आढळून येते की, गाडगीळ सूत्रानुसारचे निकष आणि वित्त आयोगांनी निर्धारित केलेले निकष यामध्ये बरेच साम्य आढळून येते. बहुतेक वित्त आयोगांमध्ये केंद्राकडून राज्यांकडे कर महसूल वाटपामधील हिस्सा निर्धारित करण्यासाठी प्रामुख्याने लोकसंख्या, राज्यांचे दरडोई उत्पन्न, राज्यांचे क्षेत्रफळ, करवसुलीचे प्रयत्न, राजकोषीय शिस्त, राज्यांचा मागासलेपणा (विशेष समस्या) यासारख्या विविध निकषांचा आधार घेण्यात आलेला आहे. यावरून असे सांगता येईल की, वित्त आयोगाला आपली रूपरेषा ठरविण्यामध्ये तसेच कार्यपध्दती अधिक कार्यक्षमपणे करण्यामध्ये गाडगीळ सूत्र वित्त आयोगाला मार्गदर्शक आणि नवी दिशा देणारे आहे.

४.२.२ दहावा, अकरावा, बारावा आणि तेराव्या वित्त आयोगांचे अहवाल

४.२.२.१ दहावा वित्त आयोग अहवाल :-

१५ जून १९९२ रोजी श्री. के. सी. पंत यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपतींनी दहाव्या वित्त आयोगाची स्थापना केली. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यातील वित्तीय हस्तांतरणाबाबत आयोगाने आपल्या महत्त्वपूर्ण शिफारशी १ एप्रिल १९९५ ते ३१ मार्च २००० या पाच वर्षाच्या कालावधीसाठी आपल्या अहवालामधून सादर केल्या.

खालील प्रमुख तीन संदर्भ अटी विचारात घेऊन दहाव्या वित्त आयोगाला आपल्या शिफारशी मांडण्यास सूचित करण्यात आले होते.

१) केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यात निव्वळ करमहसूलातील वाटा निश्चित करण्यासंबंधी शिफारशी करणे.

२) देशाच्या एकत्रित संकलित निधीपैकी राज्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानासंबंधी महत्वपूर्ण शिफारशी करणे.

३) केंद्र व राज्ये यांच्यामध्ये निव्वळ महसूलाच्या वाटपाबाबत (विभागणी) शिफारशी करणे.

❑ **मुख्य शिफारशी :-**

अ) कर महसूलातील वाटपासंदर्भातील शिफारशी :-

(i) केंद्र सरकारला उत्पन्न करापासून प्राप्त झालेल्या एकूण महसूलापैकी ७७.५% इतकी

रक्कम घटक राज्य सरकारांना देण्यात यावी अशी शिफारस १०व्या वित्त आयोगाने केली होती.

(ii) केंद्र सरकारला मिळणाऱ्या अबकारी करातील (Excise Duties) एकूण महसूलापैकी ४५% रक्कम राज्य सरकारांना देण्याची शिफारस करण्यात आली होती.

वरील कर महसूलाचे राज्याराज्यांमध्ये वाटप करण्यासाठी आयोगाने पुढील निकष ठरवून दिले.

१) २० टक्के रक्कम १९७१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या आधारावर देणे.

२) ६० टक्के रक्कम जास्तीत जास्त दरडोई उत्पन्न व कमीत कमी दरडोई उत्पन्न यातील तफावत विचारात घेऊन द्यावी.

३) ५ टक्के रककम राज्याचे क्षेत्रफळ विचारात घेऊन द्यावी.

४) ५ टक्के रक्कम राज्याच्या पायाभूत सुविधा निर्देशांकाच्या आधारावर देण्यात यावी.

५) १० टक्के रक्कमेचे वाटप वित्तीय साधनसामग्री वाढविण्यासाठी राज्यांनी केलेल्या प्रयत्नांच्या आधारावर दिली जावी.

ब) अनुदान वाटपासंदर्भातील शिफारशी :-

(i) रेल्वे प्रवासी भाडे कराऐवजी अनुदाने : दहाव्या वित्त आयोगाने केंद्र सरकारला मिळणाऱ्या रेल्वे प्रवासी भाडे करामधून राज्यांना १९९५ ते २००० या कालावधीसाठी दरवर्षी ३८० कोटी रुपये अनुदान स्वरूपात रक्कम देण्यात यावी अशी शिफारस केली होती. नवव्या वित्त आयोगाकडून ही रक्कम दरवर्षी १५० कोटी इतकी देण्यात आलेली होती.

(ii) कलम २७५(१) अंतर्गत देण्यात येणारी अनुदाने : राज्य सरकारांच्या महसुली खात्यामधील तूट भरून काढण्यासाठी कलम २७५(१) अंतर्गत जी अनुदाने देण्यात येतात, त्यासाठी दहाव्या वित्त आयोगाकडून राज्यांना दरवर्षी ७५४० कोटी रुपये देण्याची शिफारस करण्यात आली होती. जेणेकरून राज्यांची महसुली तूट भरून काढण्यास मदत होईल. वरील अनुदान रक्कम मुख्यत: जिल्हा प्रशासन, शिक्षण, तसेच राज्यांच्या विशेष समस्या इ. मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी खर्च करण्यात यावी अशी अपेक्षा वित्त आयोगाकडून ठेवण्यात आलेली होती.

(iii) आपत्ती निवारणासाठी अनुदाने : राज्यांमध्ये निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्ती उदा. दुष्काळ, महापूर, भूकंप इ. निवारण करण्यासाठी देण्यात येणारी अनुदाने नियमितपणे पुढे देण्यासंदर्भात आयोगाने शिफारस केली आहे. यानुसार राज्यांना आपत्ती निवारण करण्यासाठी

४७३० कोटी रुपये अनुदान केंद्राने देण्याची शिफारस करण्यात आली.

(iv) स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात पंचायती व नगरपालिका यांना ५३८० कोटी रुपये अनुदाने देण्याची शिफारस दहाव्यावित्त आयोगाने केली आहे.

दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार घटक राज्यांना केंद्राकडून वरील विविध स्वरूपात जी अनुदाने देण्यात आली त्यांची एकत्रित रक्कम २०,३०० कोटी रुपये सन १९९५ ते २००० या कालावधीसाठी होती.

✡ **सारांश :–**

१० व्या वित्त आयोगामध्ये घटक राज्यांच्या प्रशासकीय सुधारणा तसेच सामाजिक सेवा सुधारणे तसेच आपत्ती निवारण करण्यासाठी राज्यांना भरीव निधी यासारख्या घटकांना अधिक महत्त्व दिल्याचे दिसते.

४.२.२.२ अकरावा वित्त आयोग अहवाल :–

तत्कालीन राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांनी अर्थतज्ज्ञ प्रा. ए. एम. खुसरो यांच्या अध्यक्षतेखाली ३ जुलै १९९८ रोजी ११ व्या वित्त आयोगाची स्थापना केली. या आयोगाने आपला अहवाल ३१ डिसेंबर १९९९ पर्यंत सादर करावा असे सूचित केले होते. आयोगाने आपला अहवाल ७ जुलै २००० ला राष्ट्रपतींना सादर केला. आयोगाचा कालखंड सन २००० ते २००५ असा ठरविण्यात आला होता.

११ व्या वित्त आयोगाने पुढील बाबतीत शिफारशी कराव्यात असे सुचविण्यात आले होते.

१) केंद्रीय करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे राज्य सरकारांमध्ये वाटप करणे.

२) केंद्राकडून घटक राज्यांना मिळणाऱ्या महसूलाचे वाटप करण्यासाठी निकष ठरविणे.

३) राज्यांना द्यावयाच्या अनुदानाबाबतचे निकष ठरविणे.

४) राज्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम करण्यासाठी त्यांना दिले जाणारे वित्तीय सहाय्य वाढविण्यासाठी मार्ग सुचविणे.

५) केंद्र व राज्ये यांची वित्तीय व्यवस्था संतुलित राहिल व त्यायोगे आर्थिक स्थैर्य निर्माण होईल यासाठी मार्ग सुचविणे.

❑ **अकराव्या वित्त आयोगाच्या प्रमुख शिफारशी :–**

अकराव्या वित्त आयोगाने आपल्या अहवालातून पुढील महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविल्या आहेत.

(i) केंद्र सरकारला कर आणि करेतर या दोन्ही मार्गाने जो एकूण महसूल प्राप्त होतो. त्यामधील ३७.५ टक्के महसूल राज्यांना हस्तांतरित करण्याची शिफारस आयोगाने केली.

(ii) वरील महसूलापैकी २९.५ टक्के हिस्सा हा केंद्र सरकारला मिळणाऱ्या निव्वळ कर महसूलातून देण्यात यावा आणि उर्वरित हिस्सा राज्यांना अनुदानाच्या स्वरूपात देण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली.

उपरोक्त कर महसूलातील हिस्सा राज्यांमध्ये वाटप करत असताना आयोगाने पुढील निकषांच्या आधारावर कर महसूलाचे वाटप करावे अशी शिफारस केली आहे.

(अ) राज्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर २० टक्के.

(ब) राज्याचे दरडोई उत्पन्न व सर्वोच्च दरडोई उत्पन्न यातील तफावतीनुसार ६५.५ टक्के.

(क) राज्यांच्या क्षेत्रफळानुसार ७.५ टक्के.

(ड) पायाभूत सुविधा निर्देशांकानुसार ७.५ टक्के.

(इ) राज्यांच्या करवसुली प्रयत्नांनुसार ५.० टक्के.

(फ) राज्यांच्या राजकोषिय शिस्तीनुसार ७.५ टक्के.

(iii)सहाय्यक अनुदाने :-

(अ) ११ व्या वित्त आयोगाने केंद्राने राज्यांना कर व अनुदानाच्या स्वरूपात ४,३४,९५० कोटी रुपये हस्तांतरित करण्याची शिफारस केली आहे.

(ब) राज्य सरकारांना त्यांची महसुली तूट भरून काढण्यासाठी आयोगाने देशातील १५ राज्यांना ३५,३५९ कोटी रुपये अनुदान देण्याची शिफारस केली होती.

(क) राज्यांचा प्रशासकीय दर्जा उंचावण्यासाठी तसेच काही राज्यांच्या विशेष समस्या सोडविण्यासाठी ४,९१३ कोटी रुपये अनुदानाची शिफारस करण्यात आली.

(ड) पंचायती व नगरपालिका यांच्या विकासासाठी आयोगाने १०,००० कोटी रुपये अनुदान देण्याची शिफारस केली होती. यामध्ये ग्रामपंचायतींना दरवर्षी १,६०० कोटी रुपये तसेच नगरपालिकांना दरवर्षी ४०० कोटी रुपये अनुदानाची शिफारस करण्यात आली.

(iv) आपत्ती निवारण निधी :-

नैसर्गिक आपत्ती निवारण करण्यासाठी वित्त आयोगाने ११००८ कोटी रुपयांची तरतूद आपल्या शिफारशीद्वारे केली. यामध्ये ७५:२५ याप्रमाणात केंद्र सरकारकडून ८२५६ कोटी

निधी देण्यात येईल. उर्वरित २७५२ कोटी रुपये निधी राज्यांनी उभारावा अशी शिफारस केली. त्याकरिता राज्य सरकारांनी ''राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती आकस्मित निधी'' स्थापन करण्याची महत्वपूर्ण शिफारस आयोगाकडून आपल्या अहवालात करण्यात आली.

(v) ११ व्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार घटक राज्यांना केल्या जाणाऱ्या वित्तीय साधन सामग्रीच्या हस्तांतरणाची एकूण रक्कम ४,३४,९५० कोटी रुपये इतकी असेल. यापैकी कर महसूलामार्गे ३,७६,३१८ कोटी रुपये आणि अनुदानांच्या माध्यमातून ५७,५८७ कोटी रुपये हस्तांतरित केले जातील.

(vi) राजकोषीय सुधारणा करण्यासाठी शिफारशी :-

केंद्र व राज्य सरकारांची वित्तीय व्यवस्था सुधारण्यासाठी आयोगाने काही महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत, त्यामध्ये -

अ) सेवा क्षेत्राला अधिकाधिक कराच्या जाळ्याखाली आणणे.

ब) अनावश्यक खर्चाला आळा घालून मुलभूत सुविधांसाठीच्या खर्चावर अधिक भर दिला जावा.

क) करांची थकबाकी कमी करण्याचा प्रयत्न केला जावा.

ड) व्यवसायकराची मर्यादा वाढविण्यात यावी.

इ) घटक राज्ये व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे कर उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

फ) वेतन आयोग लागू करत असताना घटक राज्यांच्या महसुली खर्चावर होणारे परिणाम विचारात घ्यावे.

म) सरकारी क्षेत्रामधील अतिरिक्त मनुष्यबळाचा कार्यक्षमपणे वापर करण्यावर भर दिला जावा.

✡ **सारांश :-**

अकराव्या वित्त आयोगाच्या वरील शिफारशी लक्षात घेता असे दिसून येते की, या वित्त आयोगाची कार्य पध्दत खूप व्यापक स्वरूपाची होती. अनेक महत्वपूर्ण शिफारशी करण्याची जबाबदारी ११ व्या वित्त आयोगावर सोपविण्यात आलेली होती. त्यादृष्टीने या आयोगाने महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे असे म्हणता येईल.

४.२.२.३ बारावा वित्त आयोग अहवाल :-

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी ९ नोव्हेंबर २००२ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली १२ व्या वित्त आयोगाची नेमणूक केली. या आयोगाने आपला अंतरिम अहवाल ३० नोव्हेंबर २००४ रोजी सरकारला सादर केला. सन २००५ ते २०१० असा या आयोगाचा कालावधी निश्चित करण्यात आला होता.

❑ **१२ व्या वित्त आयोगाचे संदर्भीय विषय :-**

१) निव्वळ कर उत्पन्नाचे केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यात विभाजन करण्यासंबंधी निकष ठरविणे.

२) घटनेच्या २७५ व्या कलमानुसार घटक राज्यांना देशाच्या एकूण निधीमधून अनुदानांचे वाटप करणे.

३) राज्यातील पंचायती व नगरपालिका यांची वाढती वित्तीय सामग्रीची गरज पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

४) घटक राज्यांच्या कर्जस्थितीचा आढावा घेऊन त्यांची कर्जस्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

५) ११ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार करण्यात आलेल्या राजकोषीय सुधारणांचे मूल्यमापन करून त्यात आवश्यक असणाऱ्या प्रभावी प्राप्तीसाठी उपाय सुचविणे.

६) प्रचलित असलेल्या आपत्ती निवारण व्यवस्थेचा आढावा घेणे.

❑ **बाराव्या वित्त आयोगाच्या प्रमुख शिफारशी :-**

बाराव्या वित्त आयोगाने आपल्या अहवालातून पुढील महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविल्या आहेत.

I) कर महसूल वाटपाबाबत शिफारशी :-

१२ व्या वित्त आयोगाने केंद्राच्या हस्तांतरण योग्य कराच्या निव्वळ कर उत्पन्नातील हिस्सा ३०.५% पर्यंत वाढविला आहे. ११ व्या वित्त आयोगाच्या तुलनेत हा हिस्सा १% जास्त करण्यात आला. वरील कर उत्पन्नाचे केंद्र आणि घटक राज्ये यांच्यात वाटप करण्यासाठी वित्त आयोगाने समानता आणि वित्तीय कार्यक्षमता या तत्वांवर भर देण्यात यावा अशी शिफारस आपल्या अहवालातून केली.

२००५ ते २०१० या कालावधीत केंद्रीय कर महसूलामधून घटकराज्यांना ६,१३,११२ कोटि रुपये प्राप्त होणार असून त्यातील वाटपासंबंधी वित्त आयोगाने पुढील निकष ठरविले आहेत.

१) २५% लोकसंख्या आधारावर.

२) १०% राज्याच्या क्षेत्रफळ आधारावर.

३) ५०% राज्याचा मागसलेपणाचा आधार (दरडोई उत्पन्नातील अंतर)

४) ७.५% कर प्रयत्नाच्या आधारावर.

५) ७.५% राज्याची वित्तीय शिस्त आधार.

II) राज्यांना दिली जाणारी अनुदाने :-

१२ व्या वित्त आयोगाने राज्य सरकारांना अनुदान व सहाय्यता या माध्यमातून १४२६४६ कोटी रुपये देण्यात यावेत अशी शिफारस केली होती. जेणेकरून काही घटक राज्यांच्या महसुलातील तूट भरून काढण्यास मदत होईल. रस्ते व पूल बांधकामासाठी ५००० कोटी रुपये अनुदान, वनीकरणासाठी १००० कोटी रुपये अनुदान तसेच धार्मिक व ऐतिहासिक क्षेत्रांच्या विकासासाठी ६२५ कोटी रुपये अनुदान देण्याची शिफारस बाराव्या वित्त आयोगाने केली आहे.

III) नैसर्गिक आपत्ती निवारण अर्थसहाय्य :-

१२ व्या वित्त आयोगामध्ये पूर्वीप्रमाणेच राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती निवारण निधीमध्ये केंद्र आणि घटक राज्यांचा हिस्सा ७५.२५ असा कायम ठेवण्यात आला आहे. वित्त आयोगाने २००५ ते २०१० या कालावधीसाठी नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी २१३३३३३ कोटी रुपयाचा भरीव निधी उभारण्याची शिफारस आपल्या अहवालामध्ये केली आहे. त्यापैकी केंद्र सरकारचा हिस्सा १६००० कोटी रुपये तर घटक राज्यांचा हिस्सा ५३३३ कोटी असेल अशी शिफारस करण्यात आली आहे.

IV) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने :-

१२ व्या वित्त आयोगामध्ये सन २००५-२०१० या कालावधीसाठी २५००० कोटी रुपये अनुदानाची शिफारस स्थानिक स्वराज्य संस्थांना केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना असे अनुदान देत असताना नगरपालिकांना २० टक्के तर पंचायतींना ४० टक्के वाटा ठरवून देण्यासंबंधीची शिफारस वित्त आयोगाने केली आहे. यानुसार नगरपालिकाना ५००० कोटी तर पंचायतींना २०००० कोटी रुपयांचे अनुदान देण्याबाबतची शिफारस आपल्या अहवालातून बाराव्या वित्त आयोगाने केली आहे.

V) प्रशासकीय दर्जा सुधारणे आणि विशेष समस्या अनुदान :-

जिल्हा प्रशासन, कारागृहे, अग्निशामक, न्यायदान, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, धार्मिक स्थळे, वित्तीय प्रशासन इ.मध्ये सुधारणा करणे, त्याचप्रमाणे विविध राज्यांमधील विशेष समस्यांची सोडवणूक करण्यासाठी बाराव्या वित्त आयोगाने १०१७१.६५ कोटी रुपये अनुदान देण्याबाबत शिफारस केली आहे. आसाम, बिहार, झारखंड, ओरिसा, उत्तरांचल यासारख्या मागास राज्यांना

त्यांची आरोग्य सेवा सुधारण्यासाठी वित्त आयोगात ५८८७ कोटी रुपये अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.

VI) राजकोषीय पुनर्रचनेसंबंधी शिफारशी :-

केंद्र सरकार व घटकराज्यांच्या वित्तीय स्थितीत सुधारणा करण्यासाठी १२व्या वित्त आयोगाने काही महत्त्वपूर्ण उपाययोजना आपल्या अहवालातून सुचविलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने केंद्र व राज्यांची राजकोषीय तूट GDP च्या ३ टक्केपर्यंत कमी करणे, महसूली तूट GDP (स्थूल देशांतर्गत उत्पादन) च्या ० टक्के पर्यंत खाली आणणे, केंद्र व राज्यांचे संयुक्त कर्ज गुणोत्तर २००९-१० पर्यंत ७५ टक्के पर्यंत आणणे, वेतनावरील खर्च ३५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावा इ. उपाय आयोगाने सुचविले आहेत.

✡ **सारांश :-**

बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार एकूण ७,५५,७५१ कोटी रुपयांचे केंद्राकडून राज्यांना हस्तांतरणहोणार असून त्यापैकी केंद्रीय कर आणि जकातींच्या स्वरूपात ६,१३,११२ कोटी रुपये व अनुदानांच्या स्वरूपात २,४२,६३९ कोटी रुपयांचे हस्तांतरण होणार आहे.

४.२.२.४ तेरावा वित्त आयोग अहवाल :-

भारतीय राज्यघटनेतील कलम २८० अन्वये भारताच्या माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली १३ नोव्हेंबर २००७ रोजी १३ व्या वित्त आयोगाची स्थापना केली. या आयोगाने २०१० ते २०१५ या कालावधीसाठी शिफारशी करावयाच्या होत्या. वित्त आयोगाने आपला अहवाल ३१ डिसेंबर २००९ रोजी राष्ट्रपतींना सादर केला.

❑ **तेराव्या वित्त आयोगाच्या प्रमुख शिफारशी :-**

I) केंद्रीय करातील वाटा :-

घटक राज्यांना केंद्र सरकारकडून विभाजन करता येणाऱ्या निव्वळ कर महसूलापैकी ३२ टक्के वाटा घटक राज्यांकडे हस्तांतरित करावा, अशी शिफारस १३ व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालामधून केली आहे.

II) केंद्रीय महसूलातील वाटा :-

१३व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारला कर आणि करेत्तर मार्गाने जो एकूण महसूल प्राप्त होतो, त्यापैकी ३९.५ टक्के महसूल घटक राज्यांकडे हस्तांतरित करण्यात यावा.

III) कर उत्पन्न वाटपाविषयीचे निकष :-

केंद्र सरकारकडून घटक राज्यांना कर महसूलाच्या वाटपाबाबत १३ व्या वित्त आयोगाने शिफारशीत सांगितलेले निकष पुढील प्रमाणे :-

(अ) राज्याच्या लोकसंख्येच्या आधारावर – २५ टक्के.

(ब) राज्याचे वित्तीय क्षमता अंतर – ४७.५० टक्के.

(क) राज्याचे क्षेत्रफळ – १०.०० टक्के.

(ड) वित्तीय शिस्त – १७.५० टक्के.

वरील निकषांनुसार सर्वाधिक वाटा उत्तर प्रदेशला (१९.६७७%) व त्या खालोखाल बिहारला (१०.९१७%) मिळाला आहे तर सिक्कीमला (०.२३९%) इतका सर्वात कमी वाटा मिळाला आहे.

IV) घटक राज्यांना अनुदाने :-

१३ व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालामध्ये घटक राज्यांना ३८४६१७ कोटी रुपयांची अनुदाने देण्यात यावीत अशी शिफारस केली आहे. या अनुदान रकमेतील साधारणत: ५.१% अनुदानाची रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करण्यात यावी अशी शिफारस वित्त आयोगाने शिफारशीमध्ये केली आहे. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण ८७५१९ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झालेले आहे. याबरोबरच,

(अ) आठ राज्यांना आपली तूट भरून काढण्यासाठी ५१,८०० कोटी रु. अनुदान.

(ब) प्राथमिक शिक्षणासाठी (सर्व शिक्षण अभियान योजना) २४०६८ कोटी रु. अनुदान.

(क) वने, पुनर्निर्मितीक्षम उर्जा व जलक्षेत्रासाठी प्रत्येक राज्याला ५००० कोटी रु.

(ड) पर्यावरण संवर्धनासाठी १५००० कोटी रुपये अनुदान.

(इ) बालमृत्युदर, न्यायसुधारणा, राष्ट्रीय ओळखपत्र कार्यक्रमासाठी (Unique Identification Program) १४४४६ कोटी रुपये अनुदानांची शिफारस १३ व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालातून केली आहे.

V) कर्जाबाबत शिफारशी :-

१३ व्या वित्त आयोगाने कर्जाबाबत केलेल्या काही मार्गदर्शक सुचना पुढीलप्रमाणे :-

अ) केंद्र व घटक राज्यांनी कर्ज GDP प्रमाणे ६८% च्या खाली आणावे.

ब) महसूली तूट २०१३-१४ पर्यंत शून्यावर आणावी व २०१४-१५ पर्यंत ०.५% चे

महसुली अधिक्य निर्माण करावे.

क) राजकोषीय तुटीचे प्रमाण ३ टक्केपर्यंत आणावे.

ड) केंद्राने राज्यांना कर्जे देताना महत्तम मर्यादा पाळावी.

VI) इतर शिफारशी :–

(अ) राष्ट्रीय आपत्ती आकस्मिता निधीचे राष्ट्रीय संकटकालीन निधीमध्ये (Natinal Disaster Fund) मध्ये विलीनीकरण करावे, अशी शिफारस वित्त आयोगाने आपल्या अहवालामध्ये केली आहे.

(ब) एकच कर असणाऱ्या GST (Goods and Service Tax) कराची संरचना तयार करून त्यामध्ये केंद्र व राज्यांच्या सर्व अप्रत्यक्ष करांचे व त्यावरील उपकरांचे वस्तू व सेवा करामध्ये (GST) विलीनीकरण करावे.

(क) सर्व शिक्षा अभियानासारख्या योजनांसाठी केंद्रीय योजना सहाय्य ४०% वरून ५०% इतके करण्यात यावे, अशी शिफारस करण्यात आली.

✡ **सारांश :–**

१३ व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालामधून वरील शिफारशींच्या आधारे केंद्र व घटक राज्यांमधील वित्तीय हस्तांतरणाला अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर केंद्र व राज्य सरकारांच्या राजकोषीय व्यवहारांना शिस्त लावण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविल्या आहेत.

४.२.३ चौदावा वित्त आयोग

भारतीय राज्यघटनेच्या कलम २८० नुसार भारताचे राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांनी डॉ. वाय. व्ही. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली २ जानेवारी २०१३ रोजी चौदाव्या वित्त आयोगाची स्थापना केली आहे. चौदाव्या वित्त आयोगाच्या कालावधी २०१५ ते २०२० या पाच वर्षाचा असून आयोगाने आपला अहवाल राष्ट्रपतींना १५ डिसेंबर २०१५ पर्यंत सादर करावा, असे सूचित करण्यात आले होते.

❑ चौदाव्या वित्त आयोगाचे संदर्भीय विषय (Terms of Reference) :–

चौदाव्या वित्त आयोगाने खालील संदर्भ अटींच्या आधारावर (Terms of Reference) आपल्या शिफारशी कराव्या असू सूचित करण्यात आले आहे.

(i) घटक राज्यांना केंद्राकडून विभाजन योग्य निव्वळ कर महसूलातील किती वाटा द्यावा

याबाबत शिफारशी करणे.

(ii) कलम २७५ अन्वये राज्य सरकारांना जी अनुदाने दिली जातात, अशी अनुदाने कोणत्या तत्वानुसार दिली जावीत याबाबतीत शिफारशी करणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक स्रोत वाढविण्यासाठी राज्य सरकारांच्या संचित निधीत (Consolidated Fund of State) कोणत्या प्रकारे वाढ करता येईल याबाबत शिफारस करणे.

(iv) केंद्र तसेच राज्य सरकारे यांच्या वित्तीय व्यवहारांचा, वित्तीय तुटीचा तसेच कर्जविषयक स्थितीचा आढावा घेऊन त्यांच्या वित्तीय स्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने योग्य उपाय सुचविणे.

(v) सद्य:स्थितीतील सार्वजनिक खर्च व्यवस्थापन पध्दतीचा आढावा घेणे आणि सार्वजनिक खर्च व्यवस्थापनामध्ये आवश्यक त्या सुधारणा कशाप्रकारे करता येतील याबाबत वित्त आयोगाने शिफारशी करणे.

(vi) सद्य:स्थितीत असलेल्या आपत्ती व्यवस्थापन वित्तपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेणे व आपत्कालीन परिस्थितीत सरकारच्या आर्थिक व्यवहारांची कशी व्यवस्था असावी याबाबत शिफारशी करणे.

वरील संदर्भ अटी विचारात घेऊन चौदावा वित्त आयोग आपल्या शिफारशी करेल असे सांगितले आहे.

❑ चौदावा वित्त आयोग दृष्टिकोण आणि शिफारशी (Approach of Recommondations)

I) केंद्रीय करातील वाटा :-

केंद्र सरकारकडून घटक राज्यांना विभाजनयोग्य कर महसूलापैकी जो वाटा देण्यात येतो. त्यामध्ये ४२ टक्के वाटा राज्यांना द्यावा अशी शिफारस चौदाव्या वित्त आयोगाने केली.

वरील शिफारशीमागे आयोगाचा दृष्टीकोण असा आहे की, आयोगाच्या मते केंद्र सरकारकडे उत्पन्न साधने जास्त असल्याने केंद्र सरकारच्या खात्यावर बरीच राजकोषीय आवक आहे. केंद्राला अधिभार आणि उपकरापासून मिळणारे उत्पन्न जास्त आहे. २०००-२००१ मध्ये या करांपासूनचे उत्पन्न एकूण करांपैकी ७.५३ टक्के होते त्यामध्ये २०१३-१४ मध्ये १३.१४ टक्के इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे यातून बरेच उत्पन्न केंद्राला मिळू शकते. त्यामुळे राज्य सरकारांना कर महसूलातील वाटा वाढविल्यास मदत होणार आहे. अशा प्रकारे वित्त आयोगाने उर्ध्व हस्तांतरणाचा (Vertical

Devolution) दृष्टीकोण उत्पन्न वाटपामध्ये समोर ठेवला आहे.

II) कर वाटणीचे निकष :-

करातून राज्यांना मिळालेल्या कर उत्पन्नाच्या हिस्स्याचे राज्या-राज्यांमध्ये वितरण करण्यासाठी वित्त आयोगाने समपातळी हस्तांतरणाचा (Horizontal Devolution) दृष्टीकोण समोर ठेऊन कर उत्पन्न वाटपाचे निकष सुचविले आहेत, ते खालीलप्रमाणे :-

अ) **लोकसंख्या (१९७१) :** १९७१ मधील लोकसंख्या आधार मानून एकूण भारापैकी लोकसंख्येच्या १७.५% भार देण्याची शिफारस वित्त आयोगाने केली आहे. १३ व्या वित्त आयोगाने या निकषाला २५% भार दिला होता.

ब) **जनसांख्यिकीय बदल :** १४ वित्त आयोगाच्या दृष्टीकोनातून १९७१ च्या लोकसंख्येला भार दिला तरी २०११ पर्यंत काही राज्यांची लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात आर्थिक स्रोत अपुरे पडत आहेत. स्थलांतर तसेच वय, रचना यामुळे लोकसंख्येत, संख्यात्मक तसेच गुणात्मक बदल झाले आहेत. काही राज्यांमधील वाढत्या शहरीकरणामुळे स्रोतांची चणचण भासत आहे. यासाठी १९७१ ते २०११ या काळात झालेल्या जनसांख्यिकीय बदल (Demographic Change) विचारात घेऊन वित्त आयोगाने जनसांख्यिकीय बदलाला १० टक्के भार देण्याची शिफारस केली आहे.

क) **उत्पन्न दुरावा (Income Distance) :** दरडोई उत्पन्न दुरावा म्हणजे राज्याचे दरडोई उत्पन्न आणि सर्वाधिक जास्त दरडोई उत्पन्न असलेल्या राज्याचे दरडोई उत्पन्न यामधील तफावत किंवा अंतर होय. त्याचप्रमाणे वित्तीय क्षमता अंतर म्हणजे राज्याची कर क्षमता आणि सर्वाधिक कर क्षमता असलेल्या राज्याची कर क्षमता यातील तफावत होय. चौदाव्या वित्त आयोगाने कर आणि उत्पन्न यांची सांगड घालणे अवघड असल्यामुळे उत्पन्न दुरावा (Income Distance) हा चांगला निकष असल्याची शिफारस केली आहे. या उत्पन्न दुराव्याला ५०% इतका भार देण्यात आला आहे.

ड) **क्षेत्रफळ (Area) :** राज्याच्या क्षेत्रफळानुसार कर उत्पन्न वाटपाला १४ व्या वित्त आयोगाने १५% भार देण्याची शिफारस केली आहे. १३ व्या वित्त आयोगाने क्षेत्रफळाला १०% इतका भार दिला होता.

इ) **वनाच्छादित प्रदेश (Forest Cover) :** पर्यावरण परिस्थितीतील आणि वातावरण बदलाचा विचार करणारी शाश्वत विकासाची संकल्पना अलीकडे स्वीकारली असल्याने वनाच्छादित प्रदेशाला (Forest Cover) ७,५% भार चौदाव्या वित्त आयोगाने दिला आहे.

वरील घटकांना उक्त भार देऊन विभाजनयोग्य करामधील वाट्याचे विविध राज्यांमध्ये वर्गीकरण करण्यात यावे असे १४ व्या वित्त आयोगाने सुचविले आहे.

III) सेवा कर (Service Tax) :-

जम्मू-काश्मीरमध्ये सेवा कर आकारला जात नसल्याने सेवा करापासून मिळणाऱ्या महसूलाचा वाटा जम्मू काश्मीरला देण्यात येऊ नये अशी शिफारस चौदाव्या वित्त आयोगाने केली आहे.

वरील सेवा करातून राज्यांना मिळणारा वाटा वगळून इतर सर्व प्रकारच्या कर उत्पन्नातून सर्वाधिक जास्त वाटा मिळविणारी राज्ये उत्तर प्रदेश १८.२०५%, बिहार ९.७८७%, मध्य प्रदेश ७.७२७% आणि पश्चिम बंगाल ७.४२३% ही आहेत. तर सर्वाधिक कमी वाटा मिळविणारी राज्ये सिक्कीम ०.३६९%, गोवा ०.३७९% आणि मिझोराम ०.४६४% ही आहेत.

IV) स्थानिक सरकार (Local Government) :-

१४ व्या वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात पुढील शिफारशी आपल्या अहवालामध्ये केलेल्या आहेत.

अ) स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणारी अनुदाने ही त्यांनी फक्त मुलभूत सेवांवर खर्च केली पाहिजेत.

ब) या संस्थांचे लेखे, कर महसूल, राज्यांकडून त्यांना मिळणारी अनुदाने, तसेच वित्त आयोगाकडून त्यांना मिळणारी अनुदाने दर्शविणारे असले पाहिजेत.

क) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने देताना २०११ च्या लोकसंख्येला ९०% आणि क्षेत्रफळाला १०% भार देण्यात यावा.

ड) राज्य सरकारांना ग्रामीण आणि शहरी लोकसंख्या विचारात घेऊन अनुदाने ग्रामपंचायतींसाठी आणि नगरपालिकांसाठी अशी विभागून देण्यात येतील. वित्त आयोगाच्या पाहणीनुसार २०१५ ते २०२० याकालावधीमध्ये अंदाजे ही अनुदाने ग्रामपंचायतींसाठी २,००,२९२ कोटी रुपये आणि नगरपरिषदांसाठी ८७,१४३ कोटी रुपये असतील.

इ) स्थानिक स्वराज्य संस्थांना दिली जाणारी अनुदाने दोन प्रकारची असतील, ग्रामपंचायतींना ९०% मूळ अनुदान दिले जाईल. तर २०% अनुदान हे कामगिरीवर आधारित (Peformance Base) असेल. त्याचप्रमाणे नगरपरिषदांना ८०% मूळ अनुदान तर २०% अनुदान कामगिरीवर आधारित दिले जाईल.

ई) मूलभूत सेवा व इतर सेवांवर करावयाच्या खर्चाची वाटणी कशी करावी हे राज्य वित्त आयोगांनी ठरवावे. त्यांनी न सुचविल्यास २०११ च्या लोकसंख्येला ९०% आणि

क्षेत्रफळाला १०% भार हेच सूत्र वापरावे.

फ) वर सांगितलेली अनुदाने जून आणि ऑक्टोबर अशा दोन टप्प्यांमध्ये वर्ग करण्यात यावीत.

V) आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management) :-

अ) राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (National Disaster Relief Fund-NDRF) हा विविध वस्तुंवर उपकर आकारून उभा केला जातो. वित्त आयोगाच्या मते जर उपकर GST (वस्तू व सेवा कर) मध्ये वर्ग केल्यास राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीसाठी वेगळे स्रोत शोधावे लागतील.

ब) कंपन्यांकडून त्यांची सामाजिक बांधिलकी (Social Responsibility) म्हणून राष्ट्रीय आपत्ती निवारणासाठी जो मदत निधी दिला जातो, त्या संदर्भात असणाऱ्या नियमांमध्ये सुधारणा करण्यात यावी अशी वित्त आयोगाने शिफारस केली आहे.

क) राज्य सरकारच्या आपत्ती निवारण निधीमध्ये १० टक्के हिस्सा राज्य सरकारने तर ९०% हिस्सा केंद्र सरकारने द्यावयाचा आहे.

ड) चौदाव्या वित्त आयोगाने राज्य सरकारांना आपत्ती व्यवस्थापनासाठी २०१५ ते २०२० या कालावधीसाठी ५५०९७ कोटी रुपयाचे अनुदान देण्याची शिफारस केली आहे.

VI) अनुदाने (Grant-in-Aid) :-

चौदाव्या वित्त आयोगाने राज्यांना अनुदान देताना महत्त्वपूर्ण दृष्टीकोण समोर ठेवला आहे. वित्त आयोगाकडून मुख्यत: आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, स्वच्छता यासारख्या सार्वजनिक सेवांचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेण्यात आले आहे. त्यामुळे राज्यांना अनुदाने देताना विशिष्ट हेतुसाठी (Specific Purpose) अनुदाने असा दृष्टीकोण समोर ठेवला. वरील विशिष्ट हेतू समोर ठेवून राज्यांना अनुदाने देताना अत्यंत नियोजनबध्द व प्रभावी देखरेख यंत्रणेमार्फत अनुदानांचे वाटप व अंमलबजावणी केली जावी असा चौदाव्या वित्त आयोगाचा दृष्टीकोण आहे.

अनुदानांच्या संदर्भात वित्त आयोगाने पुढील महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

अ) राज्यांनी शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता. या सार्वजनिक सेवांना अग्रक्रम देऊन या सेवांवरील अनुदानांचा खर्च नियोजित व कार्यक्षम असला पाहिजे.

ब) सार्वजनिक सेवांबरोबरच राज्यांनी प्रशासन, न्याययंत्रणा, पोलिस यंत्रणा यावरही खर्च करून सर्वांगीणदृष्ट्या सक्षम व्हावे.

क) देशातील ११ राज्यांना २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एकूण १,९४,८२१ कोटी

रुपयांची अनुदाने दिली जातील. त्यापैकी आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मिर, मणिपूर, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा या ७ राज्यांना ५ वर्षांसाठी तर आसाम, केरळ, मेघालय आणि पं. बंगाल या ४ राज्यांना ठराविक वर्षे महसुली तूट भरून काढण्यासाठी अनुदाने दिली जातील.

VII) सहकारी संघराज्याचा दृष्टीकोण (Approach of Co-operative Federalism) :-

वित्तीय हस्तांतरणाच्या बाबतीत केंद्र व राज्ये यांच्यामध्ये सहकार्य आणि सामंजस्याचे संबंध प्रस्थापित होऊन सहकारी संघराज्याची निर्मिती करणे हा चौदाव्या वित्त आयोगाचा महत्त्वपूर्ण दृष्टीकोण मानला जातो. सहकारी संघराज्याच्या दिशेने पाऊले टाकण्यासाठी चौदाव्या वित्त आयोगाने पुढील मार्गदर्शक सूचना केल्या आहेत.

अ) केंद्र आणि राज्यांच्या विविध संबंधाचे तसेच केंद्राकडून घटक राज्यांना हस्तांतरित होणाऱ्या स्रोतांचे व्यापक दृष्टीने परीक्षण केले पाहिजे.

ब) राज्यांमधील कोणत्या क्षेत्रापर्यंत अनुदाने पोहचली पाहिजेत, तसेच राज्या-राज्यांमध्ये स्रोतांचे वर्गीकरण कसे करावे, ज्यायोगे सहकारी संघराज्याच्या संकल्पनेच्या मजबुती प्राप्त होईल, त्यादृष्टीने नवीन संस्थात्मक रचना असली पाहिजे. अशा संस्थात्मक रचनेने प्रादेशिक असमतोल, आर्थिक व पर्यावरणीय प्रश्न, यासारखे प्रश्न हाताळावेत.

क) प्रस्थापित आंतरराज्यीय परिषदेचे कार्यक्षेत्र वाढविण्यात यावे.

ड) केंद्राने केंद्रीय महसूली जमेतील कमाल ४९% वाटा राज्यांना देण्याचा प्रयत्न करावा, असे चौदाव्या वित्त आयोगाने सुचविली.

VIII) राजकोषीय दृढीकरण (Fiscal Consolidation) :-

केंद्र सरकार व राज्य सरकारे यांची वित्तीय व्यवस्था सुदृढ करणेसाठी चौदाव्या वित्त आयोगाने पुढील महत्त्वपूर्ण सूचना व उपाय सुचविले आहेत.

अ) केंद्र व राज्य सरकारांनी आपआपल्या कर्जाचे नियोजन करण्यासाठी कर्जाचे एकत्रित व वार्षिक अहवाल व त्यांचे विश्लेषण करणारी एक सर्वमान्य पद्धत विकसित करावी.

ब) भांडवली गुंतवणूक करताना केंद्र व राज्यांनी भांडवली खर्च विशिष्ट मर्यादेपलिकडे जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

क) २०१६-१७ ते २०२० पर्यंत राजकोषीय तूट ३% च्या खाली आली पाहिजे. चांगला वृध्दी दर, GST सारख्या कर सुधारणा तसेच कर महसूलात वाढ यासाठी केंद्र सरकारने

प्रयत्न करावेत. जेणेकरून २०२० पर्यंत महसुली तूट शून्यावर येईल.

ड) राज्य सरकारांना देखील त्यांची राजकोषीय तूट ३% पर्यंतच रोखावी लागेल. ज्या राज्यांचे कर्ज जीडीपी गुणोत्तर २५% किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा राज्यांना कर्ज घेऊन ३.२५% पर्यंत राजकोषीय तूट ठेवता येईल.

इ) राज्यांना राष्ट्रीय अल्पबचत निधीमधून (National Small Savings Fund) जी कर्जे दिली जातात, अशी कर्जे १ एप्रिल २०१५ पासून बंद करण्यात यावीत.

ई) राजकोषीय जबाबदारी व अंदाजपत्रकीय व्यवस्थापन कायद्यात FRBM (Fiscal Responsibility & Budgetory Management) दुरुस्ती करून एक नवीन सेक्शन टाकण्यात यावा. या सेक्शननुसार अर्थसंकल्पामुळे राजकोषीय धोरणावर होणाऱ्या परिणामांचे मोजमाप करण्यासाठी एका स्वतंत्र 'राजकोषीय परिषदे'ची (Fiscal Council) स्थापना करण्यात यावी.

फ) राज्यघटनेच्या कलम २९२ अन्वये केंद्र सरकारला कर्ज उभारता येते, या कलमाला आधार मानून केंद्र सरकारने राजकोषीय जबाबदारी व अंदाजपत्रकीय व्यवस्थापन कायद्यात (FRBM) सुधारणा करण्याऐवजी 'कर्ज कमाल मर्यादा आणि राजकोषीय जबाबदारी कायदा' (Debt Ceiling & Fiscal Responsibility Legislastion) असा नवीन कायदा बनवावा.

IX) सार्वजनिक खर्च व्यवस्थापन (Public Expenditure Management) :-

सार्वजनिक खर्चाच्या व्यवस्थापनासंदर्भात १४व्या वित्त आयोगाने आपल्या अहवालात काही मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे :-

अ) सार्वजनिक खर्च व्यवस्थापनाबाबत महालेखापरीक्षकाने नोंदविलेल्या निरीक्षणांवर तत्परतेने आणि प्रभावी पाठपुरावा केला जावा.

ब) सार्वजनिक खर्च करताना फलनिष्पती अर्थसंकल्पाचे (Out-come Budget) तत्व वापरण्यात यावे.

क) केंद्र सरकार आणि घटक राज्यांनी दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने (Administrative Reforms Commission) लेखापरीक्षणाबाबत केलेल्या शिफारशी लागू कराव्यात.

ड) अकराव्या वित्त आयोगाने सुचविल्याप्रमाणे केंद्र, राज्य व राज्या-राज्यांमध्ये सल्लामसलत यंत्रणा म्हणून आंतरराज्य परिषद विकसित करण्यात यावी.

इ) वेतन आयोगाचे नाव 'वेतन व उत्पादकता आयोग' (Pay & Productivity Commission) असे करून या आयोगाने वेतनाबरोबर कर्मचाऱ्यांची उत्पादकता कशी वाढेल, याबाबत शिफारशी करणे जास्त संयुक्तिक ठरेल.

ई) नवीन पेन्शन योजना लागू न केलेल्या राज्यांनी भविष्यातील सरकारच्या तिजोरीवरील ताण विचारात घेऊन योजना लवकरात लवकर लागू करावी.

✡ **सारांश :-**

१४ व्या वित्त आयोगाच्या वरील विविध शिफारशी विचारात घेतल्यास केंद्र व राज्ये यांच्यावित्तीय हस्तांतरण व्यवस्थेबाबत १४ व्या वित्त आयोगाचा एक वेगळ्या प्रकारचा दृष्टीकोण असल्याचे दिसून येते. वित्त आयोगाने केंद्र व राज्ये यांच्यातील वित्तीय हस्तांतरणाला अधिक सदृढता, लवचिकता, पारदर्शकता कशी प्राप्त होईल, यासाठी प्रभावी उपाय आणि मार्गदर्शक सुचना केलेल्या आहेत. 'सहकारी संघराज्य' या दिशेने केंद्र व राज्य सरकारांची वाटचाल होण्याच्या दृष्टीकोणातून वित्त आयोगाने महत्त्वपूर्ण अशा शिफारशी आपल्या अहवालामधून मांडलेल्या आहेत.

१५ वा वित्त आयोग :

२७ नोव्हेंबर २०१७ मध्ये स्थापन झालेली एक घटनात्मक संस्था आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींमध्ये २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीचा समावेश असेल. घटनेच्या कलम २८० नुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी पाच वर्षे किंवा त्यापूर्वी वित्त आयोगाची स्थापना करणे आवश्यक आहे. श्री. एन. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखालील १५ व्या वित्त आयोगाला दोन अहवाल सादर करणे आवश्यक होते. २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठीच्या शिफारशींचा समावेश असलेला पहिला अहवाल फेब्रुवारी २०२० मध्ये संसदेत मांडण्यात आला. २०२१-२६ कालावधीसाठीच्या शिफारशींसह अंतिम अहवाल १ फेब्रुवारी २०२१ रोजी संसदेत मांडण्यात आला.

१५ वा वित्त आयोग ही भारतातील एक संवैधानिक संस्था आहे, जी केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमधील आर्थिक संसाधनांच्या वितरणाची शिफारस करण्यासाठी जबाबदार आहे. देशातील सहकारी संघराज्यवादाला चालना देण्याच्या उद्देशाने कर, अनुदान आणि इतर आर्थिक बाबींची वाटणी निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

१५ व्या वित्त आयोगाचे सदस्य:-

१५ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष:- नंद किशोर सिंग

१५ व्या वित्त आयोगाचे सचिव:- अरविंद मेहता

१५ व्या वित्त आयोगाचे सदस्य:- पूर्णवेळ सदस्य -अजय नारायण झा, अशोक लाहिरी आणि अनूप सिंग आहेत. अर्धवेळ सदस्य- रमेश चंद,. शक्तीकांता दास.

कालावधी:- २०२०-२०२५.

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी:-

२०२१ ते २०२६ या सहा वर्षांच्या कालावधीसाठी लागू होतील. या शिफारशींमध्ये वित्तीय वितरण, आर्थिक प्रभाव मूल्यांकन आणि राज्य सरकारांना प्रोत्साहन देण्याच्या विविध पैलूंचा समावेश आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

कर उत्पन्नाचे वितरण:-

आयोगाने केंद्र सरकार आणि राज्यांमध्ये कराच्या रकमेचे न्याय्य वितरण करण्याची शिफारस केली आहे, एक संतुलित वित्तीय वाटणी यंत्रणा सुनिश्चित केली आहे.

GST चा प्रभाव:-

वित्त आयोगाने वस्तू आणि सेवा कराचा (GST) अर्थव्यवस्थेवर होणार्या परिणामाचा अभ्यास करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. या मूल्यांकनाचा उद्देश जीएसटीच्या अंमलबजावणीचे परिणाम आणि विविध क्षेत्रांवर होणारे परिणाम समजून घेणे हा आहे.

कामगिरी-आधारित प्रोत्साहन:-

आयोग राज्य सरकारांना कार्यप्रदर्शन-आधारित प्रोत्साहन प्रदान करण्याची सूचना करतो. ही प्रोत्साहने लोकसंख्या नियंत्रण, व्यवसायात सुलभता आणि इतर संबंधित घटक यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांवर आधारित असतील.

राज्यांना अनुदान:-

वित्त आयोगाने महसुली तूट, अनुदान, स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान आणि राज्यांना आपत्ती व्यवस्थापन अनुदानाची तरतूद प्रस्तावित केली आहे. या अनुदानांचा उद्देश राज्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करणे आणि प्रभावी प्रशासन सुनिश्चित करणे आहे.

क्षेत्र-विशिष्ट आणि कार्यप्रदर्शन-आधारित अनुदान:-

आयोगाने क्षेत्र-विशिष्ट आणि कार्यप्रदर्शन-आधारित अनुदानांसाठी फ्रेमवर्क स्थापन करण्याची शिफारस केली आहे. हे अनुदान राज्यांना विशिष्ट क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यास आणि विकासात्मक लक्ष्ये साध्य करण्यासाठी त्यांच्या कामगिरीला पुरस्कृत करण्यास प्रोत्साहित करेल.

अनुलंब आणि क्षैतिज उत्क्रांतीमधील फरक:-

(Difference between Vertical and Horizontal Devolution)

भारतीय राज्यघटनेच्या कलम २८० नुसार, प्रत्येक वित्त आयोगाने केंद्र आणि राज्यांमध्ये आणि देशातील विविध राज्यांमध्ये करांच्या निव्वळ उत्पन्नाची वाटणी करण्याबाबत सूचना आणि शिफारसी केल्या पाहिजेत. संघाचे कर विविध राज्यांना हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला अनुलंब देवाणघेवाण असे म्हणतात. याउलट, विविध राज्यांमधील करांच्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेला क्षैतिज देवाणघेवाण म्हणून ओळखले जाते.

१५ व्या वित्त आयोगात अनुलंब विकास

अनुलंब विकासाच्या मुख्य ठळक वैशिष्ट्यांमध्ये हे समाविष्ट आहे:-

१५ व्या वित्त आयोगाने ४१% वर उभ्या हस्तांतरणाची शिफारस केली आहे.

चौदाव्या वित्त आयोगाप्रमाणेच, तो विभाज्य पूलच्या ४२% च्या पातळीवर आहे.

१५ व्या वित्त आयोगातील एक टक्के बदल जम्मू आणि काश्मीरच्या बदललेल्या स्थितीमुळे आवश्यक समायोजनामुळे झाला आहे, जो आता जम्मू आणि काश्मीर आणि लडाखचा केंद्रशासित प्रदेश बनला आहे.

१५ व्या वित्त आयोगात क्षैतिज विकास:-

क्षैतिज विकासासाठी, आयोगाने खालील वजने सुचवली आहेत:

उत्पन्न अंतर ४५%

क्षेत्र - १५%

लोकसंख्या १५%

लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी १२.५%

वन आणि पर्यावरणशास्त्र - १०%

कर आणि वित्तीय प्रयत्न - २.५%

१५ व्या वित्त आयोगाचे महत्त्व:-

सहकारी संघराज्य बळकट करण्यासाठी प्रचंड सुधारणा केल्या जात असताना १५ वा वित्त आयोग अस्तित्वात आला. १५ व्या वित्त आयोगाचे महत्त्व खाली विवेचन केले आहे.

सहकारी संघराज्यवादाची संकल्पना मांडते:- हा अहवाल आणण्यासाठी वित्त आयोगाने सरकारच्या सर्व स्तरांसोबत व्यापकपणे काम केले आहे. यामुळे सहकारी संघराज्याच्या तत्त्वाचा विकास होण्यास मदत झाली आहे.

वित्तीय स्थिरतेला प्रोत्साहन देते:- वित्त आयोगाने सार्वजनिक खर्चाची गुणवत्ता सुधारण्यासाठी धोरणांना प्रोत्साहन देणारा अहवाल तयार केला आहे. विविध पातळ्यांवर वजन अशा प्रकारे सुचवले गेले आहे की ज्यामुळे देशातील वित्तीय स्थिरता वाढेल.

चांगल्या आणि सेवा कर सुधारणांची अंमलबजावणी:- वित्त आयोगाने अनेक कामगिरी-आधारित प्रोत्साहने आणली ज्यामुळे अप्रत्यक्ष कराचा विस्तार आणि सखोलता वाढण्यास मदत झाली. गेल्या काही वर्षांत जीएसटीमधून मिळणारा महसूल प्रचंड वाढत आहे.

पंधराव्या वित्त आयोगामध्ये केलेल्या शिफारशी बाबत काही चिंता दिसून येतात:-

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनी भागधारकांमध्ये काही चिंता आणि वादविवादांना जन्म दिला आहे. वित्त आयोग केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये जो निधी वाटप ठरवण्यासाठी वापरल्या जाणार्या निकषांभोवती फिरतात, राजकोषीय संघराज्यावर होणारा परिणाम आणि राज्यांमधील संसाधन वितरणातील संभाव्य असमानता. खाली नमूद केलेले मुद्दे १५ व्या वित्त आयोगाच्या चिंतांचे विश्लेषण करतात.

१५ व्या वित्त आयोगासाठी नमूद केलेल्या अटींमुळे सहकार केंद्राच्या भावनेवर शंका निर्माण झाली आहे. राज्यांमधील संसाधनांचे वाटप करण्यासाठी २०११ च्या जनगणनेचा वापर हा सर्वात गंभीर मुद्दा आहे. सध्या १९७१ ची जनगणना वापरली जाते.उपलब्ध सर्वात अलीकडील जनगणना डेटा वापरण्याचे उद्दिष्ट आणि कल्पना हा एक वाजवी मुद्दा आहे. या प्रस्तावामुळे सामाजिक-राजकीय आघाडीवर प्रचंड वाद निर्माण झाला आहे. त्याचे मुख्य कारण असे आहे की अनेक दशकांपासून लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्यांसाठी यामुळे गैरसोय होणार आहे.

कमी लोकसंख्या वाढ थेट कमी प्रजनन दराशी जोडलेली आहे. हे उत्तम आरोग्य सेवा सुविधा, शिक्षण आणि विकासामुळे होते. अशा प्रकारे, हे उघड दिसते की ज्या राज्यांनी वेगाने विकास केला आहे त्यांना विकास उपक्रमांच्या यशासाठी दंड ठोठावला जात आहे.

४.२.४ वित्तीय असमतोलाची समस्या (Problem of Fiscal Imbalance)

भारतात संघराज्य शासन व्यवस्था अस्तित्वात आहे. या संघराज्य शासन व्यवस्थेमध्ये

देशासाठी केंद्र सरकार तर घटक राज्यांसाठी राज्य सरकारे कारभार करतात. त्यानुसार अशा संघराज्यीय शासन व्यवस्थेमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यामध्ये कार्यांचे व वित्तीय अधिकारांचे विभाजन राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार होत असते. भारतीय संघराज्य शासन व्यवस्थेत केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय साधनांच्या विभाजनामधून वित्तीय असमतोलाची समस्या निर्माण होते. ही वित्तीय असमतोलाची समस्यानिर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे केंद्र सरकारला वित्तीय संसाधने गोळा करण्याचे अधिकार राज्यांच्या तुलनेत जास्त आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारकडे वित्तीय संसाधनांचे केंद्रीकरण झालेले आहे. याउलट राज्यांना वित्तीय संसाधने अपुरी पडतात. यातूनच वित्तीय असमतोलाची समस्या निर्माण होते.

❑ वित्तीय असमतोलाचे स्वरूप :–

केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्या वित्तीय हस्तांतरणामधून जो वित्तीय असमतोलाचा प्रश्न उद्‌भवतो, त्याचे स्वरूप उर्ध्व असमतोल आणि समपातळी किंवा क्षैतिज असमतोल अशा दोन प्रकारचे असते. त्यामुळे आपणांस या दोन्ही प्रकारच्या असमतोलाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक ठरते.

अ) उर्ध्व असमतोल (Vertical Imbalance) :-

जेव्हा वरच्या स्थानावर केंद्र सरकार आणि खालच्या स्थानावर राज्य सरकारे अशा स्वरूपात वित्तीय संसाधने व कार्यांचे वाटप झालेले असते. अशावेळी केंद्र सरकारांकडे वित्तीय संसाधने जास्त प्रमाणात एकवटलेली असतात याउलट राज्यसरकारांकडे जबाबदाऱ्या अधिक प्रमाणात दिल्या गेल्याने, केंद्राकडे उत्पन्नाची साधने जास्त व खर्चाच्या जबाबदाऱ्या कमी आणि राज्य सरकारांकडे खर्चाच्या बाबी अधिक आणि उत्पन्नांची साधने कमी अशी स्थिती निर्माण झालेली असते, तेव्हा त्यास उर्ध्व किंवा स्तंभात्मक असमतोल (Vertical Imbalance) असे म्हणतात. वेगळ्या शब्दात असे सांगता येईल की, जेंव्हा केंद्र सरकारच्या महसूलापेक्षा खर्च कमी असतो, तर राज्य सरकारांच्या महसूलापेक्षा त्यांचा खर्च जास्त असतो त्यामुळे वरील पातळीवर केंद्र सरकार व खालील पातळीवर राज्य सरकारे अशी रचना असल्याने त्यास उर्ध्व किंवा स्तंभ पातळी असमतोल असे म्हटले जाते. काहीवेळा यास खडा असमतोल असे संबोधले जाते.

ब) समस्तर किंवा समपातळी असमतोल (Horizontal Imbalance) :-

समस्तर किंवा समपातळी हा असमतोलाचा दुसरा प्रकार राज्या–राज्यांमधील असमतोलाशी संबंधित असतो. म्हणून यास समस्तर किंवा समपातळी असमतोल असे म्हणतात. अशा प्रकारचा असमतोल निर्माण घेण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे काही राज्ये आर्थिक दृष्टीने पुढारलेली असतात, त्यामुळे त्यांची वित्त व्यवस्था बळकट असते. याउलट काही राज्ये आर्थिक दृष्टीने मागासलेली

असतात, त्यामुळे त्यांची वित्तीय स्थिती फारशी चांगली नसते किंबहुना बिकट स्वरूपाची असते. त्यामुळे राज्या-राज्यांमध्ये विषमता निर्माण झालेली असते, एका अर्थाने या राज्या-राज्यांमधील अशा विषमतेलाच समपातळी (Horizontal Imbalance) असमतोल असे संबोधले जाते. असा समपातळी असमतोल निर्माण झाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांना सार्वजनिक सेवा उपलब्ध करून देण्यामध्ये वित्तीय साधने उभारण्यासाठी अनेक मर्यादा पडतात.

वरील दोन्ही प्रकारच्या असमतोलामुळे राज्य सरकारांना मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारवर अवलंबून रहावे लागते. परिणामी राज्यांची स्वायत्तता धोक्यात येते.

वरील दोन्ही प्रकारचे असमतोल दूर करण्यासाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारांकडे अधिक प्रमाणात वित्तीय हस्तांतरण करण्याची गरज निर्माण होते. भारतीय संघराज्य शासन व्यवस्थेत वरील प्रकारच्या वित्तीय असमतोलांची शक्यता लक्षात घेऊन राज्यघटनेने केंद्र व राज्ये यांच्यात वित्तीय साधनसामग्रीच्या हस्तांतरणाची तरतूद केली आहे. असे वित्तीय हस्तांतरण प्रामुख्याने कर महसूल, अनुदाने, कर्जे या स्वरूपात केली जाते. अशा वित्तीय साधनसामग्रीच्या हस्तांतरणाचे उचित प्रमाण ठरविण्यासाठी भारतात दर ५ वर्षांसाठी वित्त आयोगाची स्थापना घटनेच्या २८० व्या कलमानुसार राष्ट्रपती करतात.

स्वातंत्र्यापासून सन १९५१ पासून आतापर्यंत भारतात वित्तीय हस्तांतरणाच्याकार्यवाहीसाठी १४ वित्त आयोगांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेली आहे. अलिकडील १२ व्या वित्त आयोगांपासून प्रत्येक वित्त आयोगाने केंद्र व राज्य पातळीवर निर्माण होणारे स्तंभात्मक व लंबात्मक (Vertical & Horizontal) अशा दोन्ही स्वरूपाचे असमतोल कमी करण्यासाठी विविध निकष ठरवून त्याआधारे केंद्राकडून राज्यांना अधिकाधिक वित्तीय साधनांचे हस्तांतरण तसेच राज्यांच्या स्तरावर विशेषत: दुर्बल आणि विशेष समस्या असणाऱ्या राज्यांना अधिक प्रमाणात वित्तीय संसाधनामध्ये वाटा मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

४.३ सारांश

भारतात संघराज्य शासन पध्दती अस्तित्वात आहे. संघराज्यात केंद्र सरकार, घटकराज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशा विविध पातळ्यांवर सरकारचा कारभार चालतो. अशा संघराज्य शासन व्यवस्थेत 'संघराज्य वित्त व्यवस्था' (Federal Finance) महत्त्वपूर्ण मानली जाते. संघराज्य वित्त व्यवस्थेत वित्तीय हस्तांतरणाला अत्यंत महत्त्व आहे. भारतीय राज्यघटनेचा वित्तीय हस्तांतरणाला आधार प्राप्त झाला आहे. राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केंद्र व राज्य सरकारांमध्ये वित्तीय हस्तांतरणाची प्रक्रिया चालते, यासाठी घटनेच्या २८० व्या कलमानुसार भारतात राष्ट्रपती दर पाच वर्षासाठी वित्त आयोगाची स्थापना करतात. भारतात आतापर्यंत एकूण चौदा वित्त आयोग स्थापन

करणेत आले आहेत. या सर्वच वित्त आयोगांनी केंद्र व घटक राज्यांमध्ये वित्तीय साधनसामग्रीचे हस्तांतर न्याय व कार्यक्षमतेने व्हावे यासाठी महत्वपूर्ण अशा शिफारशी केलेल्या आहेत. केंद्र व घटक राज्ये यांच्यातील वित्तीय हस्तांतरणातून निर्माण होणारे उर्ध्व व समपातळी असमतोल दूर करण्यासाठी वित्त आयोगाकडून विशिष्ट निकष निश्चित केले जातात व त्याआधारे वित्तीय हस्तांतरणाची प्रक्रिया अधिक लवचिक व कार्यक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा प्रकारे केंद्र व राज्यांच्या वित्तीय हस्तांतरणामध्ये वित्त आयोग महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत.

४.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.

१. भारतात संघराज्य शासन व्यवस्था .... च्या कायद्यानुसार अस्तित्वात आली आहे.

(अ) १९२० *(ब) १९३०* *(क) १९३५* *(ड) १९५०.*

२. भारतात वित्त आयोगाची स्थापना घटनेतील .... व्या कलमानुसार केली जाते.

(अ) २७० *(ब) २७५* *(क) २८०* *(ड) २८५.*

३. .... हे चौदाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आहेत.

(अ) डॉ. विजय केळकर *(क) ए. एम. खुस्रो*

(ब) सी. रंगराजन *(ड) वाय. व्ही. रेड्डी.*

४. १३ व्या वित्त आयोगाने लोकसंख्या निकषाच्या आधारावर राज्यांना ठरविलेल्या महसुली वाटा .... आहे.

(अ) २०% *(ब) २५%* *(क) ३०%* *(ड) यापैकी नाही.*

५. उर्ध्व असमतोल .... मध्ये निर्माण होतो.

(अ) राज्या-राज्यांमध्ये *(क) वरील दोन्ही*

(ब) केंद्र व घटक राज्यांमध्ये *(ड) वरीलपैकी नाही.*

ब) एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.

१. प्राप्ती कर कोणाकडून आकारला जातो?

२. वित्त आयोगाची नेमणूक कोण करते?

३. तेराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कोण आहे?

४. संघराज्यातील वित्तीय हस्तांतरणाची साधने कोणती?

५. समपातळी वित्तीय असमतोल म्हणजे काय?

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १. *(क) १९३५.*

२. *(क) २८०.*

३. *(ड) वाय. व्ही. रेड्डी.*

४. *(ब) २५%.*

५. *(ब) केंद्र व घटक राज्यांमध्ये.*

ब) १. प्राप्ती कर केंद्र सरकारकडून आकारला जातो.

२. वित्त आयोगाची नेमणूक राष्ट्रपती करतात.

३. डॉ. विजय केळकर हे १३ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आहेत.

४. कर, करेत्तर आणि अनुदाने ही वित्तीय हस्तांतरणाची साधने आहेत.

५. आर्थिकदृष्ट्या काही राज्ये पुढारलेली तर काही राज्ये मागासलेली असतात त्यास समपातळी असमतोल असे म्हणतात.

४.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **संघीय वित्त व्यवस्था** : संघराज्यातील वेगवेगळ्या स्तरावरील सरकारांच्या वित्तीय व्यवहारांची व्यवस्था.

२. **वित्त आयोग** : केंद्र व घटक राज्ये यांच्यात वित्तीय साधनांचे वाटप करण्यासाठी राष्ट्रपतींनी स्थापन केलेला असतो.

३. **वित्तीय असमतोल** : केंद्र व राज्य सरकारे यांच्यातील उत्पन्न बाबी व खर्चाच्या बाबी यामधील असमतोल होय.

४.७ सरावासाठी स्वाध्याय

❑ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. संघराज्य वित्त व्यवस्थेतील घटनात्मक तरतुदी स्पष्ट करा.

२. संघराज्य वित्त व्यवस्थेतील वित्त आयोगाची भूमिका विशद करा.

३. भारतातील १२ व्या व १३ व्या वित्त आयोगांच्या शिफारशी स्पष्ट करा.

४. १४ व्या वित्त आयोगाच्या संदर्भ अटी, शिफारशी व दृष्टीकोण याविषयी विवेचन करा.

❑ **ब) टिपा लिहा.**

१. वित्त आयोगाची भूमिका.

२. गाडगीळ सूत्र.

३. उर्ध्व व समपातळी असमतोल.

४. ११ वा वित्त आयोग शिफारशी.

५. १० व्या वित्त आयोगाच्या शिफारशी.

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ सूची

१. **B. P. Tyagi** : *"Public Finance",* JayPrakash Nath & Co., Meerut, 2014.

२. **J. R. Gptal** : *"Public Economics in India",* Atlantic Publication.

३. **R. K. Lekhi** : *"Public Finance",* Kalyani Publisher, New Delhi.

४. **Om Prakash** : *"Public Economics",* Vishal Publishing Co.

५. **S. K. Singh** : *"Public Finance in Theory & Practice",* S. Chand and Co. Ltd., 2010.

६. **H. L. Bhatia** : *"Public Finance",* Vikas Publishing House Ltd., New Delhi, 1999.

७. **Gavrav Datt, Ashwani Mahajan** : *"Indian Economy",* S. Chand and Company Ltd., 2015.

८. **संपा. जे. एफ. पाटील** : *''सार्वजनिक अर्थकारण''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

९. **डॉ. किरण देसले** : *''भारतीय अर्थव्यवस्था''*, दिपस्तंभ पब्लिकेशन, २०१९.

❑❑❑